# मराठा मंदिर

॥ अग्राह्यं नाम नेहास्ति संघस्य व्यवसायिनाम् ॥

मराठा मंदिर

स्थापना : १९४५

## ७५

## वा

# वार्षिक अहवाल

## २०१९ - २०२०

मराठा मंदिर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८.

Email : marathamandir@hotmail.com

# आमचे प्रेरणास्थान

**संस्थापक सरचिटणीस**
**१९४६ - १९६९**



गंगाराम गोविंद उर्फ
श्री. बाबासाहेब गावडे

**संस्थापक अध्यक्ष**
**१९४६ - १९६१**



हिज् हायनेस, लेफ्ट. जन.
सर जिवाजीराव महाराज शिंदे

स्थापना १९४५

# मराठा मंदिर

मराठा मंदिर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८.
दूरध्वनी : ६६०४४१५०
E-mail : marathamandir@hotmail.com

कंपनीज् ॲक्टनुसार रजिस्ट्रेशन नं.६३८५/१९४८-४९
बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्टनुसार रजिस्ट्रेशन नं.ई-३१२ (बॉम्बे)
INCOME TAX –TAN No. MUMM22507C
PAN No. AAAAM 2049 J

# अमृत महोत्सवी वर्ष

# ७५ वा

# वार्षिक अहवाल

# २०१९ - २०२०

## व

हिशेब तपासनीसानी(Chartered Accountant) सादर केलेला

३१ मार्च २०२० पर्यंतचा ताळेबंद, हिशेब व अहवाल

# मराठा मंदिर

मराठा मंदिर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८.

दूरध्वनी : ६६०४४१५०

E-mail : marathamandir@hotmail.com

# * प्रार्थना *

जीवनात या सान काय अन् काय महान खरे ।
इष्टानिष्टही पारखण्या प्रभु दिव्य दृष्टी दे रे ।।धृ।।
महत्वपूर्ण नि आवश्यक त्या गोष्टी साधाया ।
देई बुध्दिबल शक्य अशक्यच मजला उमजाया ।
अपव्यय ना हो काळाचा अन् शक्तीचा व्यर्थ ।
क्षुद्र अनिष्ट अनावश्यक अन् अशक्य कार्यार्थ ।।
सुमति सत्प्रवृत्ती ही देवा दे मज दृढभाव ।
साधाया सत्कार्य निरंतर वाहिन सर्वस्व ।।
तूच दिली सद्‌वृत्ती सुमति दिव्य दृष्टी योजुनी ।
अंगिकारले कार्य यशस्वी व्हाया माझे झणी ।।
दृढ निश्चय उत्साह दे प्रभो अखंड मज योग्य ।
तुझ्या कृपेने लाभो दीर्घायुष्य नि आरोग्य ।।

# मराठा मंदिर

मराठा मंदिर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८. दूरध्वनी : ६६०४ ४१५०

क्र.म.मं./वा.स./६६९ दि.०१/१२/२०२०

## - निमंत्रण -

मराठा मंदिराची ७५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि.१९/१२/२०२० रोजी सायं.५.०० वाजता मा.ना.श्री.शरदचंद्रजी पवार, अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन आयोजित करण्यात आली असून, त्यावेळी खालील नमूद केलेल्या विषयसूचीप्रमाणे कामकाज होईल.

### -विषयसूची-

१. अध्यक्ष व उपाध्यक्ष अनुपस्थित असल्यास उपस्थितांतून सभेच्या अध्यक्षांची निवड करणे.

२. दि.२३/०८/२०१९ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांतास मंजूरी देणे.(परिशिष्ट १)

३. नियामक मंडळाने २०१९-२०२० सालचा सादर केलेला मराठा मंदिराचा वार्षिक अहवाल विचारात घेऊन त्यास मान्यता देणे. (परिशिष्ट २)

४. दि.३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाचे ताळेबंद, हिशेब व हिशेब तपासनीस(CA) यांचा अहवाल विचारात घेऊन त्यांस मंजूरी देणे. (परिशिष्ट २)

५. २०२०-२०२१ सालासाठी हिशेब तपासनीस(CA) यांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

६. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर विचार करणे.

**नियामक मंडळाच्या आदेशावरून**

दीपक भा.देशमुख
सरचिटणीस

राजेंद्र प्र.गावडे दिलीप अ.चव्हाण प्रदीप बा.विचारे शिल्पा स.रेळे
चिटणीस

शंकर द.पालदेसाई नाथा मा.जाधव
खजिनदार

---

टीप : कार्पोरेट अफेयर्स मंत्रालयाने (MCA) दि.०५ मे २०२० रोजी जारी केलेल्या जनरल परिपत्रक क्र.२०/२०२० नुसार आणि कोवीड-१९ साथीच्या महामारीच्या उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर, सामाजिक अंतर राखण्याच्या दृष्टीने वार्षिक सर्वसाधारण सभा ऑनलाईन आयोजित करण्यात आली आहे.

टिप नं.१: घटनेनुसार मंदिराचे विश्वस्त, कार्यकारी सभासद, आश्रयदाते, उपाश्रयदाते, आद्य सभासद, सर्वसाधारण सभासद व सन्माननीय सभासद यांनाच ऑनलाईन सभेमध्ये भाग घेता येईल.

टिप नं.२ : मतदानाचा अधिकार असलेल्या कोणत्याही सभासदास सर्वसाधारण सभेपुढील कामासंबंधी प्रश्न विचारावयाचे असल्यास अशा सभासदांनी दि.१२/१२/२०२० पर्यंत सकाळी ९.३० ते सायं.५.०० वाजेपर्यंत आपले प्रश्न व माहिती हवी असल्यास सन्मा.सरचिटणीस यांच्या नावे marathamandir@hotmail.com या इमेलवर पाठविणे आवश्यक आहे.

टिप नं.३ : कार्यक्रम पत्रिकेत नमूद केलेल्या कामाशिवाय इतर कोणतेही काम म.मं.घटना क्र.४२ नुसार आणता येणार नाही.

टिप नं.४ : सभेच्या वेळेनुसार गणसंख्यापूर्ती न झाल्यास किंवा इतर कोणत्याही कारणास्तव सभेचे कामकाज वेळेवर सुरु होऊ न शकल्यास ती सभा त्याच जागी त्याच दिवशी अर्ध्यातासानंतर सुरू करण्यात येईल. त्यावेळी गणसंख्यापूर्तीचे बंधन असणार नाही.

# मराठा मंदिर

## पदाधिकारी

## सन २०१८-२०१९ ते २०२०-२०२१

| | |
|---|---|
| श्री.शरदचंद्र गोविंदराव पवार | अध्यक्ष |
| श्री.शशिकांत आबाजी पवार | उपाध्यक्ष |
| श्री.विलासराव भाऊराव देशमुख | उपाध्यक्ष |
| श्री.विठ्ठल उर्फ विकास भास्करराव सावंतभोसले | उपाध्यक्ष |
| श्री.दीपक भाऊराव देशमुख | सरचिटणीस |
| श्री.राजेंद्र प्रताप गावडे | चिटणीस |
| श्री.दिलीप अर्जुन चव्हाण | चिटणीस |
| श्री.प्रदीप बाबुराव विचारे | चिटणीस |
| श्रीमती शिल्पा सतिश रेळे | चिटणीस |
| श्री. शंकर दत्ताराम पालदेसाई | खजिनदार |
| श्री.नाथा मारुती जाधव | खजिनदार |

# मराठा मंदिर – विश्वस्त मंडळ


| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरदचंद्र गोविंदराव पवार | अध्यक्ष |
| २. | श्री. शशिकांत आबाजी पवार | उपाध्यक्ष |
| ३. | श्री. विलासराव भाऊराव देशमुख | उपाध्यक्ष |
| ४. | श्री. विठ्ठल उर्फ विकास भास्करराव सावंतभोसले | उपाध्यक्ष |
| ५. | श्री. दीपक भाऊराव देशमुख | सरचिटणीस |
| ६. | श्री. राजेंद्र प्रताप गावडे | चिटणीस |
| ७. | श्री. दिलीप अर्जुन चव्हाण | चिटणीस |
| ८. | श्री. प्रदीप बाबुराव विचारे | चिटणीस |
| ९. | श्रीमती शिल्पा सतिश रेळे | चिटणीस |
| १०. | श्री. शंकर दत्ताराम पालदेसाई | खजिनदार |
| ११. | श्री. नाथा मारुती जाधव | खजिनदार |
| १२. | श्रीमती नयना मकरंद तांबे | विश्वस्त |
| १३. | श्रीमती वंदना राजेंद्र गावडे | विश्वस्त |
| १४. | श्री. श्रीकृष्ण अनंत विचारे | विश्वस्त |
| १५. | श्री. कमलाकांत दत्तात्रय सावंत(दि.१९/०६/२०२० पर्यंत) | विश्वस्त |
| १६. | श्रीमती कविता अशोक दामले | विश्वस्त |
| १७. | श्रीमती सुनंदा श्रीपाद पणशीकर | विश्वस्त |
| १८. | श्री. प्रताप बाळकृष्ण दांडगेपाटील | विश्वस्त |
| १९. | श्री. गिरीश द्वारकानाथ रेडकर | विश्वस्त |
| २०. | श्री.मनोहर विठ्ठल बने | विश्वस्त |
| २१. | डॉ. शिवाजी आबाराव भोसले | विश्वस्त |
| २२. | श्री. चारूहास नंदकुमार भेंडे | विश्वस्त |
| २३. | श्री. उल्हासराव आनंदराव देशमुख | विश्वस्त |
| २४. | डॉ. किशोर कृष्णराव गोहोकर | विश्वस्त |
| २५. | श्रीमती संध्या अरूण मोहिते | विश्वस्त |
| २६. | श्री. शेखर नारायण मेंगजी | विश्वस्त |

# मराठा मंदिर–नियामक मंडळ

## पदाधिकारी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. शरदचंद्र गोविंदराव पवार | अध्यक्ष | ७ | श्री. दिलीप अर्जुन चव्हाण | चिटणीस |
| २ | श्री. शशिकांत आबाजी पवार | उपाध्यक्ष | ८ | श्री. प्रदीप बाबुराव विचारे | चिटणीस |
| ३ | श्री. विलासराव भाऊराव देशमुख | उपाध्यक्ष | ९ | श्रीमती शिल्पा सतिश रेळे | चिटणीस |
| ४ | श्री.विठ्ठल उर्फ विकास भास्करराव सावंतभोसले | उपाध्यक्ष | १० | श्री. शंकर दत्ताराम पालदेसाई | खजिनदार |
| | | | ११ | श्री.नाथा मारुती जाधव | खजिनदार |
| ५ | श्री.दीपक भाऊराव देशमुख | सरचिटणीस | | | |
| ६ | श्री.राजेंद्र प्रताप गावडे | चिटणीस | | | |

## विश्वस्त

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती नयना मकरंद तांबे | ९ | श्री. मनोहर विठ्ठल बने |
| २ | श्रीमती वंदना राजेंद्र गावडे | १० | डॉ. शिवाजी आबाराव भोसले |
| ३ | श्री. श्रीकृष्ण अनंत विचारे | ११ | श्री. चारूहास नंदकुमार भेंडे |
| ४ | श्री. कमलाकांत दत्तात्रय सावंत (दि.१९/०६/२०२० पर्यंत) | १२ | श्री. उल्हासराव आनंदराव देशमुख |
| ५ | श्रीमती कविता अशोक दामले | १३ | डॉ. किशोर कृष्णराव गोहोकर |
| ६ | श्रीमती सुनंदा श्रीपाद पणशीकर | १४ | श्रीमती संध्या अरूण मोहिते |
| ७ | श्री. प्रताप बाळकृष्ण दांडगेपाटील | १५ | श्री.शेखर नारायण मेंगजी |
| ८ | श्री. गिरीश द्वारकानाथ रेडकर | | |

## कार्यकारी सभासद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती रेवती रणजित विचारे | ९ | श्री. प्रमोद बळीराम साटम |
| २ | श्री. कुणाल अशोक सावंत | १० | श्री. अभिजीत अरुण देशमुख |
| ३ | श्री. सुदेश रामकृष्ण भोसले | ११ | श्री. हर्षल दीपक देशमुख |
| ४ | डॉ. नितिन श्रीकृष्ण विचारे | १२ | श्री. सागर विलास देशमुख |
| ५ | श्री. संजय शांताराम राणे | १३ | श्री. संतोष एकनाथ नलावडे |
| ६ | श्री. विनायक रामजी घाग | १४ | श्री. चंद्रकांत मुगुटराव खोपडे |
| ७ | श्री. ऋषीकेश दीपक देशमुख | १५ | श्री. विरेंद्र शशिकांत पवार |
| ८ | श्री. योगेश शशिकांत पवार | १६ | डॉ.मधुकर गोविंद जाधव |

# आश्रयदाते

| | | | |
|---|---|---|---|
| १ | डॉ.ज्ञानदेव य.पाटील | ४ | श्री.सुधीर व्ही.गुप्ते |
| २ | श्री.प्रमोद बी.कनगुटकर | ५ | श्री.सुभाष सा.देशमुख |
| ३ | श्री.गजानन शं.पवार | ६ | श्रीमती सुप्रिया स.सुळे |

# उपाश्रयदाते

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.राजेंद्र मल्लू जिलकर | ३५ | श्री.हरिश डी.रुपारेल |
| २ | श्री.शरद दा.चिटणीस | ३६ | श्री.संदिप श्री.विचारे |
| ३ | श्री.हरेन पारेख | ३७ | श्री.बाळकृष्ण स.कनगुटकर |
| ४ | डॉ.निर्मला कृ.पिसाळ | ३८ | श्री.फिरदोश दा.जहांगीर |
| ५ | श्री.सदानंद गो. राणे | ३९ | श्री.व्योमेश म.शहा |
| ६ | श्री.विठ्ठलराव दि. सकपाळ | ४० | श्री.हेमंत म. एहा |
| ७ | श्री.व्यंकटेश्वर शं.जाधव | ४१ | श्रीमती हस्मीता ह.ठक्कर |
| ८ | श्री.फ्रान्सिस कोएलो | ४२ | मेजर मनोहर एस्.शिवांगी |
| ९ | श्री.प्रतापराव के.भोईटे | ४३ | श्री.शंकर ज.भोईटे |
| १० | श्री.पंढरीनाथ बा.सावंत | ४४ | श्री.नवनितकुमार चौधरी |
| ११ | श्री.शिवाजीराव धों. कटाळे | ४५ | श्री.सुभाष अ.भालवाल |
| १२ | श्री.नटवरलाल अ.बडेका | ४६ | श्री.पंकज पी. सकपाळ |
| १३ | डॉ.श्री.पंकज के नराम | ४७ | श्री.अविनाश बा.ठाकरे |
| १४ | डॉ. श्रीमती स्मिता पं.नराम | ४८ | श्री.समीर रा.कदम |
| १५ | श्री.प्रभाकर चिं.ओक | ४९ | श्री.शरद शि.सानप |
| १६ | श्री.रमण अशोक जोशी | ५० | श्री.प्रदीप वि.सावंत |
| १७ | श्री.अजित प.खत्री | ५१ | श्री.प्रकाश ज्ञा.जूनघरे |
| १८ | श्री.जयंत मनोहर वैद्य | ५२ | श्री.दिलिप वि.साळुंखे |
| १९ | श्री.विजय वसंत फुलकर | ५३ | श्री.अशोक वि.साळुंखे |
| २० | श्री.रमाकांत वि.कनगुटकर | ५४ | श्री.सुभाष आ.घोरपडे |
| २१ | श्री.सुधाकर माधव दोखणे | ५५ | श्रीमती पुष्पा दि.साळुंखे |
| २२ | श्री.भगवान स.तावडे | ५६ | श्री.सुनिल व.पाटील |
| २३ | श्री.प्रविण र.कणेकर | ५७ | श्री.संदीप व.पाटील |
| २४ | श्री.नितीन चि.शहा | ५८ | श्री.दिलिप बा.जगताप |
| २५ | श्री.विष्णु व्यं.कामत | ५९ | श्री.विजय लक्ष्मण पाटील |
| २६ | श्री.जयप्रकाश म.रणदिवे | ६० | श्री.सदाशिव धोंडू सुर्वे |
| २७ | श्री.विवेकानंद र.चित्रे | ६१ | श्री.कैलास स. सुर्वे |
| २८ | श्री.विद्यानंद श्री.भावे | ६२ | श्री.अशोक अ.जगताप(भाई) |
| २९ | श्री.आनंद श्री.सांडू | ६३ | श्री.सिताराम रघुनाथ कापसे |
| ३० | श्री.अशोक पाटील | ६४ | श्री.समीर अशोक दामले<br>दि.३१ मार्च २०२० पर्यंत |
| ३१ | श्री.सुभाष द.तिळेकर | ६५ | श्री.सचिन अशोक दामले |
| ३२ | श्री.विकास म.पाटील | ६६ | श्री.शिवाजीराव बा.देशमुख |
| ३३ | श्री.रविंद्र आर.पाटील | ६७ | श्रीमती अल्पना सावंत पेंटर |
| ३४ | श्री.नाथाजी वि.माने | ६८ | श्रीमती वर्षा लि.पालव |

| | | | |
|---|---|---|---|
| ६९ | श्री.विजय भाऊसाहेब ठाकरे | १११ | श्री.संदीप निळकंठ सावंत |
| ७० | श्रीमती मीना अभय मुथा | ११२ | श्री.नितीन निळकंठ सावंत |
| ७१ | श्रीमती संजीवनी नि.विचारे | ११३ | श्री.पुरुषोत्तम जे.किर्दत |
| ७२ | श्रीमती गौरी संदिप विचारे | ११४ | श्री.जयवंत गणपत विचारे |
| ७३ | श्री.हनुमंत ब.जगताप | ११५ | डॉ.प्रकाश बळीराम साटम |
| ७४ | श्री.सुबोध ए.नलावडे | ११६ | श्री.मधुसूदन रामचंद्र सावंत |
| ७५ | श्रीमती मंगला ए.नलावडे | ११७ | श्री.प्रभाकर विश्राम पवार |
| ७६ | श्रीमती ममता सं.नलावडे | ११८ | श्री.सदानंद भिवाजी चव्हाण |
| ७७ | श्री.प्रमोदराव आ.देशमुख | ११९ | श्री.चंद्रकांत एम.फाटक |
| ७८ | श्री.दिलीपराव आ.देशमुख | १२० | श्री.नारायण व्ही.आंगणे |
| ७९ | श्रीमती नयना उ.देशमुख | १२१ | श्री.संदीप मनोहर जाधव |
| ८० | श्री.प्रदिप गुलाबराव कडू | १२२ | श्रीमती प्रिती अभिजीत देशमुख |
| ८१ | श्री.साहेबराव कृ.रणशिंगे | १२३ | श्रीमती राधिका हृषीकेश देशमुख |
| ८२ | श्री.विजय महादेव प्रभाकर | १२४ | श्रीमती चारुशिला सुनील आमले |
| ८३ | श्री.सुदिप ना.कोठारी | १२५ | श्रीमती राजश्री हरिश्चंद्र विश्वासराव |
| ८४ | श्री.गोविंद व.बीलोलीकर | १२६ | श्री. विनोद रामचंद्र देसाई |
| ८५ | श्री.रविंद्र रघुवीर राठोड | १२७ | श्री. किशोर प्रभाकर देशमुख |
| ८६ | श्रीमती नीता आशिष पाटील | १२८ | श्रीमती निवेदिता किशोर देशमुख |
| ८७ | श्री.धनंजय मा.आखाडे | १२९ | श्री. मनोज प्रकाश देशमुख |
| ८८ | श्री.रामदास पी.शिंदे | १३० | श्री. नरेंद्र गुलाबराव देशमुख |
| ८९ | श्री.किशोर देवदासराव पाटील | १३१ | श्री संजय कारभारी निकम |
| ९० | श्रीमती सोनम कार्तिक निशानदार | १३२ | श्री. सुनिल गुलाबराव जगदाळे |
| ९१ | कु.ममता शं.पालदेसाई | १३३ | कु. सायली संजय राणे |
| ९२ | श्री.अक्षय उ.बोबडे | १३४ | श्रीमती मधुरा संजय राणे |
| ९३ | श्रीमती अरुंधती सा.देशमुख | १३५ | श्री. दिलीप भास्करराव देशमुख |
| ९४ | श्री.उदय अनंत सकपाळ | १३६ | श्री. जितेंद्र भास्करराव देशमुख |
| ९५ | श्री.सुनिल भिवाजी राणे | १३७ | श्री. श्रीराम संजयकुमार देशमुख |
| ९६ | श्री.सच्चिदानंद बाळकृष्ण राणे | १३८ | श्रीमती वर्षा दिलीप देशमुख |
| ९७ | डॉ.हेमंतकुमार विठ्ठल सावंत | १३९ | श्रीमती सुवर्णा योगेश पवार |
| ९८ | श्रीमती ज्योती दीपक देशमुख | १४० | श्री. अशोक प्रेमपाल सिंग |
| ९९ | श्री.मधुकर गोविंद इंदूलकर | १४१ | श्री. पंकज कृष्णकांत घाग |
| १०० | श्री.मनोहर आत्माराम साळवी | १४२ | श्री. श्याम निळकंठराव देशमुख |
| १०१ | श्री.राजेश पद्माकर कदम | १४३ | श्रीमती मनिषा श्याम देशमुख |
| १०२ | श्रीमती वैशाली चारुहास भेंडे | १४४ | श्रीमती प्राची उदय सरनाईक |
| १०३ | श्रीमती उर्मिला विलास देशमुख | १४५ | श्री. उदय रमेश सरनाईक |
| १०४ | डॉ.अरुण आत्माराम साळवी | १४६ | श्री. मयुर मधुकर जाधव |
| १०५ | श्रीमती सरोजिनी प्रताप दांडगेपाटील | १४७ | श्रीमती सुरक्षा शशांक घोसाळकर |
| १०६ | ॲड.ए.एन.मुल्ला | १४८ | डॉ. रणजित निळकंठराव देशमुख |
| १०७ | ॲड.यशवंत बाबुराव कदम | १४९ | श्री. प्रशांत दत्ताराम खानविलकर |
| १०८ | श्री.उदयकुमार व्ही.बने | १५० | श्री. राजेंद्र मोहन घाग |
| १०९ | श्री.पांडुरंग धोंडू भुवड | १५१ | डॉ. अस्मिता रणजित देशमुख |
| ११० | श्री.संतोष गोरखनाथ घाग | १५२ | श्रीमती शितल विलास देशमुख |

| | | | |
|---|---|---|---|
| १५३ | श्री. अमित अशोकराव देशमुख | १६९ | श्री. जितेंद्र पंढरीनाथ पाटील |
| १५४ | श्री. संदीप वसंत पवार | १७० | श्रीमती माधुरी मनोहर साळवी |
| १५५ | श्री.पृथ्वीराज नितीन सावंत | १७१ | श्री. गणेश शिवराम देसाई |
| १५६ | श्रीमती सुचिता नितीन सावंत | १७२ | ॲड. निता प्रमोद कानन |
| १५७ | श्रीमती अरुंधती सिध्दार्थ देशमुख | १७३ | श्री. सलीम मुलानी अब्बास |
| १५८ | श्री.सिध्दार्थ प्रदीप देशमुख | १७४ | श्री. झुबेर अब्दुलसमाद मुल्ला |
| १५९ | श्री. संदीप बापू सावळ | १७५ | ॲड. मेहराज मुतावल्ली |
| १६० | श्री.सुनिल हरिश्चचंद्र मोरे | १७६ | श्रीमती स्मिता समीर राणे |
| १६१ | श्रीमती राणे पिया मेहुल | १७७ | श्रीमती मुग्धा मिलिंद साळवी |
| १६२ | ॲड.प्रतिक्षा प्रदीप विचारे | १७८ | श्री. मिलिंद मनोहर साळवी |
| १६३ | श्री. अशोक बळवंत विचारे | १७९ | श्रीमती प्राजक्ता प्रशांत खानविलकर |
| १६४ | श्री. सुभाष काशीराम विचारे | १८० | श्री. मंगेश भा.कदम |
| १६५ | श्रीमती स्नेहल मेघश्याम केळकर | १८१ | ॲड. प्रभाकर सो.जाधव |
| १६६ | श्री. केदार चंद्रकांत खोपडे | १८२ | श्री. सुदाम एस.पाटील |
| १६७ | श्री. विशाल मनोहर बने | १८३ | श्री. स्वानंद संतोष नलावडे |
| १६८ | श्री. विद्याधर मधुकर बने | | |

# मराठा मंदिर – निधी

## मराठा मंदिर इमारत

| अ.क्र. | देणगीदाराचे नाव | रुपये |
|---|---|---|
| १. | हिज हायनेस सर जिवाजीराव महाराज शिंदे | २,१४,६७९/- |
| २. | श्री.शेठ घनशामदास बिर्ला | २,००,०००/- |
| ३. | मेजर जनरल हिज हायनेस प्रतापसिंह महाराज गायकवाड | ३५,०००/ - |
| ४. | शेठ शापुरजी पालमजी मिस्त्री | २५,०००/- |
| ५. | श्री.पांडुरंग बाबुराव बोबडे | ११,०००/- |
| ६. | श्री.बापुसाहेब धाकोजीराव सावंत | १०,०००/- |
| ७. | श्री.पतंगशा यशवंतराव मुकणे (जव्हार) | १०,०००/- |

## म.मं.महाराष्ट्र ज्ञानपीठ (शिष्यवृत्ती)

| अ.क्र. | देणगीदाराचे नाव | रुपये |
|---|---|---|
| १. | डॉ.प्रतापराव माने | १,००,०००/- |
| २. | श्री.श्रीकृष्ण अनंत विचारे | ५,०००/- |
| ३ | श्रीमती सुरक्षा घोसाळकर | ५,०००/- |

## म.मं.वनिता विश्व

| अ.क्र. | देणगीदाराचे नाव | रुपये |
|---|---|---|
| १. | श्रीमती कोकिळाबेन धीरूभाई अंबानी | २५,०००/- |
| २. | श्री महालक्ष्मी देवालय विश्वस्त निधी | ५०,०००/- |
| ३. | मे.अडवाणी ऑर्लिकॉन (रौप्य महोत्सवानिमित्त) | ५,००१/- |
| ४. | कै.सौ.साधना रंजन पेडणेकर (डॉ.रमेश संझगिरी यांजकडून) | २५,०००/- |
| ५. | श्रीमती लीला मस्तकार रेळे | १,०००/- |
| ६. | डॉ.विनायक हरी साळसकर | १,०००/- |
| ७. | श्रीमती नर्मदा सिताराम देसाई टोपीवाले | ३,५००/- |
| ८. | कै.शकुंतला शिवडेकर यांच्या स्मरणार्थ श्री.गजानन शिवडेकर यांजकडून | ५,०००/- |
| ९. | श्रीमती शिल्पा सतीश रेळे | ५,०००/- |

## म.मं.कलाकेंद्र

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.कुमारमंगलम बिर्ला | १,००,०००/- |
| २. | कै.सौ.सीता टिपणीस यांच्या स्मरणार्थ श्री.कृष्णकांत टिपणीस यांजकडून (कथ्थक नृत्य स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक ) | ५०,०००/- |
| ३. | कै.सौ.सीता टिपणीस यांच्या स्मरणार्थ श्री.किरण जी.होनावर व श्री.राजन जी.होनावर यांजकडून (कथ्थक नृत्य स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक ) | २५,०००/- |

# म.मं.बेकारी निरोधन संघ

| अ.क्र. | देणगीदाराचे नाव | रुपये |
|---|---|---|
| १. | श्री.कांतिलाल एम.गांधी व कुटुंब | १,००,०००/- |
| २. | श्री.अशोक परशुराम दामले | ६३,०००/- |
| ३. | मे. भट फॅमिली चॅरिटेबल ट्रस्ट | १२,०००/- |
| ४. | श्री.बाबुराव दत्ताजीराव धनवटे | ७,०००/- |
| ५. | कै.श्रीमती आनंदीबाई गावडे (श्री.बाबासाहेब गावडे यांजकडून) | ६,०००/- |
| ६. | मे.पॉवर केबल्स प्रा.लि. (श्री.डी.डी.देसाई यांजकडून) | ६,०००/- |
| ७. | मधुकर चॅरिटेबल ट्रस्ट (श्री.एम.जी.भट यांजकडून) | ६,०००/- |
| ८. | लजपतराय चॅरिटेबल ट्रस्ट (श्री.एस.आर.अनेजा यांजकडून) | ६,०००/- |
| ९. | कै.सौ.रुक्मीणीबाई बा.सावंत यांच्या स्मरणार्थ (श्री.एम.बी.सावंत यांजकडून) | ६,०००/- |
| १०. | कै.इंदूलाल डी.बुवा यांच्या स्मरणार्थ (मे.इंडो निप्पॉन केमिकल कंपनी लि) | ६,०००/- |
| ११. | श्री.आर.पी.पटेल | ६,०००/- |

# मराठा मंदिर

| अ.क्र. | देणगीदाराचे नाव | रुपये |
|---|---|---|
| १. | रिलायन्स इंडस्ट्रीज लि.यांजकडून | २,००,०००/- |
| २. | सोनम फिनव्हेस्ट लि. यांजकडून | ५,००,०००/- |
| ३. | श्रीमती नयना तांबे विश्वस्त यांजकडून म.मं.बाबासाहेब गावडे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज/म.मं.बाबासाहेब गावडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधील अंतिम परीक्षेत प्रथम आलेल्या विद्यार्थीनीस रोख पारितोषिक | २,००,०००/- |
| ४. | श्रीमती निला मुखर्जी व उदिता जहागिरदार | २,००,०००/- |
| ५. | श्री.सुमित सुभाष अग्रवाल | २,५१,०००/- |
| ६. | एमटीजे फायनाशियल सर्व्हिसेस आयएमसी | ५१,०००/- |
| ७. | श्री.नितीन लहानू जाधव | १,००,०००/- |
| ८. | श्रीमती पुष्पा रमण चांडक | १,०१,०००/- |
| ९. | श्री.रमण तुळशीरामजी चांडक | १,०१,०००/- |
| १०. | श्री.शशी नरेंद्र अग्रवाल | १,००,०००/- |
| ११. | श्री.राजेश रामास्वामी अय्यर | १,००,०००/- |
| १२. | श्रीमती सुनिता ओमप्रकाश अग्रवाल | १,००,०००/- |
| १३. | श्री.ओमप्रकाश फुलचंद अग्रवाल | १,००,०००/- |
| १४. | श्री.रोहित प्रधान | २,५०,०००/- |
| १५. | श्री.नरेंद्र अग्रवाल | १,००,०००/- |
| १६. | श्री.महेश नरोत्तम वाजा | ५०,०००/- |
| १७. | श्री.अखिलेशकुमार उपाध्याय | १,००,०००- |
| १८. | श्री.अशोक पाटील | ५१,०००/- |
| १९. | श्रीमती मिनल के.टंक (माजी विभागप्रमुख म.मं.बाबासाहेब गावडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) यांचकडून त्यांचे पिताश्री यशवंतराय डी.दवे आणि मातोश्री विजया यशवंतराय दवे यांच्या स्मरणार्थ. | २,५१,०००/- |

## म.मं.श्री शहाजी हायस्कूल, अक्कलकोट, जि.सोलापूर.

| अ.क्र. | देणगीदाराचे नाव | रुपये |
|---|---|---|
| १. | कै.सौ.वनमाला वसंतराव गोडसे (श्री.शशिकांत वसंतराव गोडसे, सहशिक्षक यांच्याकडून) | १,५०,०००/- |
| २. | श्री.बी.व्ही.निंबाळकर, माजी सहशिक्षक | १,५०,०००/- |
| ३. | श्रीमती आरती प्रसाद काळे, माजी मुख्याध्यापिका | १,००,०००/- |

## म.मं.न्यू इंग्लिश हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, पाली. जि.रत्नागिरी.

| अ.क्र. | देणगीदाराचे नाव | रुपये |
|---|---|---|
| १. | डॉ. नारायण एस्.तळेकर | १,२८,३९२/- |

## म.मं.विद्यावर्धिनी

| अ.क्र. | देणगीदाराचे नाव | रुपये |
|---|---|---|
| १. | कै .सखाराम रामचंद्र गावडे(श्रीमती स्नेहलता गावडे यांजकडून) | १०,०००/- |
| २. | श्री.व्ही.डी.तथा बाबुराव धनवटे शिष्यवृत्ती | १,५००/- |
| ३. | श्रीमती निर्मला एस.आपटे (शिष्यवृत्ती) | १,००१/- |
| ४. | श्रीमती गंगाबाई पटवर्धन तथा दुर्गाबाई लिमये(शिष्यवृत्ती) | १,००१/- |
| ५. | मराठा मंदिर वरळी नाईट हायस्कूल | १०००/- |
| ६. | श्री.केशव गणेश लिमये(शिष्यवृत्ती) | १०००/- |
| ७. | कै.श्रीमती दौपदी भिवाजी प्रभु(श्री.एन.बी.प्रभु यांजकडून शिष्यवृत्ती) | ५,०५१/- |
| ८. | कै.सौ.सरस्वती धुंडीराज कविश्वर(श्री.श्रीपाद धुं.कविश्वर यांजकडून) | ४,५०१/- |

## दसरा मंगल वादन

| अ.क्र. | देणगीदाराचे नाव | रुपये |
|---|---|---|
| १. | श्री.बाबासाहेब गावडे यांजकडून | १,०००/- |

## म.मं.बाबासाहेब गावडे चॅरिटेबल हॉस्पिटल, विलेपार्ले.

| | | |
|---|---|---|
| १. | ईश्वरभाई ज.पटेल ट्रस्ट - डायलेसिस सेंटर | १५,००,०००/- |
| २. | ईश्वरभाई ज.पटेल ट्रस्ट - सोनोग्राफी सेंटर | १२,५०,०००/- |
| ३. | हरकिसन शहा | ५,०००/- |

* २०१९-२० च्या वार्षिक अहवालामधून वितरीत.

सन्मा. सभासदहो,

मराठा मंदिरचे सभासद म्हणून आपल्याला सर्व सभांचे निमंत्रण/ कार्यक्रमपत्रिका/वार्षिक अहवाल कोरीयरद्वारे पाठविले जाते. तरीसुध्दा बहुसंख्य सभासद सभेला उपस्थित रहात नाहीत व त्यामुळे आपल्याला कुरीअरचा खर्च होतच राहतो.

यावर सुधारणात्मक उपाय म्हणून दि.१ जुलै २०१६ रोजी झालेल्या विश्वस्त मंडळाच्या सभेमध्ये सर्व सभासदांना सभेचे निमंत्रण व कार्यक्रम पत्रिका, ई-मेलद्वारे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तरी आपणास नम्र विनंती की, सदर ई-मेलद्वारे सभेचे निमंत्रण व कार्यक्रमपत्रिका तसेच वार्षिक अहवाल पाठविण्याकरिता आपली हरकत नसल्याबद्दल मराठा मंदिरला कळवावे. अशाप्रकारचा कोणताही पत्रव्यवहार सभासदांकडून न आल्यास सभासदांची या कार्यवाहीला मान्यता असून त्यांची कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्यामुळे यापुढे सर्व सभांचे निमंत्रण, कार्यक्रमपत्रिका व वार्षिक अहवाल सभासदांना ई-मेलद्वारेच पाठविण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी. बऱ्याच सभासदांनी त्यांचा ई-मेल पत्ता मराठा मंदिरकडे सादर केला आहे. त्यात काही बदल असल्यास कृपया आम्हाला ताबडतोब कळवावे. ज्या सभासदांनी अद्याप त्यांचा ई-मेल/भ्रमणध्वनी/दूरध्वनी मराठा मंदिरकडे सादर केला नसल्यास कृपया त्यांनी त्यांचे नाव सभासद क्रमांकासह मराठा मंदिरचा भ्रमणध्वनी क्र.९३२४९४२३७७ वर व्हॉटस् अप/टेक्स्ट मेसेज किंवा marathamandir@hotmail.com यावर त्वरीत कळवावा ही विनंती.

तसेच सर्व सभासदांसाठी नवीन ओळखपत्रे तयार करुन दिली जात आहेत. सर्व सभासदांनी आपले दोन फोटो मंदिराच्या कार्यालयात पाठवावेत म्हणजे सभासदांना नवीन ओळखपत्रे तयार करुन देता येतील.

आपला नम्र,
दीपक भा.देशमुख
सरचिटणीस

# मराठा मंदिर
## ७५ वा वार्षिक अहवाल

मराठा मंदिराचा सन २०१९-२०२० चा ७५ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व हिशेब (हिशेब तपासनीसांच्या (CA) अहवालाच्या मराठी भाषांतरासहीत) आपणासमोर सादर करण्यात येत आहे.

मराठा मंदिरचे हे अमृत महोत्सवी वर्ष आहे. हे वर्ष मोठ्या दिमाखात, उत्साहात साजरा करण्याचा संस्थेच्या सर्वच सभासदांचा मानस होता. दि.०४ एप्रिल २०२० रोजी अमृत महोत्सवाचा सांगता समारंभ साजरा करण्याचे ठरविण्यातही आले. त्यादृष्टीने मराठा मंदिरने कार्यक्रमास सुरूवातही केली. त्यातील पहिला कार्यक्रम दि.११ सप्टेंबर २०१९ रोजी मा.श्री.चंद्रकांत पाटील तत्कालीन सार्वजनिक बांधकाममंत्री, महाराष्ट्र राज्य यांचा सन्मानपत्र व मानचिन्ह देऊन सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. पण कार्यबाहुल्यामुळे मा.ना.श्री.चंद्रकांत पाटील येऊ शकले नाहीत. म्हणून सर्वश्री दीपक देशमुख सरचिटणीस, शंकर पालदेसाई खजिनदार व चंद्रकांत खोपडे कार्यकारी सभासद यांनी श्री.चंद्रकांत पाटील यांच्या घरी जाऊन त्यांना सन्मानपत्र व मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार केला. अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी विविध शाखा व शाळांकडून कार्यक्रमांचे कशाप्रकारे आयोजन करावयाचे त्याची रुपरेखा ठरविण्यात आली. या समारंभाच्या निमित्ताने स्मरणिकेचे प्रकाशन करण्याचे ठरले. त्यासाठी सभासदांकडून लेख मागविण्याबाबत तसेच देणगीसाठी आवाहन करण्यात आले. अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी सभासद उत्साही असताना अचानक जगभरात कोवीड-१९ या विषाणुच्या सांसर्गिक रोगाची साथ सुरू झाली. त्यामुळे शासनाने विविध नियम व बंधने घातल्यामुळे संपूर्ण जनजीवन ठप्प झाले. अशा परिस्थितीमुळे मराठा मंदिरला अमृत महोत्सव नियोजित वेळी साजरा करता आला नाही हे नमूद करताना अत्यंत खेद होत आहे.

सभासद वर्गवारी :

| | | |
|---|---|---|
| विश्वस्त | ..... | ००२६ |
| कार्यकारी सभासद | ..... | ००१६ |
| आश्रयदाते | ..... | ०००६ |
| उपाश्रयदाते | ..... | ०१८३ |
| आद्य सभासद | ..... | १३९ |
| सर्वसाधारण सभासद | ..... | ८५४ |
| सन्मा.सभासद | ..... | ०४ |
| एकूण | ..... | १२२८ |

**दु:खवटा** : मराठा मंदिराच्या अधोनिर्दिष्ट सदस्यांचे दु:खद निधन झाले. त्याना मराठा मंदिरच्यावतीने भावपूर्ण श्रध्दांजली. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

| | | |
|---|---|---|
| श्री.कमलाकांत दत्तात्रय सावंत | विश्वस्त | १९/०६/२०२० |
| श्री.प्रभाकर नागोराव सपकाळ | उपाश्रयदाते | १९/०४/२०१५ |
| श्री.केनवडेकर शिवाजी रामचंद्र | उपाश्रयदाते | १९/०९/२०१९ |
| श्री.जेऊरकर वसंत दत्तात्रय | उपाश्रयदाते | तारीख उपलब्ध नाही. |
| श्री.समीर अशोक दामले | उपाश्रयदाते | तारीख उपलब्ध नाही. |

**नियंत्रण समित्या :**

मराठा मंदिराचे दैनंदिन कार्य सुव्यवस्थितपणे चालावे आणि ते नियोजित वेळेत पूर्ण व्हावे यासाठी विश्वस्त मंडळ आणि नियामक मंडळ या मराठा मंदिराच्या घटनेचे बंधन असलेल्या नियंत्रण समित्या कार्यरत आहेत. विश्वस्त मंडळाची सभा बहुतांश आठवड्यातून एकदा व नियामक मंडळाची सभा साधारणत: तीन महिन्याने एकदा घेण्यात येते. त्यात, दरम्यानच्या कालावधीत झालेल्या कामांचा आढावा घेतला जातो व मराठा मंदिराच्या घटनेच्या आधीन राहून आगामी कालावधीत करावयाच्या कामकाजांची आखणी व नियोजन करून ती कामे नियोजित वेळेत पूर्ण करुन

घेण्याचा प्रयत्न करण्यात येतो. अहवालसाली विश्वस्त मंडळाच्या २४ सभा आणि नियामक मंडळाच्या ०४ सभा झाल्या.

मराठा मंदिराच्या सर्व शाखा, त्यांच्यासाठी विहीत केलेल्या पोट-घटनांच्या अनुषंगाने, मराठा मंदिर या मातृसंस्थेच्या अधिपत्याखाली आपआपले अंगिकारलेले कार्य तत्परतेने आणि निष्ठेने करीत असतात. मराठा मंदिर ही मातृसंस्था आवश्यक असेल त्यावेळी या शाखांना सर्वतोपरी सहकार्य करुन त्यांच्या उद्दिष्टपूर्तीला आवश्यक तेव्हा आर्थिक मदत करीत असते. गुणवंत विद्यार्थ्यांना रोख रक्कमेची पारितोषिके, शिवाय होतकरु विद्यार्थ्यांना कर्जाऊ शिष्यवृत्त्या दिल्या जातात.

**(अ) गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके :** प्रतीवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी मराठा मंदिर विद्यावर्धिनी प्रणित सर्व शाळांमध्ये कमीत कमी ८०% गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना मराठा मंदिरच्यावतीने रू.१०००/- चे पारितोषिक देण्यात येत असे. अहवालासालापासून ९०% व त्याहून अधिक गुण(रात्र शाळेसाठी ७०%) मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनींना प्रत्येकी रु.१००१/-चे पारितोषिक देण्यास सुरूवात करण्यात आली. त्यानुसार मार्च २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत खालील विद्यार्थ्यांनी त्यांच्या शाळेमध्ये प्रथम क्रमांक मिळविल्यामुळे त्यांना प्रत्येकी रु.१००१/- चे पारितोषिक प्रदान करण्यात आले.

| अ. क्र. | शाळेचे नाव | विद्यार्थ्याचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | म.मं.श्री रामराव विद्यामंदिर हायस्कूल, जत, जि.सांगली | साईजीत दिलीप निकम<br>औदुबर बसगोंडा तनंगी<br>सुप्रिया बाबासाहेब गायकवाड<br>अथर्व उध्दव नराळे<br>ऋषिका नंदकुमार माळी | ९७%<br>९६.६०%<br>९३.८०%<br>९३.४०%<br>९२.४०% |
| २ | म.मं.बाबासाहेब गावडे इं.मा. शाळा, वरळी, मुंबई. | श्रुती महेश हुशे | ९२.६०% |
| ३ | म.मं.श्री शहाजी हायस्कूल, अक्कलकोट, जि.सोलापूर. | प्रगती कल्याणी बिराजदार<br>निकिता राजेंद्र गोंडाळ | ९४.८३%<br>९२.६०% |
| ४ | म.मं.अ.के.देसाई हायस्कूल, रत्नागिरी, जि.रत्नागिरी. | समृध्दी शशांक शिंदे | ९३.८०% |
| ५ | म.मं.न्यू इंग्लिश हायस्कूल, पाली, जि.रत्नागिरी | व्यास नरेंद्र गावंड | ९२% |
| ६ | म.मं.वरळी रात्र शाळा, मुंबई. | प्रमोद गुरूनाथ जावळेकर | ७५% |

**(ब ) विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाची सोय -**

संस्थेने मुख्य इमारतीतील आदर्श विद्यार्थी वसतीगृहात म.मं.बाबासाहेब गावडे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडिजसाठी परगावाहून आलेल्या विद्यार्थ्यांकरिता रहाण्याची सुविधा नाममात्र मोबदल्यात उपलब्ध करुन देण्यात आली आहे. गेली नऊ वर्षे या वसतीगृहाचा लाभ विद्यार्थी घेत असून अहवालसाली एकूण ०९ विद्यार्थ्यांनी वसतीगृहाचा लाभ घेतला आहे. तसेच म.मं.बाबासाहेब गावडे चॅरिटेबल हॉस्पिटल, विलेपार्ले येथील ९ कर्मचाऱ्यांची राहण्याची सोय या वसतीगृहात करण्यात आली.

**(क) आद्य संस्थापक कै. बाबासाहेब गावडे यांची जयंती**

कै.बाबासाहेबांची ११५ वी जयंती दि.४ एप्रिल २०१९ रोजी मराठा मंदिराच्या विस्तारित इमारतीतील बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून आणि विलेपार्ले येथील म.मं.बाबासाहेब गावडे धर्मादाय हॉस्पिटलमधील बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन साजरी करण्यात आली.

## (ड) मराठा मंदिराचे समाजाभिमुख कार्य :-

आपली संस्था शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य आणि गरजू नागरिकांसाठी विनामूल्य कायदेविषयक योगदान करीत असते. मराठा मंदिराच्या विविध शाखा खालीलप्रमाणे आहेत.

| शाखा | कार्य |
|---|---|
| १. मराठा मंदिर विद्यावर्धिनी | ६ माध्यमिक शाळा(वरळी, रत्नागिरी, पाली, जत, अक्कलकोट)<br>१ रात्र शाळा, वरळी, मुंबई.<br>२ कनिष्ठ महाविद्यालये, पाली, जत.<br>१ अध्यापक पदविका महाविद्यालय, रत्नागिरी.<br>१ इंग्रजी माध्यम शाळा(पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक) वरळी, मुंबई. |
| २. मराठा मंदिर सीबीएसई स्कूल, रत्नागिरी. | म.मं.वंडर किडझ् (पूर्व प्राथमिक)<br>म.मं.ग्लोबल स्कूल (प्राथमिक) |
| ३. मराठा मंदिर बाबासाहेब गावडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई. | १. डिप्लोमा इन कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी<br>२. डिप्लोमा इन कॉम्प्युटर इंजिनिअरींग<br>३. डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ड टेलीकम्युनिकेशन<br>} ३ वर्षाचे अभ्यासक्रम |
| ४. मराठा मंदिर बाबासाहेब गावडे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज्, मुंबई. | अ) मास्टर्स ऑफ मॅनेजमेंट्स् स्टडिज् -२ वर्षाचा अभ्यासक्रम<br>ब) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॅनेजमेंट(PGDM) २ वर्षाचा अभ्यासक्रम (एआयसीटीई मान्यताप्राप्त) |
| ५. मराठा मंदिर बाबासाहेब गावडे चॅरिटेबल हॉस्पिटल, विलेपार्ले(पूर्व), मुंबई. | अत्याधुनिक उपकरणांद्वारे वैद्यकीय चिकित्सा व तपासणी. अद्यावत अतिदक्षता विभाग, शिशु अतिदक्षता विभाग, आधुनिक व सुसज्ज ऑपरेशन थिएटर, प्रसुती विभाग यांनी सुविधायुक्त असे रुग्णालय. |
| ६. मराठा मंदिर महाराष्ट्र ज्ञानपीठ | गणित, इंग्रजी, सामान्य ज्ञान, चित्रकला, मराठी, संस्कृत, शिष्यवृत्ती व सराव परीक्षा या विषयांच्या प्राथमिक व माध्यमिक शालेयस्तरांवरील परीक्षा मराठी, इंग्रजी, हिंदी व गुजराथी माध्यमातून घेतल्या जातात. |
| ७. मराठा मंदिर वनिता विश्व | महिलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम व विविध प्रकारचे खाद्यपदार्थ इत्यादी तयार करण्याचे प्रात्यक्षिक वर्ग. |
| ८. मराठा मंदिर कला केंद्र | नृत्यस्पर्धा, अभिजात गायनकला आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम. |
| ९. मराठा मंदिर प्रागतिक संघ | बुक बँक, कवी संमेलन, संस्कृत पाठांतर स्पर्धा इत्यादी. |
| १०. मराठा मंदिर मोफत कायदेविषयक सल्ला केंद्र | गरजू नागरिकांना कायदेविषयक मोफत सल्ला. |

# मराठा मंदिर विद्यावर्धिनी (१९७०)

## कार्यकारी मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.प्रदीप बाबुराव विचारे | – | अध्यक्ष |
| २. | श्री.मनोहर विठ्ठल बने | – | उपाध्यक्ष |
| ३. | श्री.चंद्रकांत मुगुटराव खोपडे | – | चिटणीस |
| ४. | श्री.दिलीप साळुंखे | – | सभासद |
| ५. | श्री.मनोहर साळवी | – | सभासद |
| ६. | श्री.विजय ठाकरे | – | सभासद |
| ७. | श्री.राजेश कदम | – | सभासद |
| ८. | श्री.प्रभाकर पवार | – | सभासद |
| ९. | श्रीमती स्मिता राणे | – | सभासद |
| १०. | श्रीमती निवेदिता देशमुख | – | सभासद |

मराठा मंदिराची ‘ विद्यावर्धिनी ’ ही शाखा मराठी माध्यमांची ६ माध्यमिक विद्यालये, १ रात्र शाळा, १ अध्यापक विद्यालय, २ कनिष्ठ महाविद्यालये तसेच १ इंग्रजी माध्यमाची पूर्व प्राथमिक ते माध्यमिक शाळांचे व्यवस्थापन समर्थपणे आणि सक्षमरित्या सांभाळीत आहे. अहवालसाली या शाळांमध्ये एकूण ६८६७ विद्यार्थी शिकत असून शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी मिळून एकूण २६० कर्मचारी कार्यरत आहेत. मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या अथक योगदानामुळे विद्यार्थी यशाची नवी–नवी शिखरे पादाक्रांत करीत आहेत व त्याची दखल संस्था आणि पालक घेत असतात. मराठा मंदिरच्या या शाळांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा तक्ता क्र.२ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**तक्ता क्र.१**

**मराठा मंदिराच्या विविध शाळांतील सन २०१९–२०२० मधील विद्यार्थी, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी**

| अ. क्र. | शाळेचे नाव | विद्यार्थी संख्या | शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | म.मं.बाबासाहेब गावडे हायस्कूल, वरळी, मुंबई ४०० ०१८. इयत्ता ५वी ते १०वी | ८८ | १० |
| ०२ | म.मं.श्री शहाजी हायस्कूल, अक्कलकोट, जि.सोलापूर. इयत्ता ५वी ते १०वी | ११३२ | ४७ |
| ०३ | म.मं.श्री रामराव विद्यामंदिर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, जत, जि.सांगली. (इयत्ता ५वी ते १०वी आणि कनिष्ठ महाविद्यालय शास्त्र व व्यवसाय शिक्षण) | २२०० | ७९ |
| | बालवाडी(विनाअनुदानित) आणि इयत्ता पहिली ते चौथी | ३५८ | |
| ०४ | म.मं.वरळी रात्र शाळा, वरळी, मुंबई ४०० ०१८. इयत्ता ८वी ते १०वी | ७२ | ०५ |
| ०५ | म.मं.श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशाला, अक्कलकोट, जि. सोलापूर. इयत्ता ५वी ते १०वी | ३४४ | १२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०६ | म.मं.न्यू इंग्लिश हायस्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेज, पाली, जि.रत्नागिरी इयत्ता ५वी ते १०वी आणि कनिष्ठ महाविद्यालय (कला, वाणिज्य आणि शास्त्र) | १४५६ | ५० |
| ०७ | म.मं.अ.के.देसाई हायस्कूल, रत्नागिरी, जि.रत्नागिरी. इयत्ता ५वी ते १०वी | २३९ | १२ |
| ०८ | म.मं.बाबासाहेब गावडे इंग्रजी माध्यम शाळा, वरळी, मुंबई ४०० ०१८.<br>(विनाअनुदानित परंतु मुंबई महानगरपालिका व महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त)<br>अ)नर्सरी ते सिनि.के.जी.<br>ब) इ.१ ली ते चौथी<br>क) इयत्ता ५वी ते १०वी | <br><br><br>९३<br>३०६<br>५३१ | ३३ |
| ०९ | म.मं.स.रा.देसाई अध्यापक विद्यालय, रत्नागिरी, जि.रत्नागिरी. | ४८ | १२ |
| | **एकूण** | **६८६७** | **२६०** |

**तक्ता क्र.२**

इ.१०वी १२ वी तसेच डी.एड्. निकालाची माहिती.

| अ. क्र. | शाळेचे नाव | इयत्ता | बोर्डाच्या परीक्षेच्या निकालाची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | | | **मार्च २०१९** | **मार्च २०२०** |
| ०१ | म.मं.बाबासाहेब गावडे हायस्कूल, वरळी, मुंबई. | १० वी | ६५ | ९४.४४ |
| ०२ | म.मं.श्री शहाजी हायस्कूल, अक्कलकोट, जि.सोलापूर. | १०वी | ७२.६० | ९९.०९ |
| ०३ | म.मं.श्री रामराव वि.मं. हायस्कूल, जत,जि.सांगली. | १०वी<br>१२वी विज्ञान<br>१२वी व्यवसाय | ९१.६६<br>९८.५४<br>८७.३० | ९८.२५<br>१००<br>८८.९० |
| ०४ | म.मं.वरळी रात्र शाळा, वरळी, मुंबई. | १० वी | ८७ | ९० |
| ०५ | म.मं.श्रीमंत रा.नि.रा. कन्या प्रशाला, अक्कलकोट, जि.सोलापूर. | १०वी | ५१.७२ | १०० |
| ०६ | म.मं.न्यू इंग्लिश हायस्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेज, पाली, जि.रत्नागिरी. | १०वी<br>१२वी कला<br>१२ वी वाणिज्य<br>१२ वी विज्ञान | ९०.९५<br>८३.०५<br>१००<br>९८.७५ | ९९.५९<br>९५.६५<br>१००<br>१०० |
| ०७ | म.मं.अ.के.देसाई हायस्कूल, रत्नागिरी, जि.रत्नागिरी. | १०वी | ६५.४५ | ९१.०७ |
| ०८ | म.मं.बाबासाहेब गावडे इंग्रजी माध्यम शाळा, वरळी, मुंबई. | १०वी | ८८.८८ | १०० |
| ०९ | म.मं.स.रा.देसाई अध्यापक विद्यालय, रत्नागिरी, जि.रत्नागिरी. | डी.एड्. | ७० | ८० |

# मराठा मंदिर बाबासाहेब गावडे हायस्कूल, वरळी (१९३८)

शाळेत अहवालसाली ५४ विद्यार्थी व ३४ विद्यार्थीनी मिळून एकूण ८८ विद्यार्थी आहेत.

शिक्षक ६ व ४ शिक्षकेतर कर्मचारी मिळून १० कर्मचारी या शाळेत कार्यरत आहेत.

मार्च २०२० मध्ये घेण्यात आलेल्या एस्.एस्.सी परीक्षेचा निकाल ९४.४४% लागला आहे.

**शैक्षणिक वर्षात केलेले उल्लेखनीय कार्य :-**

- सांस्कृतिक समितीच्यावतीने गुरुपौर्णिमा, थोर नेत्यांच्या जयंत्या योग दिन, शिवजयंती उत्सव, मराठी भाषा दिन इत्यादी दिवस साजरे करण्यात आले. अध्ययन नव्हेच तर अध्यापन करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना यावा म्हणून शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

- बर्हिशालेय समितीच्यावतीने निबंध, पाठांतर स्पर्धा, नृत्य स्पर्धा, गीतगायन स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धामध्ये विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले.

- शासकीय एलिमेंट्री व इंटरमिजीएट चित्रकला स्पर्धेसाठी २० विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. बाल दिनाचे औचित्य साधून शाळेमध्ये चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.

- परीक्षा समितीच्यावतीने वर्षभरात घेण्यात आलेल्या परीक्षांची माहिती पालकांना देण्यात आली. महाराष्ट्र शिक्षण विभाग निर्देशानुसार घटक चाचणी, प्रथम सत्र परीक्षा, पूर्व परीक्षा नियोजनानुसार पार पडल्या. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे द्वितीय सत्र परीक्षा शासनाने रद्द केल्या.

- विज्ञान समितीच्यावतीने विज्ञान शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली डिसेंबर २०१९ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या विभागीय विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. श्री.के.डी.शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'जल प्रदुषणावरील उपाय योजना' या विषयावर प्रकल्प सादर करण्यात आला. यामध्ये इयत्ता १०वीच्या विद्यार्थीनी सेजल कांबळे व प्रणाली कांबळे यांचा सहभाग होता.

- विद्यार्थ्यांच्या हितासाठी गठीत करण्यात आलेल्या शिक्षक पालक संघाच्या वर्षभरात चार सभा घेण्यात आल्या. या सभांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा, आरोग्यविषयक जागरुकता,विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती यासारख्या विषयांवर चर्चा करुन सहविचारांचे देवाणघेवाण करण्यात आली.

- शाळेमध्ये 'रोटरी क्लब इंटरॅक्ट क्लब'ची स्थापना करण्यात आली.
- 'विमानसेवा' मार्गदर्शनपर करियर ओरिएंटेड व्याख्यान शाळेत आयोजित करण्यात आले.
- क्रीडा समितीच्यावतीने डिसेंबर महिन्यात क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

- शाळेच्या विविध समितीच्यावतीने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा तसेच वार्षिक गुणवत्ता यादीत सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. श्री.उत्तम केंजळे या माजी विद्यार्थ्याच्या हस्ते ही पारितोषिके देण्यात आली. याप्रसंगी श्री.उत्तम केंजळे यांनी विद्यार्थ्यांना खाऊ वाटला.
- शाळेतील विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या काही वैयक्तिक अडचणी, सामाजिक त्रास इत्यादी समस्या व त्यांचे निराकरण करण्यासाठी वरळी पोलीस स्टेशनतर्फे 'पोलीस दिदि' ची नेमणूक करण्यात आली होती. त्यांची मदत शाळेला झाली. वरळी पोलीस स्टेशनचे शाळेला वेळोवेळी सहकार्य लाभत असते.

- अंमली पदार्थाविरोधी मोहीम या विषयावर मुंबई-नार्कोटिक्स या संस्थेच्या प्रतिनिधींनी मार्गदर्शन केले. वरळी पोलीस स्टेशनतर्फे विविध हत्यारांची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी याकरिता प्रदर्शन भरविण्यात आले. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांचा उत्साह चांगला होता.

- पोद्दार हॉस्पीटल, वरळी, मुंबईच्यावतीने शारिरीक स्वच्छता, साथीचे रोग, याबाबत कशी काळजी घ्यावी याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले.

- रोटरी क्लब ऑफ नॉर्थ बॉम्बेच्यावतीने वरळी परीसरातील विद्यार्थी-पालक यांच्यासाठी मोफत दंतचिकित्सा शिबीर आयोजित केले होत. या शिबीराचा फायदा १२० पालकांनी घेतला. मसिना हॉस्पीटल, भायखळा, मुंबई येथे फॉलोअप घेण्यात आला.

- मराठा मंदिरच्या अमृत महोत्सवानिमित्त शाळेच्या आवारात आजी-माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला. हा मेळावा म.मं.ठाकूरद्वार हायस्कूल व म.मं.बाबासाहेब गावडे हायस्कूल यांच्यातर्फे संयुक्तपणे आयोजित करण्यात आला. गतकाळातील विद्यार्थी जीवनाला उजाळा देत आठवणी सादर करत साजरा करण्यात आला.

**प्राप्त झालेल्या देणग्या व इतर स्वरुपात मिळालेली रक्कम.**

- 'आंबेडकर भवन ट्रस्ट' वरळी, मुंबई यांच्यावतीने इयत्ता १०वीच्या २५ विद्यार्थ्यांना प्रश्नसंच, एक्झाम पॅड, फाईल फोल्डर, कंपास इत्यादी साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले.

- प्रॉक्टर अँड गॅम्बल कंपनीच्यावतीने 'वयात येताना' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान देण्यात आले. तसेच सॅनीटरी नॅपकिन्सचे मोफत वाटप करण्यात आले.

- चंद्रबाबा मंदिर ट्रस्ट, वरळी, मुंबई यांच्यातर्फे या वर्षी इयत्ता १०वीच्या ३० विद्यार्थ्यांना संपूर्ण पाठ्यपुस्तक संच मोफत मिळवून दिले. त्याची रक्कम रु.३१,२३६/- धनादेशस्वरुपात देण्यात आली. सहशिक्षिका सौ.एस.वाय.कारंडे यांनी यासाठी प्रयत्न केले.

- समता महिला मंडळ, मरीनलाईन्स, मुंबईच्यावतीने रु.२६,१६७/- रुपयांचे गणवेश विद्यार्थ्यांना देण्यात आले. यासाठी सौ.एस.वाय.कारडे सहशिक्षिका यांनी प्रयत्न केले.

- रोटरी क्लब ऑफ नॉर्थ बॉम्बे या सेवाभावी संस्थेकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत म्हणून शालोपयोगी वस्तुंसाठी रु.६७,९५०/- चा धनादेश शाळेला प्राप्त झाला.

αα

## मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूल, अक्कलकोट (१९४८)

शाळेत अहवालसाली ६८७ विद्यार्थी व ४४५ विद्यार्थीनी मिळून एकूण ११३२ विद्यार्थी आहेत.

३८ शिक्षक व ०८ शिक्षकेतर कर्मचारी मिळून ४७ कर्मचारी या शाळेत कार्यरत आहेत.

मार्च २०२० मध्ये घेण्यात आलेल्या एस्.एस्.सी.परीक्षेचा निकाल ९९.०९% लागला.

**या वर्षात केलेले उल्लेखनीय कार्य :-**

- शैक्षणिक उपक्रमांबरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या ज्ञानात वाढ व्हावी, आत्मविश्वास वाढावा म्हणून वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, नृत्य स्पर्धा इत्यादी वविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.
- क्रीडा विभाग हा शाळेचा मानबिंदू आहे. विविध खेळ प्रकारात विद्यार्थ्यांनी दरवर्षाप्रमाणे यंदाही आपले वर्चस्व कायम ठेवत उज्वल यश संपादन केले.

- तालुकास्तरावर यश संपादन करुन खालील विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय सामन्यासाठी निवड झाली.

| विद्यार्थ्यांचे नाव | स्पर्धा प्रकार | क्रमांक |
|---|---|---|
| १४ वर्षाखालील मुले/मुली | | |
| प्रिती माने | ६०० मी. व २०० मी. धावणे | प्रथम |
| प्रथमेश लोंढे | गोळा फेक, थाळी फेक | प्रथम |
| शंकर कोळी | ६०० मी.धावणे | प्रथम |
| १७ वर्षाखालील मुले/मुली | | |
| खैरुन्निसा काझी | हातोडा फेक, भाला फेक, थाळी फेक | प्रथम |

| | | |
|---|---|---|
| लक्ष्मी चेंडके | बांबू उडी | प्रथम |
| यशराज विभूते | हातोडा फेक, गोळा फेक | प्रथम |
| संदीप विभूते | बांबू उडी | तृतीय |
| प्रभुलिंग अनगले | ३००० मी.धावणे<br>१५०० मी. धावणे | प्रथम<br>द्वितीय,<br>क्रॉस कंट्री पाचवा क्रमांक |
| यश शिर्के | ट्रीपल जंप | द्वितीय |
| अमित जानकर | ११० मी.हर्डल्स | तृतीय |

प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळविलेल्या सर्व खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

जिल्हास्तरीय स्पर्धा :-

| विद्यार्थ्यांचे नाव | स्पर्धा प्रकार | क्रमांक |
|---|---|---|
| खैरुन्निसा काझी | हातोडा फेक<br>भाला फेक | प्रथम<br>द्वितीय |
| लक्ष्मी चेंडके | बांबू उडी | द्वितीय |
| यशराज विभूते | हातोडा फेक | प्रथम |
| प्रथमेश लोंढे | गोळा फेक | तृतीय |

विशेष उल्लेखनिय बाब म्हणजे विद्यार्थीनी खैरुन्निसा काझी, हातोडा फेक स्पर्धा, लक्ष्मी चेंडके, बांबु उडीस्पर्धा यांची वयोवर्ष १८च्या खालील गटामध्ये ॲथलेटिक्स असोसिएशन राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच कांदबरी पाटील या विद्यार्थीनीने पुणे सिकई  मार्शल आर्ट क्रीडा प्रकारात पुणे विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला.

तसेच १७ वर्षाखालील मुले या संघाने थ्रो बॉल स्पर्धेत जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळविला.

- शासकीय धोरणानुसार साजरे करावयाच्या उपक्रमांमध्ये शाळा नेहमीच अग्रभागी असते. छत्रपती शाहू महाराज जयंत, गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुपूजन, विविध नेत्यांच्या जयंत्या, विविध नेत्यांच्या पुण्यातिथ्या, क्रांती दिन सप्ताह, शिक्षक दिन, हिंदी दिन, संविधान दिन,  हुतात्मा दिन इत्यादी दिन साजरे करण्यात आले.
- शाळेतील छात्रसेना पथकामध्ये ५० छात्रसैनिक प्रशिक्षण घेत असून या पथकामध्ये  २२ मुली व २८ मुले आहेत. कॅडेट प्रशिल माने व कॅडेट **वर्षाराणी हंद्राळमठ** या दोन्हीं कॅडेस्नी पुणे येथील कॅम्पमध्ये सुवर्णपदक मिळविले. त्याचबरोबर कॅडेट **प्रशिल माने** याने प्री.आर.डी.सी.कॅम्पमध्ये सहभाग नोंदवून शाळेचे नाव उज्ज्वल केले.
- शाळेत स्काऊट-गाईडची एकूण २४ पथके कार्यरत असून १९४ स्काऊट व २३९ गाईडची मिळून एकूण संख्या ४३३ असून शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या सर्व उपक्रमात सर्वजण सहभागी होतात. २४ शिक्षक व शिक्षिका या विभागामध्ये कार्यरत आहेत. या वर्षी स्काऊट-गाईडची चळवळ गतिमान करण्यासाठी गुणवत्ता विकासांतर्गत समुदाय विकास प्रकल्प राबविण्यासाठी जिल्ह्यातून शाळेची निवड करण्यात आली. त्यानुसार शाळेने 'स्वच्छ भारत अभियान', पाणी बचत, हागणदारीमुक्त, राष्ट्रीय एकात्मता, ऊर्जा दिन, स्काऊट/गाईड स्थापना दिन, राष्ट्रीय सण, वृक्षारोपण व 'बेटी बचाओ अभियान' यशस्वीपणे राबविले.
- शास्त्र विभागाच्यावतीने तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन दि.२३ व २४ डिसेंबर २०१९ रोजी सी.बी.खेडगी कॉलेज, अक्कलकोट भरविण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनात प्रशालेचे इयत्ता ५वी ते १०वीचे सर्व वर्ग मिळून ३८ उपकरणे मांडण्यात आली होती. तालुक्यातून सर्वात जास्त उपकरणांची मांडणी करण्याचा मान शाळेला मिळाला. या उपकरणांसाठी विज्ञान शिक्षकांनी परिश्रम घेतले.
- प्रशालेचे स्वतंत्र, समृध्द ग्रंथालय व शासकीय पुस्तक पेढी असून प्रशालेतील शिक्षक व विद्यार्थी यांचा लाभ घेतात. मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेतील वाचनीय ग्रंथसाहित्य या ग्रंथालयात आहे. ग्रंथालयातील ग्रंथसंख्या ८९९७ आहे. यामध्ये महाराष्ट्र ज्ञानकोश-शब्दकोश, विश्वकोश, इनसायक्लोपिडीया, ब्रिटानिका, हस्टोरियन्स हिस्ट्री ऑफ वर्ल्ड इत्यादी संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत. या विभागामार्फत ग्रंथालय दिन, शिक्षक दिन, पुस्तक दिन व प्रवेशोत्सव दिन इत्यादी उपक्रम अहवालसाली राबविण्यात आले. प्रशालेतील विद्यार्थी व विद्यार्थीनी त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ग्रंथालयास ग्रंथ भेट देतात.

- मोफत पाठ्यपुस्तक पुरवठा योजनेद्वारे इयत्ता ५वी ते ८वीच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.

**शैक्षणिक वर्षात शाळेला मिळालेल्या देणग्या :-**

- चालू वर्षात देणग्या व इतर स्वरुपात मिळालेली एकत्रित रक्कम - रु.५,७८,६२२/-
- श्री.महेश इंगळे, अध्यक्ष स्वामी समर्थ वटवृक्ष देवस्थान यांनी शालेय सभागृहाचे फरशीकरण करुन दिले.
- श्री. सर्जेराव जाधव चॅरटिबल ट्रस्ट, अक्कलकोट यांच्याकडून १० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.
- शाळेच्या शिक्षक पतसंस्थेकडून शाळेतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना एस.एस.सी. परीक्षेची फॉर्म फी रु.१५००/- देण्यात आली.
- सहशिक्षक श्री.विकास एल.राऊत यांनी शाळेच्या ग्रंथालयाला रु.१२,०००/- ची पुस्तके भेट दिली.
- सहशिक्षक श्री.आर.एस.पडवळकर आणि लिपिक श्री.एम.टी.घाटगे यांनी विद्यार्थ्यांसाठी सायकल स्टँड बसवून देण्यात आले.
- सहशिक्षक श्री.वाय.पी.कबाडे, श्री.एम.एस.अहिरे, श्री.आर.ए.जाधव, श्री.एस.आर. साळुंके, श्री.आर. एस. पडवळकर आणि मुख्य लिपिक श्री.पी.वाय.राजगुरु यांना त्यांच्या क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याबद्दल विविध संस्थांनी आदर्श पुरस्काराने सन्मानित केले.

**पुढील वर्षासाठी आखलेल्या योजना :-**

- शाळा व वर्ग सुशोभित करणे.
- ग्रंथालयातील पुस्तकांची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.
- विद्यार्थी संख्या वाढविणे व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे.
- विद्यार्थ्यांची हस्तलिखिते तयार करणे.
- इ.५वी ते ८वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी वाचन-लेखन व हस्ताक्षर सुधारणा करणे.
- इ.१०वीच्या विद्यार्थ्यांसाठी जादा तासांचे नियोजन करणे व मुलांसाठी रात्रशाळा अभ्यासिकेचे नियोजन करणे.
- गरीब विद्यार्थ्यांसाठी गणवेष वाटप.
- दत्तक पालक योजना राबविणे.

αα

## मराठा मंदिर श्री रामराव विद्यामंदिर हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, जत. (१९४८)

शाळेत अहवालसाली ११३९ विद्यार्थी आणि विद्यार्थीनी ८६४ मिळून एकूण २००३ विद्यार्थी आहेत.

कनिष्ठ महाविद्यालयात ३१७ विद्यार्थी व विद्यार्थीनी २३८ मिळून एकूण ५५५ विद्यार्थी आहेत.

६७ शिक्षक व १२ शिक्षकेतर कर्मचारी मिळून ७९ कर्मचारी या शाळेत कार्यरत आहेत.

मार्च २०२० मध्ये घेण्यात आलेल्या एस्.एस्.सी.परीक्षेचा निकाल ९८.२५%

एच्.एस्.सी. परीक्षेचा निकाल (अ) विज्ञान शाखा १००% (ब) व्यवसाय शिक्षण शाखा ८८.९०%

**शैक्षणिक वर्षात केलेले उल्लेखनीय कार्य :-**

- ॲवॉर्ड ऑफ एक्सलन्सी या पुरस्काराचे हे पाचवे वर्ष. शाळेचे सेवानिवृत्त आदर्श राज्य पुरस्कार प्राप्त कलायोगी कला शिक्षक श्री.आर.ए.पाटील यांच्यावतीने मुलांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी या पुरस्काराने सन्मानित केले जाते. शाळेत प्रवेश घेतल्यापासून इयत्ता १०वी पर्यंत जास्तीत जास्त चित्रकला स्पर्धेत पुरस्कार मिळविणाऱ्या

विद्यार्थ्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यप २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षात हा पुरस्कार इयत्ता १०वीमधील विद्यार्थीनी **वैष्णवी प्रमोद हंकारे** व **अपूर्वा बजरंग व्हनमाने** यांची निवड करण्यात आली. या दोन्हीं विद्यार्थीनींना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

- ज्येष्ठ कलाशिक्षक श्री.संजीव आनंदराव नलवडे यांनी विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव मिळण्यासाठी दै.तरूण भारत यांनी आयोजित केलेल्या चित्रकलास्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात दर आठवड्याला होणाऱ्या स्पर्धेसाठी सहभागी करुन योग्य मार्गदर्शन केले. या अभिनव उपक्रमाच्या माध्यमातून शाळेच्या यशात भर घातली गेली असून या स्पर्धेत ५१ विद्यार्थ्यांनी पुरस्कार प्राप्त केला आहे. तरूण भारत यांनी या कार्याची दखल घेऊन संबंधित कला शिक्षकांची नोंद घेऊन त्यांना सन्मानित करण्याचे ठरविले आहे.

- मार्च २०२० मध्ये शिष्यवृत्ती व नवोदय विद्यालयाने घेतलेल्या परीक्षेत इयत्ता ५वी चे ४८ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी पात्र विद्यार्थी २२ व निकाल ४५.८३% लागला. या विद्यार्थ्यांपैकी खालील २ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

| नाव | गुण | जिल्हा यादीतील क्रमांक |
|---|---|---|
| गिरीजा राहूल भोसले | २६८/२९६ | १२ |
| सौम्या बसवराज नेसूर | २४४/२९६ | ८६ |

- सामाजिक परिवर्तनाचे द्रष्टे संत ज्ञानेश्वर यांच्या नावे सुरू असलेल्या व्याख्यानमालेचे हे २५ वर्ष. ही व्याख्यानमाला दि.२२ नोव्हेंबर २०१९ ते २४ नोव्हेंबर २०१९ या कालावधीत संपन्न झाली. या व्याख्यानमालेस खालीलप्रमाणे वक्ते लाभले.

१. श्री.इंद्रजीत देशमुख (सातारा) – पसायदान
२. श्री.विश्वास पाटील(कोल्हापूर) – पानिपत झाडाझडती ते संभाजी मराठी साहित्य साधना.
३. श्री.जयवंत आवटे(इस्लामपूर) – कथाकथन

या कार्यक्रमास दि.२२ नोव्हेंबर २०१९ रोजी श्री.विलासराव देशमुख सन्मा.उपाध्यक्ष, मराठा मंदिर व त्यांच्या पत्नी उपस्थित होत्या. तसेच श्रीमंत इंद्रजीतराजे डफळेही उपस्थित होते.

- शालाबाह्य वक्तृत्व स्पर्धा – समाज प्रबोधन करुन समाजामामध्ये कालानुरूप परिवर्तन व्हावे या हेतूने गेली अनेक वर्ष कार्यरत असलेली मराठा समाज, सांगली या संस्थेच्यावतीने घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत सहभागी झालेल्या **प्रज्ञा बाबासाहेब काटे** या विद्यार्थीनीने तृतीय क्रमांक पटकाविला.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या लोकमान्य टिळक जयंती स्पर्धेत **प्रज्ञा बाबासाहेब काटे** हिने तृतीय क्रमांक पटकाविला.

जत पोलीस स्टेशन यांच्यावतीने निर्भया पथकमार्फत आयोजित जत व कवठेमहाकाळ तालुका अंतर्गत भव्य चित्रकला, रांगोळी व निबंध स्पर्धेत शाळेने उज्वल यश संपादन केले. या स्पर्धेकरिता परीक्षक म्हणून कला शिक्षक श्री.एस.ए.नलवडे, पर्यवेक्षिका सौ.एस.के.सावंत व सहशिक्षक श्री.एस.आर.चिपटे यांनी काम पाहिले. जत पोलीस विभाग प्रमुख सन्मा.जगदाळे व शेळके यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना व परीक्षकांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्रके देऊन गौरविण्यात आले.

- शाळेत एन.सी.सी.टुप कार्यरत असून या शैक्षणिक वर्षात त्यामध्ये एकूण १०० एन.सी.सी.कॅडेटस् आहेत. त्यामध्ये प्रथम वर्षात ५४ विद्यार्थी व द्वितीय वर्षात ४६ विद्यार्थी आहेत. प्रत्येक वर्षी द्वितीय वर्षाच्या एन.सी.सी. कॅडेटस्करिता ए प्रमाणपत्र परीक्षा घेतली जाते. या परीक्षेचा निकाल दरवर्षी १००% लागतो.

या शैक्षणिक वर्षात वार्षिक प्रशिक्षण शिबीर(एटीसी) दि.१८ जुलै २०१९ ते २७ जुलै २०१९ या कालावधीत शांतीनिकेतन, सांगली येथे संपन्न झाले. या दहा दिवसांच्या शिबीरात एनसीसी कॅडेटसने ड्रील कॉम्पिटिशनमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे सन २०१९-२० एनसीसी टुप (जेडब्ल्यू) सुरू  झाला असून त्यामध्ये १६ विद्यार्थीनींचा समावेश आहे.

या वर्षात एनसीसी विभागामार्फत वृक्षारोपण, स्वच्छ भारत अभियान, सर्जिकल स्ट्राईक व्याख्यान, डिजिटल भारत अभियान, खो खो स्पर्धा, आत्मनिर्भर भारत एनसीसी डे आणि ड्रील स्पर्धा असे विविध उपक्रम राबविण्यात आले. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी राष्ट्रीय सणांनिमित्त शाळेत एनसीसी कॅडेटस्नी उत्कष्ट संचलन केले.

- या शैक्षणिक वर्षात रक्षाबंधन, जागतिक महिला दिन, स्वच्छ भारत मिशन, वृक्षारोपण, वृक्षदिंडी, साक्षरता अभियान व अंधश्रध्दा निमूर्लनासाठी प्रभात फेरी इत्यादींचे आयोजन करण्यात आले.

दि.२८ ऑगस्ट २०१९ रोजी जत येथील मुकबधिर विद्यार्थ्यांना शाळेच्या गाईडसनी राख्या बांधून अनोखी राखीपौर्णिमा साजरी केली. यावेळी मुलांना शाळेमार्फत अल्पोपहार देण्यात आला.

- दि.२२ फेब्रुवारी २०२० रोजी लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या जयंतीनिमित्त चिंतन दिन साजरा करण्यात आला.

- या शैक्षणिक वर्षात इयत्ता ९वीच्या सर्व वर्गांना महाराष्ट्र छात्र सेना हा विषय शिकविला गेला. या विषयाचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांची परीक्षा घेतली जाते. शेवटी वार्षिक निकालाच्या वेळी १०० पैकी सरासरी काढून श्रेणी दिली जाते.

- या शैक्षणिक वर्षात इयत्ता ९वी व १०वीच्या सर्व विद्यार्थ्यांना Non Testing समुपदेशन करण्यात आले. मानसशास्त्रीय कसोट्याद्वारे विद्यार्थ्यांना बुध्दीमापन व समुपदेशन याचे महत्व सांगण्यात आले. तसेच तालुक्यातील विविध शाळांमध्ये वर्षभर समुपदेशक म्हणून सहशिक्षक श्री.एस.एन.सरक यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील अभ्यासक्रम व समायोजन, रस संशोधन या विषयावर मार्गदर्शन केले. कोवीड-१९ या महामारीच्या परिस्थितीत जिल्ह्यातील शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे जिल्हा शिक्षक प्रसिक्षण संस्था, सांगली यांचेकडून समुपदेशक म्हणून निवड करण्यात आली.

- दि.१४ डिसेंबर २०१९ रोजी प्रशालेच्या प्रांगणात विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात एकूण ३३ उपकरणांची मांडणी केली होती. सदर उपकरणांमधून इयत्ता ८वीमधील **किरण विजय नाईक या** विद्यार्थ्याने तयार केलेले मानवी यंत्र या उपकरणाची तालुका विज्ञान प्रदर्शनाकरिता निवड करण्यात आली. या उपकरणास तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळाला. तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात **श्री.आर.डी.पाटील, सहशिक्षक** यांच्या 'भागाकार यंत्र' या उपकरणास तालुकास्तरावर प्रथम क्रमांक तर **श्री.के.जी.बळवंतराव, सहशिक्षक** यांच्या 'बेटी बचाव' या प्रकल्पास द्वितीय क्रमांक मिळाला.

- दि.२६ जानेवारी २०२० रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त जत वासियांसाठी बालवाडी ते इयत्ता ९वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा निवडक गुणदर्शनाचा मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमास जतवासी बहुसंख्येने उपस्थित होते.

- प्रशालेच्या प्राथमिक विभागाच्यावतीने दि.१५/०८/२०१८ रोजी वेशभूषा व शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. शोभायात्रेत विद्यार्थी बहुसंख्येने सहभागी झाले होते. राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविणारी ही शोभायात्रा जत शहरातून काढण्यात आली.

- शाळेमध्ये स्वतंत्र संगणक विभाग असून त्यामध्ये २५ संगणक, १ प्रिंटर व स्कॅनर तसेच १ प्रोजेक्टर, १ व्हाईट स्क्रीन व व्हॅक्युमक्लिनर आहे. या विभागाचे व्यवस्थापन प्रशालेद्वारे केले जाते. तसेच इयत्ता ११ वी १२ वी शास्त्र विभागाकरिता स्वतंत्र माहिती तंत्रज्ञान विषय विनाअनुदान तत्त्वावर चालविला जातो. या विभागाचा निकाल १००% लागतो.

केंद्र शासन पुरस्कृत आय.सी.टी.सरेजलर फेज-२ अंतर्गत एकूण १० संगणक संच, १ प्रिंटर, १० युपीएस तसेच २१ खुर्च्या इत्यादी साहित्य प्राप्त झाले असून या संगणकांचा लाभ इयत्ता ५वी ते १०वीचे विद्यार्थी घेत आहेत.

- शाळेत सुसज्ज असे ग्रंथालय असून माध्यमिक विभागासाठी १२३४१, उच्च माध्यमिक विभागासाठी २१२७ पुस्तके आहेत. तर व्यवसाय शिक्षण विभागाकरिता ९११ पुस्तके आहेत. तसेच ८ दैनिके, १ साप्ताहिक व ६ मासिके आहेत. तसेच इयत्ता ५वी ते १०वीसाठी विषयानुसार १५० शिक्षक हस्तपुस्तिका उपलब्ध आहेत.

- तंत्रस्नेही सहशिक्षक श्री.सलामे प्रमोद मारुती यांनी विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमास पूरक काही तंत्रज्ञानात्मक बाबींचा वापर करुन खालीलप्रमाणे नवीन शैक्षणिक साहित्य निर्मितीचा प्रयत्न केला आहे.

  १. SPRAMOD नावाने व्हिडीओ निर्मिती

  २. Pramo salame १९८२. Pblohdpoy.com

  ३. निकालांचे excel software

  ४. Online चर्चानिर्मती

  ५.अभ्याक्रमावर आधारित पी.पी.टी.

- राष्ट्रीय हरितसेना विभागामार्फत पर्यावरण, वृक्षसंवर्धन व जलसंवर्धन याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण व्हावी म्हणून विविध स्पर्धा व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दि.१५ सप्टेंबर २०१९ रोजी ओझोन दिनाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. तसेच दि.२५ ऑक्टोबर २०१९ रोजी दिवाळीत फटाके फोडले जातात त्याचे होणारे दुष्परिणाम यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनाच्यावतीने शिष्यवृत्ती दिली जाते. या शैक्षणिक वर्षात प्रशालेतील १७ विद्यार्थी परीक्षेस बसले होते.त्यापैकी ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. निकाल ६४.७% लागला.

- प्रशालेच्या कला विभागाच्यातर्फे विविध नेत्यांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या, सावित्रीबाई फुले जन्मोत्सव, शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच दैनिक सकाळ, तरूण भारत, सामना यांच्यावतीने घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत विद्यार्थी सहभागी झाले होते.

  तसेच महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण, महाराष्ट्र शासनपुरस्कृत राष्ट्रीय स्तरावरील चित्रकला स्पर्धेकरिता इयत्ता ४थी ते ९वीचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. यापैकी तीन चित्रे राष्ट्रीयस्तरीय स्पर्धेसाठी पाठविण्यात आली आहेत.

  आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालय, भारत सरकार गोवर व रुबेला लसीकरण मोहिमअंतर्गत आयोजित शालेयस्तरावर चित्रकला व रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. तसेच जत नगर परिषद आयोजित जत शहरांतर्गत स्वच्छ व सुंदर जत चित्रकला स्पर्धेमध्ये प्रशालेच्या असंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन भरघोस यश संपादन केले.

  मराठा मंदिर संस्थेच्या अमृत महोत्सवानिमित्त भव्य चित्रकला व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

- १५ ऑगस्ट २०१९ स्वातंत्र्यदिनानिमित्त शारीरिक शिक्षण प्रात्यक्षिक करण्यात आले. यामध्ये ड्रील, मानवी मनोरे, टिपरी, साधनयुक्त कवायत, आसने, जिमनॅस्टिक व गीतंचातर्फे देशभक्तीपर गीत सादर करण्यात आली.

- तालुकास्तरीय विविध क्रीडा स्पर्धेमध्ये २०० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. प्रशाले तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला प्रमुख पाहुणे म्हणून म.मं.श्री शहाजी हायस्कूल, अक्कलकोटचे मुख्याध्यापक श्री.के.डी.सुर्वे यांना निमंत्रित करण्यात आले होते. शाळेतील विद्याथ्यानी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील बुध्दीबळ, भालाफेक, फुटबॉल अशा विविध स्पर्धेत सहभाग नोंदविला.

- प्राथमिक विभागातर्फे दि.१५ ऑगस्ट २०१९ व २६ जानेवारी २०२० रोजी नव्यानेच सुरु करण्यात आलेल्या स्काऊट व बँड पथकाचे संचलन मुख्य मैदानावर करण्यात आले.

- दि.१५ ऑगस्ट २०१९ रोजी प्राथमिक विभागच्या विद्यार्थ्यांचे वेशभूषा व शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता १ली ते ४थीमधील बहुसंख्य विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते. थोर राष्ट्रीय नेते, क्रांतीकारक व भारतीय सांस्कृतिक आणि राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविणारी शोभयात्रा जत शहरातून काढण्यात आली.

- मराठा मंदिर संस्थेच्या अमृत महोत्सवानिमित्त प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच इयत्ता १ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांकरिता अपूर्व मेळावा(विज्ञान प्रदर्शन) भरविण्यात

आले होते. या प्रदर्शनात १२० विद्यार्थी सहभागी होऊन शेती आधारित पवन चक्की त्यादी साहित्य उत्तम बनविले होते.

- या शैक्षणिक वर्षात प्राप्त झालेल्या देणग्या व इतर स्वरुपात मिळालेली एकत्रित रक्कम - रु.९,५२,५५०/-

**या वर्षात शाळेने विकासासाठी केलेले कार्य :**

संस्थाकालीन इमारतीच्या मागील दोन खोल्या दुरुस्तीचे काम पूर्ण.

**शाळेने पुढील वर्षासाठी आखलेल्या योजना :**

- शाळेची मागील इमारत व भारती विद्यापीठ कुंपण यामध्ये असलेलज्या मोकळ्या जागेत विद्यार्थीनींकरिता वेटींग रुम व्यवस्था करणे.
- कोवीड-१९च्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन शिक्षण प्रणालीकरिता अद्ययावत साधनसामुग्रीयुक्त वर्गखोल्या तयार करणे.

αα

## मराठा मंदिर रात्र शाळा, वरळी (१९५०)

शाळेत ४६ विद्यार्थी व २६ विद्यार्थीनी मिळून एकूण ७२ विद्यार्थी आहेत.

४ शिक्षक व १ शिक्षकेतर मिळून ५ कर्मचारी या शाळेत कार्यरत आहेत.

मार्च २०२० मध्ये घेण्यात आलेल्या एस्.एस्.सी. परीक्षेचा निकाल ९०% लागला आहे.

**विशेष उल्लेखनीय कार्य**

- रोहिदास सूर्यभान वाघ या विद्यार्थ्याने मार्च २०२० मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत ७४.२०% गुण मिळवून रात्र शाळेतून अंध विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला.
- रात्र शाळेचा निकाल ९०% लागल्याबद्दल प्रथम तीन विद्यार्थी व सर्व शिक्षकांचा गुण गौरव करण्यात आला.
- मार्च २०२१ चा शालांत परीक्षेचा निकाल १००% लागण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यासाठी सर्व शिक्षक ऑनलाईन झुम/गुगळ मिटच्या माध्यमातून दररोज विद्यार्थ्यांना शिकवित आहेत.
- ४५ वे वॉर्डस्तरीय विज्ञान प्रदर्शन जी दक्षिण विभाग व उत्तर-के विभागाच्यावतीने साने गुरुजी हायस्कूल, दादर, मुंबई येथे दि.०८/१२/२०१९ ते ११/१२/२०१९ या कालावधीमध्ये मा.शिक्षण निरीक्षक, दक्षिण विभाग, मुंबई यांनी आयोजित केले होते. या प्रदर्शनात शाळेने **'सीडस् बॉम्ब वापरुया पर्यावरणाचे रक्षण करुया'** हा ज्युनियर गटातील प्रकल्प सादर केला. या प्रदर्शनात सहभागी झाल्याबद्दल शाळेचा व विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला.

या विज्ञान प्रकल्पामध्ये शाळेचे दोन विद्यार्थी **विघ्नेश उदय खेडेकर** व **रंजना बाळू गोडे** तसेच सहशिक्षिका सौ. एस.के.बागले ह्या सहभागी झाल्या होत्या. रात्र शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री.आर.एम.कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प सादर करण्यात आला.

या प्रदर्शनात वक्तृत्व स्पर्धेत रोहित म्हेसमाळे हा विद्यार्थी सहभागी झाला होता. त्याला सहभागी प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

**रात्र शाळेला प्राप्त झालेल्या देणग्या व इतर स्वरुपात मिळालेली रक्कम.**

- ज्ञानसेवा फाऊंडेशन, प्रभादेवी, मुंबई यांच्याकडून इयत्ता ९वी व १०वीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येक १ नग याप्रमाणे शैक्षणिक पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

- इंसानियत असोसिएशन, वरळी, मुंबई या संस्थेचे अध्यक्ष श्री.शुभम लोखंडे यांच्या हस्ते शाळेतील सन २०१९-२०२० मध्ये माध्यमिक शालांत परीक्षेला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांना गणित प्रश्नसंच वाटप करण्यात आले.

- मासूम या सेवाभावी संस्थेतर्फे शाळेतील इयत्ता १०वीच्या विद्यार्थ्यांना लेखनिक पॅड, पेन्सिल, खोडरबर व पट्टी इत्यादी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

**रात्रशाळेने पुढील वर्षासाठी आखलेल्या योजना :-**

- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा निकालवृध्दीसाठी दररोज सायं.६ ते ६.३० या वेळेत जादा तासिका घेण्यात येणार आहेत. तसेच प्रत्येक रविवारी सकाळी ९.०० ते दुपारी २.०० या वेळेत अभ्यासवर्ग सुरु करण्यात येणार आहेत. आजमितीस सर्व शिक्षक ऑनलाईन झुम/गुगल मिटच्या माध्यमातून दररोज २ तास ऑनलाईन शिकवित आहेत.

- इयत्ता ९वी व १०वीच्या विद्यार्थ्यांना 'मासूम' संस्थेकडून क्रमिक पुस्तके, २१ अपेक्षित प्रश्नसंच व सर्व विषयांची महत्वाची प्रश्नोत्तरे असणारी पुस्तिका व व्याख्यानमाला घेऊन अभ्यास करवून घेणे. तसेच या वर्षी १००% निकाल लावण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

αα

## मराठा मंदिर श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशाला, अक्कलकोट.(१९६८)

शाळेतील विद्यार्थीनी संख्या ३४४ आहे.

०९ शिक्षक व ०३ शिक्षकेतर मिळून १२ कर्मचारी या शाळेत कार्यरत आहेत.

मार्च २०२० मध्ये घेण्यात आलेल्या एस्.एस्.सी.परीक्षेचा निकाल १००% लागला आहे.

**शैक्षणिक वर्षात केलेले उल्लेखनीय कार्य :-**

- शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये शाळेच्या सांस्कृतिक विभागाच्यावतीने विविध सांस्कृतिक उपक्रम राबविले गेले. विद्यार्थीनींच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, त्यांच्या ज्ञानात भर पडावी, त्यांचा आत्मविश्वास वाढावा, त्यांचा बौध्दिक विकास व्हावा यासाठी विविध विशेष दिनाच्या अनुषंगाने प्रशालेत वक्तृत्व स्पर्धा, पाठांतर स्पर्धा, निबंध स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, प्रश्नमंजुषा, भेटकार्ड स्पर्धा, हस्तकला स्पर्धा इत्यादी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

- थोर नेत्यांनी केलेल्या कार्य सदैव स्मरणात रहावे व या थोर नेत्यांचा आदर्श विद्यार्थ्यांसमोर रहावा यासाठी महान व्यक्तिंच्या जयंत्या व पुण्यतिथ्या साजऱ्या करण्यात आल्या. तसेच विज्ञान दिन, आरोग्य दिन, क्रांती दिन, शिक्षक दिन, संस्कृत दिन, बालक दिन, मराठा मंदिर संस्थापक दिन, महाराष्ट्र दिन, राष्ट्रीय दिन असे विशेष दिन देखील साजरे केले गेले.

- शाळेचा स्वतंत्र परीक्षा विभाग कार्यरत असून इयत्ता ५वी ते ९वीच्या विद्यार्थ्यांच्या सर्व परीक्षांचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता शालेय स्तरावर योग्यरितीने नियोजन करुन परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यात आल्या.

- केंद्र शासन व राज्य शासन संयुक्त शालेय पोषण आहार योजना प्रशालेतील इयत्ता ५वी ते ८वीच्या विद्यार्थीनीसाठी राबविली जाते. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये इयत्ता ५वी ते ८वीच्या एकूण २२० विद्यार्थीनींनी पोषण आहाराचा लाभ घेतला. या आहारासोबत लाभार्थी विद्यार्थीनींना आठवड्यातून एकदा पूरक आहार दिला जातो. शालेय पोषण आहार श्रीमंत तारामाता स्वयंसहायता महिला बचत गट, अक्कलकोट यांच्यामार्फत शिजवून दिला जातो.

**विशेष उल्लेखनीय कार्य**

- मराठा मंदिर अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या शैषणिक वर्षात हिरकणी महिला मंडळ, अक्कलकोट व अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाकडून सर्व विद्यार्थीनींची हिमोग्लोबीन, मधुमेह व आरोग्य तपासणी करण्यात

आली. अमृत महोत्सवानिमित्त विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात आले.

- श्री.शशिकांत गोडसे यांनी त्यांच्या मातोश्रीच्या नावे ठेवण्यात आलेल्या मुदत ठेवीवरील व्याजावर शाळेतील गरीब व होतकरु १८ विद्यार्थीनींना मोफत गणवेष देण्यात आले.

- यंदाच्या शैक्षणिक वर्षात शाळेच्या खेळाडूंनी नेत्रदिपक कामगिरी करुन सर्व क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले. तालुकास्तरावर वर्चस्व राखत जिल्हास्तर, विभागस्तर, राज्यस्तरावरही उज्जवल यश संपादन केले. या वर्षी शाळेची नवीन हॉकी टिम तयार करुन जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच उल्लेखनीय बाब म्हणजे शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत **नगम्मा रविंद्र बजे** ही विद्यार्थीनी बांबू उडी स्पर्धा प्रकारात १७ वर्षाखालील गटात सहभागी झाली होती.

- शाळेला प्राप्त झालेल्या देणग्या व इतर स्वरुपात मिळालेली एकत्रित रक्कम रुपये २,६५,११०/-.

**शाळेच्या विकासासाठी या वर्षात केलेले कार्य :**

- मराठा मंदिर संस्थेकडून रुपये ९१,४५०/- एवढ्या किंमतीची शाळेत संरक्षण भिंत(वॉल कंपाऊंड) बांधण्यात आली.

- शालेय समिती सदस्य सन्मा.अमोलराजे जन्मेंजयराजे भोसले(प्रमुख कार्यकारी विश्वस्त, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट) यांनी ६ सिमेंटचे बाकडे शाळेच्या प्रांगणात बसविण्यासाठी भेट म्हणून दिलेले आहेत.

- शिक्षक पालक संघाच्यावतीने शिक्षक पालक संघ निधीतून वर्गखोल्या व शाळेला रंग देण्यात आला. तसेच कोरोना(कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी विद्यार्थ्यांना सतत हात धुण्यासाठी १४ वॉशबेसीन बांधण्यात आले.

**पुढील वर्षासाठी आखलेल्या योजना :-**

- शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल वाढविणे.
- प्रत्येक विद्यार्थीनींना शिक्षक पालक संघाकडून वार्षिक नियोजन पुस्तिका देण्यात येणार.
- गरीब विद्यार्थीनींना गणवेश व वह्या यांचे मोफत वाटप करणे.
- शाळेचा पट वाढविसाठी परिसरातील शाळा व गावातील शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थीनी प्रवेशाबाबत प्रयत्न करणे.
- विद्यार्थीनींना संगणक साक्षर बनविणे.
- प्रशालेतील किरकोळ दुरुस्ती व नवीन प्रयोगशाळा बांधकाम करणे.

αα

## मराठा मंदिर स.रा.देसाई अध्यापक विद्यालय, रत्नागिरी (१९८०)

अध्यापक विद्यालयात विद्यार्थी २६ आणि विद्यार्थीनी २२ असे एकूण ४८ विद्यार्थी आहेत.
०८ शिक्षक ०४ शिक्षेकतर कर्मचारी मिळून १२ कर्मचारी या विद्यालयात कार्यरत आहेत.

जून २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या डि.टी.एड्. परीक्षेचा निकाल ८०% लागला. तो वाढविण्याचा प्रयत्न कसोशीने करणे.

**विशेष उल्लेखनीय कार्य :-**

- डी.एल.एड्.-(डी.एड्.- प्राथमिक अध्यापक शिक्षण पदविका) या दोन वर्षाचा शिक्षक प्रशिक्षणाचा कोर्स. सेवापूर्व प्रथम आणि द्वितीय वर्ष नियमित वर्ग व सेवांतर्गत प्रशिक्षण असे वर्ग चालविले जातात. या प्रशिक्षणानंतर विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षक/ शिक्षिका होण्याची संधी मिळते आणि सेवांतर्गत प्रशिक्षणार्थी शिक्षकांना शिक्षण पध्दती, मूल्यमापन व तंत्रे यांचे अद्ययावत ज्ञान मिळण्याची संधी असते.

**या वर्षात केलेले उल्लेखनीय कार्य :-**

- **प्रा.नेताजी कुंभार** यांनी जून २०१९ मध्ये सावित्रीबाई फुले विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय शिक्षक पात्रता परीक्षा(सेट) या विषयात सुयश संपादन केले.

**सहशालेय उपक्रम :-**

- दैनंदिन सफाई, परिपाठ, नवगतांचे स्वागत, वार्षिक स्नेहसंमेलन, विविध मान्यवरांच्या जयंती व पुण्यतिथी कार्यक्रम, रक्षाबंधन, वर्गसजावट, कात्रणे, भित्तीपत्रके, हस्तलिखित, वार्तापत्र, शाळा भेटी, संस्था भेटी, शालेय आंतरवासिता कार्यक्रम, शारदीय ज्ञानसत्र, ८ दिवसांचे शिक्षक व्यक्तिमत्व शिबीर उपक्रम, व्याख्याने, विविध मनारंजन कार्यक्रम, वार्षिक क्रीडा महोत्सव, द्वितीय वर्ष सदिच्छा समारंभ, डायट, रत्नागिरी विविध प्रशिक्षणे इ.उपक्रम राबविण्यात आले.

- विविध मान्यवरांच्या भेटी

  सन्मा.पदाधिकारी, मराठा मंदिर, मुंबई.

  सन्मा.पदाधिकारी, विद्यावर्धिनी मराठा मंदिर, मुंबई.

  प्राचार्य, डॉ.गजानन पाटील, डायट, रत्नागिरी.

  श्री.सतिश वानखेडे, यशदा पालक तथा प्रकल्प अधिकारी

  श्री.सुशील शिवलकर, निवासी प्राचार्य तथा वरिष्ठ अधिव्याख्याते, डायट, रत्नागिरी.

  श्री.सुहास पाटील, करिअर मार्गदर्शक, रायगड.

  डॉ.तारासिंह नाईक, शासकीय अध्यापक महाविद्यालय, रत्नगिरी.

- देणगीस्वरुपात व इतर स्वरुपात मिळालेली एकत्रित रक्कम- विद्यावर्धिनी निधी रुपये २४,९५०/-

२) वस्तूरुपाने देणगी - द्वितीय वर्ष विद्यार्थ्यांकडून २ जाजम, २ थर्मास भेट. तसेच श्री अरविंद जैन टाइटन मॉडेल स्टोअर, रत्नागिरी यांच्याकडून टाइटन कंपनीचे घडयाळ भेट.

**शाळेच्या विकासासाठी या वर्षात केलेले कार्य :-**

- विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास उपक्रमांचे आयोजन.
- महाविद्यालयाच्या अवारातील बागेची साफसफाई व सुशोभिकरण.
- माजी विद्यार्थी संघटना स्थापनेसाठी बैठकीचे आयोजन.

**पुढील वर्षासाठी आखलेल्या योजना :-**

- विद्यार्थी संख्या वाढीसाठी प्रयत्न करणे.
- माजी विद्यार्थी संघटनेची नोंदणी करणे व विद्यार्थी मेळावा आयोजित करणे.
- ऑनलाईन टिचिंगसाठी संगणक कक्ष अद्ययावत करणे.

αα

## मराठा मंदिर न्यू इंग्लिश हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, पाली (१९८०)

शाळेत ४४६ विद्यार्थी आणि ४३३ विद्यार्थीनी मिळून एकूण ८७९ विद्यार्थी आहेत.

तर कनिष्ठ महाविद्यालयात ३१९ विद्यार्थी आणि २५८ विद्यार्थीनी मिळून एकूण ५७७ विद्यार्थी आहेत.

२५ शिक्षक, १२ प्राध्यापक व १३ शिक्षकेतर कर्मचारी मिळून एकूण ५० कर्मचारी कार्यरत आहेत.

ज्यु.कॉलेज विभागात सायन्स, आर्टस् आणि कॉमर्स उपविभागाच्या चार तुकड्या विना अनुदानित आहेत. तेथे विद्यावर्धिनीच्यावतीने आध्यापक ८ व शिक्षकेतर कर्मचारी ६ अशा एकूण १४ कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. त्यांचे वेतन व भत्ते विद्यावर्धिनी मराठा मंदिरच्यावतीने दिले जाते.

मार्च २०२० मध्ये घेण्यात आलेल्या एस्.एस्.सी. परीक्षेचा निकाल ९९.५९% लागला आहे.

मार्च २०२० मध्ये घेण्यात आलेल्या एच्.एस्.सी. परीक्षेचा निकाल पुढीलप्रमाणे लागला.

(अ) कला – ९५.६५ % (ब) वाणिज्य – १००% (क) विज्ञान – १००%

**विशेष उल्लेखनीय कार्य :–**

- शासकीय शिष्यवृत्ती स्पर्धेत इयत्ता ८वीमधील विद्यार्थीनी **तनिष्का शरद पाटील** ही गुणवत्ता यादीमध्ये तालुक्यामध्ये ५वी आली.

- क्रीडा विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे यश संपादन केले.

| नाव | इयत्ता | क्रीडा प्रकार | स्तर | आयोजक | ठिकाण | प्राविण्य |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रतिक राजेंद्र सावंत | ११वी | पॉवर लिफ्टींग | राज्य | महाराष्ट्र राज्य थ्रोबॉल फेडरेशन | यवतमाळ | सहभाग |
| प्रतिक राजेंद्र सावंत | १२वी | थ्रोबॉल | राष्ट्रीय | थ्रोबॉल फेडरेशन ऑफ इंडिया | मारपल्ली, केरळ | तृतीय क्रमांक |
| साक्षी सुरेश कोकरे | ११वी | पॉवर लिफ्टींग | राज्य | मुंबई महानगरपालिका (महापौर चषक) | नेरुळ, नवी मुंबई. | सिल्व्हर मेडल |
| साक्षी सुरेश कोकरे | १२वी | थ्रोबॉल | राष्ट्रीय | थ्रोबॉल फेडरेशन ऑफ इंडिया | मारपल्ली, केरळ | तृतीय क्रमांक |
| गौरांग गणपत लिंगायत | १२वी | थ्रोबॉल | राष्ट्रीय | थ्रोबॉल फेडरेशन ऑफ इंडिया | मारपल्ली, केरळ | तृतीय क्रमांक |
| राज राजेश लांजेकर | १२वी | थ्रोबॉल | राष्ट्रीय | थ्रोबॉल फेडरेशन ऑफ इंडिया | मारपल्ली, केरळ | तृतीय क्रमांक |
| सौरभ अरुण गराटे | १२वी | थ्रोबॉल | राष्ट्रीय | थ्रोबॉल फेडरेशन ऑफ इंडिया | मारपल्ली, केरळ | तृतीय क्रमांक |
| ललित सुधीर सावंत | १२वी | थ्रोबॉल | राष्ट्रीय | थ्रोबॉल फेडरेशन ऑफ इंडिया | मारपल्ली, केरळ | तृतीय क्रमांक |
| वैभव मोहन मोरे | १२वी | थ्रोबॉल | राष्ट्रीय | थ्रोबॉल फेडरेशन ऑफ इंडिया | मारपल्ली, केरळ | तृतीय क्रमांक |
| साहिल अरुण गराटे | ११वी | थ्रोबॉल | राष्ट्रीय | थ्रोबॉल फेडरेशन ऑफ इंडिया | मारपल्ली, केरळ | तृतीय क्रमांक |
| ओंकार सुधीर पांचाळ | ११वी | थ्रोबॉल | राष्ट्रीय | थ्रोबॉल फेडरेशन ऑफ इंडिया | मारपल्ली, केरळ | तृतीय क्रमांक |
| शुभम शांताराम काजरेकर | ११वी | थ्रोबॉल | राष्ट्रीय | थ्रोबॉल फेडरेशन ऑफ इंडिया | मारपल्ली, केरळ | तृतीय क्रमांक |

- दि.९ नोव्हेंबर ते ११ नोव्हेंबर २०१९ या कालावधीत सातारा येथे झालेल्या मैदानी (भालाफेक) स्पर्धेत इयत्ता ११वी विज्ञान शाखेतील विद्यार्थीनी **प्रणिता सुरेश कुंभार** हिने तृतीय क्रमांक मिळविला.

- राष्ट्रपती पुरस्कार पूर्व चाचणी २०१९ चाचणी परीक्षेत प्रशालेतील इयत्ता १०वीतील खालील विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या.

  १) मनस्वी मुकुंदराज नाटेकर
  २) श्रावणी लवेश गोरे
  ३) गौरी श्रीधर गराटे.

४)	अनुजा अभय ढवण
५)	रिध्दी रघुनाथ झुरे

- शासकीय ग्रेड चित्रकला परीक्षेअंतर्गत एलिमेंटरी ग्रेड चित्रकला परीक्षेत १२५ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. निकाल ८६.४०% लागला. तर इंटरमिजिएट ग्रेड चित्रकला परीक्षेत ९४ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते व निकाल ७१.२७% लागला.

- चतुरंग प्रतिष्ठान, चिपळूण आयोजित स्पर्धेत सर्वोत्तम विद्यार्थी गोडबोले पुरस्कार इयत्ता १०वीतील विद्यार्थीनी **मनस्वी मुकुंदराज नाटेकर** हिने पटकाविला.

- हिंदी सुलेखन परीक्षेचा निकाल १००% लागला असून २७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. या विद्यार्थ्यांना सहशिक्षक **श्री.पाखरे महेश गणपत** यांचे मार्गदर्शन लाभले.

- विद्यार्थ्यांमधून भावी साहित्यिक निर्माण व्हावेत या उद्देशाने 'पालवी' हे हस्तलिखित व 'माय थॉटस्' अंक प्रसिध्द करण्यात येतात.

- मराठा मंदिर साहित्य शाखेच्यावतीने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धामध्ये खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

| नाव | स्पर्धा प्रकार | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|---|
| विद्या विकास शिवगण | निबंध स्पर्धा | १२वी | प्रथम |
| साक्षी चंद्रकांत धाडवे | | | तृतीय |
| अस्मिता अनिल सावंत | | | उत्तेजनार्थ |
| अंकिता चंद्रकांत मोहिते | | ९वी | उत्तेजनार्थ |
| साहिल उत्तम खानविलकर | काव्य स्पर्धा | ८वी | प्रथम |
| साक्षी सुरेश कोकरे | कथा स्पर्धा | ११वी | द्वितीय |
| दिपाली दत्ताराम सुवारे | | ११वी | तृतीय |
| वैष्णवी श्रीपत धुमाळी | | १२वी | उत्तेजनार्थ |

- शाळेच्या कनिष्ठ महाविद्यालय विभागात कार्यरत असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. या वर्षी एन.एस.एस.चे सात दिवसांचे शिबीर साठरे बांबर येथे १५ ते २१ डिसेंबर २०१९ या कालावधीत संपन्न झाले.

या निवासी शिबीरात वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच श्रमदान, मान्यवरांची व्याख्याने, क्षेत्रीय भेटी, बंधारे बांधणी, वनराई आदि उपक्रम हाती घेण्यात आले. या शिबीरास एन.एस.एस.कार्यक्रम अधिकारी प्रा.श्री.आनंदा महिपती बाणकर, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.श्रीमती सोनाली सुरेश पाटील, परिचर श्री.गुरुनाथ साठल्ये तसेच माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागातील सहशिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. या शिबीरास शालेय समिती विशेष निमंत्रित श्री.राम गराटे आणि माजी परिचर श्री.शिवराम नाडणकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

- दि.२५ ते २७ डिसेंबर २०१९ या कालावधीत आंबोली, जि.सिंधुदुर्ग येथील शिबीरामध्ये इयत्ता ११वीमधील विद्यार्थीनी ऐश्वर्या संतोष गोसावी आणि वर्षा संजय चव्हाण यांनी भाग घेतला.

- प्रतीवर्षाप्रमाणे या वर्षीही सहशिक्षक श्री.शेखर प्रमोद आबासाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली हरितसेनेअंतर्गत वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आदी उपक्रम राबविण्यात आले.

**प्राप्त झालेल्या देणग्या व इतर स्वरुपात मिळालेली एकत्रित रक्कम :-**

- माजी मुख्याध्यापक श्री.हरिभाऊ शंकर धुमाळ यांनी शाळेला एक स्टोअरवेल कपाट भेट म्हणून दिले. तसेच श्री.मंगेश महादेव सावंत यांनीही शाळेला एक स्टोअरवेल कपाट भेट म्हणून दिले.

- पालीमधील सौ.स्वरुपा सामंत यांच्याकडून १२ गणवेश प्राप्त झाले.

- श्री साईदरबार ट्रस्ट, खोपोली यांच्याकडून शाळेतील ५ विद्यार्थ्यांना प्रत्येकी छत्री, दप्तर, कंपास, पेन आणि वह्या देण्यात आल्या.

- श्री.सुभाष पाटील, कोल्हापूर यांनी माध्यमिक विभागातील १० विद्यार्थ्यांना गणवेश आणि लक्ष्मी चंद्रकांत नागले या इयत्ता ११वीमधील अस्थिव्यंग विद्यार्थीनीला रु.५०००/- रोख स्वरुपात मदत केली.

- श्री.राजेंद्र माळी, गेल कंपनी, अलिबाग यांनी इयत्ता ११वीच्या ६ विद्यार्थ्यांना गणवेश दिले.

- फिनोलेक्स कंपनीत कार्यरत असणारे श्री.सुरेश पाटील यांच्याकडून माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील ९ विद्यार्थ्यांना गणेवश दिले.

- श्री.संजय पाटील, रुक्मीणी फाऊंडेशन, कोल्हापूर यांच्याकडून इयत्ता १०वीमधील एका विद्यार्थीनीला सावित्रीची लेक या योजनेअंतर्गत रु.११००/-ची आर्थिक स्वरुपात मदत.

वर उल्लेखित श्री.पाटील व श्री.माळी यांच्याकडून देणग्या मिळविण्यासाठी शाळेतील प्रा.सोनाली पाटील यांनी विशेष मेहनत घेतली.

**या वर्षात शाळेने विकासासाठी केलेले कार्य :-**

- वाढदिवसानिमित्त प्रशालेतील विद्यार्थी व शिक्षक यांच्याकडून पुस्तक भेट योजना राबविण्यात येते. त्यामुळे ग्रंथालयाच्या पुस्तकांच्या संख्येत वाढ होत आहे.

- दि.१० डिसेंबर २०१९ रोजी इयत्ता १०वी व १२वीचे विद्यार्थी आणि पालक यांना मा.मेजर श्री.चंद्रसेन कुलथे यांचे 'सैन्य दलातील संधी' या विषयावर मार्गदर्शन लाभले. हा कार्यक्रम मराठा मंदिर, मुंबई यांच्यातर्फे सादर करण्यात आला.

- विद्यार्थीनींसाठी असलेल्या स्वच्छतागृहाचे आधुनिकीकरण करण्यात आले.

**पुढील वर्षासाठी आखलेल्या योजना.**

- बायोमॅट्रिक फेसर रिडर मशीन बसविणे.
- प्रशालेच्या मुख्य प्रवेशद्वारालगत विद्यार्थ्यांना ये-जा करण्यासाठी लहान आकाराच्या प्रवेशद्वाराची सुविधा उपलब्ध करुन देणे.
- सहा वर्गखोल्या डिजिटल करणे.
- कोवीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तीन सॅनीटायझर मशिन्स बसविणे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक केंद्र-पाली, ता.जि.रत्नागिरी येथे सन २०१९-२० मधीन प्रविष्ठ विद्यार्थी संख्येचा तपशिल.

| अ. क्र. | वर्ग | विद्यार्थी संख्या | |
|---|---|---|---|
| १ | एफ.वाय.बी.ए. | ४१ | केंद्र प्रमुख -श्री.विलास धर्माजी काटकर<br>केंद्र संयोजक - श्री.जी.एन.चव्हाण<br>केंद्र सहाय्यक - श्रीमती आर.एम. अग्निहोत्री<br>शिपाई - श्री.पी.जी.सावंत |
| २ | एस.वाय.बी.ए. | २९ | |
| ३ | टी.वाय.बी.ए. | ३१ | |
| ४ | एफ.वाय.बी.कॉम | २८ | |
| ५ | एस.वाय.बी.कॉम | १५ | |
| ६ | टी.वाय.बी.कॉम | १३ | |
| | एकूण | १५७ | |

αα

## मराठा मंदिर अ.के.देसाई हायस्कूल, रत्नागिरी (१९८३)

प्रशालेत १३५ विद्यार्थी व विद्यार्थीनी १०४ मिळून एकूण २३९ विद्यार्थी आहेत.
प्रशालेत ०९ शिक्षक व ०३ शिक्षकेतर कर्मचारी एकूण १२ कर्मचारी कार्यरत आहेत.
मार्च २०२० मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी.परीक्षेचा निकाल ९१.०७% लागला आहे.

**या वर्षात केलेले उल्लेखनीय कार्य :-**

- मराठा मंदिर अ.के.देसाई हायस्कूल, रत्नागिरी ही शाळा मराठा मंदिर मातृ संस्थेच्या उत्तम मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या बौध्दिक, शारिरीक सर्वांगीण विकासासाठी विविधांगी शैक्षणिक व सहशालेय उपक्रम यशस्वीरित्या राबवित आहे.
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेमध्ये आरोग्य विभाग, सांस्कृतिक विभाग, सहल विभाग, बाह्यपरीक्षा विभाग दिव्यांग विद्यार्थी शोध मोहिम, महिला सुरक्षा समिती, वाहतुक सुरक्षा समिती, हरितसेना विभाग इत्यादी विभागांमार्फत वर्षभर विविध सहशालेय उपक्रम राबविले गेले.
- सांस्कृतिक विभागामार्फत अहवालवर्षी विविध सहशालेय उपक्रमांचे आयोजन केले गेले. यामध्ये दिनविशेष, विविध नेत्यांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या, शारदोत्सव, स्नेहसंमेलन. या निमित्ताने शाळेमध्ये विविध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, कविता लेखन, गीतगायन स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.
- मराठा मंदिर साहित्य शाखेच्यावतीने आयोजित कविता लेखन स्पर्धेत **सुखदा शिवाजी गावंकर व सतिश शितप** या विद्यार्थ्यांनी उत्तेजनार्थ क्रमांक मिळविला.
- विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण व्हावा या उद्देशाने विज्ञान मंडळाच्यावतीने विज्ञान रंजन स्पर्धा, विज्ञान प्रतीकृती स्पर्धा, प्रश्नमंजुषा यासारखे उपक्रम व स्पर्धाचे आयोजन केले गेले. शालेय स्तरावर अपूर्व विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. विज्ञानमंच परीक्षेत **शलमोन मोहिते** याची शासकीय निवासी शिबीरासाठी निवड झाली.
- मराठा मंदिरच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विज्ञान विभागामार्फत रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.
- शासकीय रेखाकला एलिमेंटरी ग्रेड व इंटरमिजीएट ग्रेड परीक्षेला १९ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. परीक्षेचा निकाल १००% लागला.
- मराठा मंदिर ग्लोबल स्कूल, रत्नागिरी आयोजित आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत **आर्या गणेश आखाडे** हिने प्रथम क्रमांक मिळविला.
- मराठा मंदिर ग्लोबल स्कूल येथे आयोजित रोबोट बनविणे या अनोख्या उपक्रमात शाळेतील २२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या विद्यार्थ्यांना कला शिक्षक श्री.जयसिंग आनंदा लोहार यांचे मार्गदर्शन लाभले.
- शाळेचा स्काऊट विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात. सन २०१९-२० या वर्षी शाळेतील ३ गाईडस् व ३ स्काऊटर्स राज्यपुरस्कार चाचणी परीक्षा उत्तीर्ण झाले. यामध्ये सलोनी सतिश शितप, मोहिनी मनोज जाधव, किसना हरी थापा, ऋषीकेश संतोष धनावडे, यश मोहन पालकर, सिध्दांत श्रीकांत लाड, संग्राम संदीप जाधव, अमोर सुरेश जगताप, विनय सिनोद शर्मा यांचा समावेश होता. या यशस्वी गाईडस् व स्काऊटर्स यांना श्री.संतोष शां.गार्डी व सौ.अंजली संतोष पिलणकर यांचे मार्गदर्शन लाभले.
- गाईडर सौ.अंजली सं.पिलणकर यांनी राज्य प्रशिक्षण केंद्र, भोर(पुणे) येथे हिमालया वुड बॅच(एचडब्लयूबी) हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले.
- शालेय शिक्षण मंत्री मा.आशिष शेलार यांच्या हस्ते राज्यपुरस्कार प्रमाणपत्र वितरणासाठी **व्यास नरेंद्र गावंड** या स्काऊटर्सची निवड झाली होती तर कॉन्टिजन्ट लिडर म्हणून स्काऊटर **श्री.संतोष गार्डी** यांची निवड करण्यात आली.

- हरितसेना विभागाच्यावतीने ५० कोटी वृक्ष लागवडीच्या मोहिमेमध्ये आरेवारे येथे सहभाग नोंदविला. गेली अनेक वर्षे २६ जानेवारी २०२० रोजी प्रजासत्ताक दिनी हरीत सेनेचे जिल्ह्यातील एकमेव पथक संचलन करण्याचा मान शाळेला मिळतो. त्याचबरोबर 'पर्यावरण वाचवा' या विषयावर आधारित चित्ररथाचे उत्कृष्ट सादरीकरण केले जाते. यासाठी कलाशिक्षक श्री.जयसिंग लोहार व श्री.संतोष गार्डी यांचे मार्गदर्शन व इतर सहशिक्षकांचे सहकार्य लाभले.

- बालनाट्य विभागाने विविध स्तरावर १०० पेक्षा जास्त पारितोषिके जिंकली. **श्री.संतोष गार्डी** लिखित व दिग्दर्शित विज्ञान नाटिका 'आरोग्यम् धनसंपदा' या नाटिकेला तालुकास्तरावर व जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळाला. तर विभागस्तरावर उत्कृष्ट सहभाग नोंदविला. विभागस्तरावर या नाटिकेतील उत्कृष्ट अभिनयासाठी **अलिशा सुनिल जाधव** हिला प्रथम क्रमांक तर उत्कृष्ट दिग्दर्शनासाठी **श्री.संतोष गार्डी** यांना प्रथम क्रमांक मिळाला.

  महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्र आयोजित बालनाट्य स्पर्धेत 'आरोग्यम् धनसंपदा' या नाट्यास तृतीय क्रमांक तर उत्कृष्ट अभिनयासाठी **सानिका वाडेकर** हिला तृतीय क्रमांक, उत्कृष्ट दिग्दर्शनासाठी **श्री.संतोष गार्डी** यांना तृतीय क्रमांक प्राप्त झाला. या नाटीकेला **श्री.दत्ता घडशी** यांची उत्कृष्ट पकवाज वादनाची साथ लाभली होती.

  ''हे असंच चालायच!!'' या **श्री.संतोष गार्डी लिखित** व दिग्दर्शित पर्यावरण बालनाट्यास राज्यस्तरावर उत्तेजनार्थ तर **अलिशा सुनिल जाधव** हिला उत्कृष्ट अभिनयासाठी प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

- क्रीडा विभागाच्यावतीने सहाय्यक शिक्षक श्री.विनोद गावंखडकर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविले जातात. १४ वर्षाखालील कुस्ती फ्री स्टाईल या क्रीडा प्रकारामध्ये इयत्ता ६वीतील विद्यार्थी **यश विनोद पवार** याने तालुकास्तरावर उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले. १७ वर्षाखालील क्रिकेट संघाने उत्कृष्ट खेळ करीत उपांत्यफेरीपर्यंत मजल मारली.

- श्री.नरेंद्र गावंड व सौ.ज्योती गावंड यांच्या मार्गदर्शनाखाली दर शनिवारी सकाळी इयत्ता ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी योगा प्रशिक्षण दिले जाते.

  जागतिक सूर्यनमस्कार दिनाचे औचित्य साधून हिराबाई गावंड फाऊंडेशनच्या सहकार्याने शाळेमध्ये आंतरशालेय सूर्यनमस्कार स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत ८० स्पर्धकांनी भाग घेतला. सुमारे २५०० सूर्यनमस्कार घालण्यात आले. या स्पर्धेत शाळेच्या मुलींच्या संघाने सांघिक प्रथम क्रमांक मिळविला. तर **सानिका मौला शेख** हिने मुलींमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेला प्रमुख उद्‌घाटक म्हणून सौ.निशादेवी बंडगर(वाघमोडे), शिक्षणाधिकारी, माध्यमिक विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी ह्या उपस्थित होत्या.

- **उत्प्रेक्षा राघव आसबे** ही विद्यार्थीनी शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत आली असून जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेतही उत्कृष्ट कामगिरी करीत गुणवत्ता यादीत झळकली.

- सहशिक्षिका **सौ.वृषाली सावंत** यांची आगस्त इंटरनॅशनल फाऊंडेशन, कुप्पम येथे प्रशिक्षणासाठी जिल्हयातून निवड झाली. त्याचबरोबर जिल्हा विज्ञान मंडळातर्फे त्यांचा विज्ञान मित्र या पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

- सहशिक्षक **श्री.संतोष गार्डी** यांनी रत्नागिरी नगर परिषद आयोजित लोकमान्य टिळक पुण्यतिथी निबंध स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला. तसेच कुवारबांव ग्रंथालय आयोजित जिल्हास्तरीय काव्यलेखन स्पर्धेत 'सांग ना' या त्यांच्या कवितेला तृतीय क्रमांक मिळाला.

**शैक्षणिक वर्षात शाळेला मिळालेल्या देणग्या व इतर स्वरुपात मिळालेली एकूण रक्कम :-**

- या वर्षात शाळेला प्राप्त झालेल्या देणग्या व इतर स्वरुपात मिळालेली एकूण रक्कम रु.१,२५,३००/-

**शाळा विकासासाठी या वर्षात केलेले कार्य :-**

- इयत्ता ८वी ते १०वीच्या सर्व विद्यार्थ्यांना मानसिक, शारीरिक, बौध्दीक विकासासाठी शाळेमध्ये वर्षभर मोफत योग प्रशिक्षण वर्ग सहशिक्षिका सौ.ज्योती गावंड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला.

- इयत्ता १०वी सन २०१८-२०१९ च्या बॅचकडून मिळालेल्या निधीतून शाळेसाठी स्पीकर सेट घेण्यात आला.
- भारत नॉव्हेल्टी यांच्यामार्फत शाळेला नॉव्हेल्टी कंपनीचे मोठे घड्याळ भेट म्हणून देण्यात आले.
- हेल्पींग हँडस् या माजी विद्यार्थी ग्रुपतर्फे शाळेला शालेय साहित्य व गणवेश प्राप्त झाले.
- विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना संधी देण्यासाठी बालनाट्य, समुहगीत गायन, कथाकथन अशा विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.
- इयत्ता ५वी व ८वी शिष्यवृत्ती परीक्षा, एनएमएमएस स्पर्धा परीक्षा, एनटीएस परीक्षांना मार्गदर्शन.
- शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन. व्यसनमुक्तीसाठी तंबांखूमुक्त शाळा अभियान इत्यादीसाठी विविध उपक्रमांचे व स्पर्धांचे आयोजन.
- शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना जिल्हा शासकीय रुग्णालयामार्फत विविध सवलती मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्नशील. यासाठी सौ.वृषाली सावंत या मार्गदर्शन करीत असतात.
- मराठा मंदिरच्या अमृत महोत्सवानिमित्त पालकांसाठी रांगोळी व पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. तसेच यशस्वी पालकांचा सत्कार करण्यात आला.

**पुढील वर्षासाठी आखलेल्या योजना :-**

- गुणवत्ता वाढ उपक्रमांतर्गत स्पर्धा परीक्षांचे नियोजन करणे. जादा तासाचे नियोजन करुन स्पर्धा परीक्षांचे महत्व सांगणे. विद्यार्थी गुणवत्ता यादीत येईल याकरिता प्रयत्न करणे.
- इंग्रजी आणि गणित विषयांच्या मूळ संकल्पना स्पष्ट करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन.
- विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.
- शालेय गरजू विद्यार्थ्यांना गणवेष, वह्या पुस्तके व शालेय साहित्य वितरीत करुन शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे.
- शाळेचा परिसर सुशोभित करणे, भिंती बोलक्या करणे.
- विद्यार्थ्यांची दैनिक उपस्थिती वाढावी यासाठी उपक्रमाचे नियोजन करणे.
- अप्रगत विद्यार्थ्यांना शालेय वेळेबाहेर मार्गदर्शन करुन शिक्षणाची गोडी निर्माण करणे.
- विविध सामाजिक संस्थांकडून विद्यार्थ्यांसाठी आर्थिक किंवा वस्तुरुपात मदत मिळविणे.
- बालनाट्यासाठी मार्गदर्शन करणे.
- इयत्ता १०वीचा निकाल वाढविण्यासाठी जादा तासांचे नियोजन करुन तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन करणे.
- विद्यार्थ्यांच्या अभिवृत्ती, सृजनशीलता व आवड या गुणांना प्रोत्साहन देणे.
- इयत्ता ५वी व ८वीच्या वर्गांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी जादा मार्गदर्शन करणे.
- विज्ञान व गणित संबोधावर आधारित शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे. प्रयोगशाळा विकसीत करणे.

## मराठा मंदिर बाबासाहेब गावडे इंग्रजी माध्यम शाळा, वरळी, मुंबई (२००१)

शाळेत ४८९ विद्यार्थी आणि विद्यार्थीनी ४४१ मिळून एकूण ९३० विद्यार्थी आहेत.
शिक्षक २७ व ०६ शिक्षकेतर कर्मचारी एकूण ३३ कर्मचारी या शाळेत कार्यरत आहेत.

मार्च २०२० मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी.परीक्षेचा निकाल १००% लागला आहे.

**कार्याची माहिती :-**

- महाराष्ट्र शासनमान्य अभ्यासक्रमाचे शिक्षण
- शालेय सांस्कृतिक समिती
- परीक्षा समिती

- फलकलेखन समिती
- क्रीडा समिती
- शिस्त समिती
- विज्ञान समिती
- व्यवसाय मार्गदर्शन
- चित्रकला विभाग समिती
- समाजसेवा समिती
- ग्रंथपाल विभाग
- विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास समिती
- इयत्ता १०वी साठी उन्हाळी वर्गाचे अभ्यासिका शिबिर आयोजित.

**या वर्षात केलेले उल्लेखनीय कार्य :-**

पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभाग

- सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षात शाळेने इयत्ता ३री व ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी ऑलिम्पियाड आणि प्रज्ञा शोध परीक्षांचे आयोजन केले होते. त्याकरिता शिक्षक वर्ग शाळेच्या वेळेव्यतिरिक्त अधिक तास घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत. ऑलिम्पियाड व प्रज्ञा शोध या परीक्षांतर्गत सामान्य ज्ञान, सामान्य विज्ञान, इंग्रजी आणि गणित विषयासाठी इयत्ता ३रीचे ९ व ४थीचे ११ विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये इयत्ता ४थीचे ३ विद्यार्थी विभागस्तरावर गणित,विज्ञान व इंग्रजी या विषयांकरिता निवडण्यात आले असून त्यानी या विषयांमध्ये चांगल्या गुणांनी यश संपादन केले आहे.
- सांस्कृतिक कलादर्पण, मुंबई यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या आंतरशालेय सामुहिक नृत्य स्पर्धेत विद्यार्थी व शिक्षक यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये मुंबईतील ३२ शाळा सहभागी झाल्या होत्या. आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी तृतीय तर शिक्षकांनी द्वितीय क्रमांक मिळविला.
- ऑल राऊंडर्स अकादमी, परेल, मुंबई यांनी आयोजित केलेल्या तायक्वांदो स्पर्धेत शाळेतील इयत्ता ४थीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व ३ सुवर्ण, २ रजत व १ रौप्य पारितोषिक मिळविले.
- मुंबई स्कूल स्पोटर्स असोसिएशनतर्फे आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेमध्ये इयत्ता ४थीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.
- प्राथमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन दामोदर सभागृह, परेल, मुंबई येथे दि.०८ जानेवारी २०२० रोजी आयोजित करण्यात आले होते. शाळेतील शिक्षक, पालक व विद्यार्थी यांनी यात सहभाग घेऊन मोठ्या उत्साहाने हा कार्यक्रम यशस्वी केला. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने वर्षभरात झालेल्या विविध स्पर्धांमध्ये व विशेष कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला.

**माध्यमिक विभाग**

- धारावी स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, मुंबई येथे झालेल्या शालेय जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत इयत्ता ९वीमधील विद्यार्थी **तांझिल शेख** यांस रौप्य पदक, **प्रिती गायकवाड** व **देवरथ प्रसाद** यांना कांस्य पदक मिळाले. तर इयत्ता ८वीतील विद्यार्थी **हंपी पटेल** व **कोमल तानावडे** यांनी कांस्य पदक पटकाविले.
- महिंद्रा हॉकी स्टेडियम, चर्चगेट, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या शालेय जिल्हास्तरीय हॉकी स्पर्धेत इयत्ता ७वीच्या मुलींच्या संघाने रौप्य तर मुलांच्या संघाने कांस्य पदक मिळविले.
- युनिर्व्हसिटी स्पोर्टस् पॅव्हेलियन, मरीन लाईन्स, मुंबई येथे झालेल्या शालेय जिल्हास्तरीय धावणे स्पर्धेत इयत्ता ८वीमधील विद्यार्थीनी **सुचिता दमई** हिने सुवर्ण पदक मिळविले.
- शासकीय एलिमेंटरी परीक्षेला ३३ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होत त्यापैकी ४ विद्यार्थ्यांना ब श्रेणी व १९ विद्यार्थ्यांना क श्रेणी प्राप्त झाली. तसेच इंटरमिजिएट परीक्षेत २२ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ३ विद्यार्थ्यांना ब श्रेणी व १५ विद्यार्थ्यांना क श्रेणी प्राप्त झाली.

- एन.आय.ई. व टाईम्स ऑफ इंडिया यांनी आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत इयत्ता ८वी ते १०वीचे १२ चे विद्यार्थी सहभागी झाले होते.
- एन.आय.ई. व टाईम्स ऑफ इंडिया यांनी आयोजित केलेल्या कलर्स प्लॅश कार्यक्रमात इयत्ता ८वी ते १०वीचे ०६ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.
- एन.आय.ई. व टाईम्स ऑफ इंडिया यांनी आयोजित केलेल्या न्यूजमेकर्स मीट कार्यक्रमात इयत्ता ९वीच्या ०३ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.
- नेहरु सायन्स सेंटर, वरळी, मुंबई आयोजित विज्ञान प्रदर्शनात इयत्ता ९वीच्या ५ विद्यार्थ्यांनी 'स्मार्ट कचरा पेटी' व 'ऑपटेकल एल.ए.डी. कार' हे दोन प्रकल्प सादर केले.
- बॉलीवुड स्टार डायना पेंटी यांनी शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांना नृत्याबाबत मार्गदर्शन केले.

**देणग्या व इतर स्वरुपात मिळालेली एकत्रित रक्कम**

माध्यमिक विभाग

- सार्वजनिक बांधकाम मंत्री मा.श्री.चंद्रकांत पाटील यांच्या निधीतून शाळेच्या इमारतीचे अंतर्गत व बाह्य नुतनीकरण करण्यात आले.
- रोटरी क्लब ऑफ मुंबई यांनी इयत्ता ५वी ते १०वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थीनींसाठी सॅनिटरी नॅपकीनची तरतूद करण्यात आली.
- आयसीआयसीआय लोम्बार्ड या सेवा सहयोग फाऊंडेशन यांच्याकडून विद्यार्थ्यांची डोळे तपासणी करुन विद्यार्थ्यांना चष्मा वाटप करण्यात आले.
- सलाम बॉम्बे या संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांना हॉकी क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले.

**विकासासाठी केलेले कार्य :-**

माध्यमिक विभाग

- शालांत परीक्षा २०१९-२०२० या शैक्षणिक कालावधीत अभ्यासिका शिबीर आयोजित करण्यात आले. तसेच फेब्रुवारी २०२० मध्ये सायं.६ ते ९ वाजेपर्यंत परीक्षेचा सराव घेण्यात आला.
- सलाम बॉम्बे या सामाजिक संस्थेने शाळेचा हॉकीसंघ तयार करुन त्यांना संपूर्ण हॉकी क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले. आठवड्यातून तीन वेळा प्रशिक्षण तसेच सुदृढ आहार दिला जातो.
- निवृत्त मेजर श्री.चंद्रसेन कुळथे यांनी विद्यार्थ्यांच्या भावी वाटचालीसाठी 'सैनिकी शाळांचा प्रवेश' या विषयावर मार्गदर्शन केले.
- बॅन्ड पथक तयार करुन श्री.ब्रिजेश चौधरी, प्रशिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना उत्तम प्रशिक्षण देण्यात आले.
- श्री.सुशिल शिशुपाल यांनी विद्यार्थीनींना स्वरक्षणाबाबत प्रशिक्षण दिले.

**पुढील वर्षासाठी आखलेल्या योजना :-**

- शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ नियमितपणे सुरु होण्याच्या प्रतिक्षेत.
- कोविड-१९ या विषाणुच्या प्रादुर्भावामुळे २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थी प्रत्यक्ष शाळेत हजर राहू शकत नसल्यामुळे शासनाच्या आदेशनुसार या वर्षी विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन शालेय शिक्षण घेण्यासाठी व नवनवीन उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरित करीत आहोत.
- नियमित शाळा सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्यांची सुरक्षा व आरोग्याच्यादृष्टीने खबरदारी घेण्यात येईल. उदा.नियमित हात साबणाने धुणे, सॅनिटायझरचा योग्यरितीने वापर करणे, तोंडाला मास्क लावणे व सामाजिक अंतर ठेवणे इत्यादी विविध आरोग्यविषयक मार्गदर्शन करुन त्याबाबतच्या नियमांचे व्यवस्थित पालन होईल याची दक्षता घेणे.

αα

# मराठा मंदिर वंडर किडझ्, रत्नागिरी (२०१४)

## कार्यकारी मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.प्रदीप विचारे | – | अध्यक्ष |
| २. | श्री.शंकर द.पालदेसाई | – | उपाध्यक्ष |
| ३. | श्री.योगेश श.पवार | – | चिटणीस |
| ४. | श्री.मनोज प्र.देशमुख | – | सभासद |
| ५. | श्री.प्रभाकर जाधव | – | सभासद |
| ६. | सौ.ममता सं.नलावडे | – | सभासद |
| ७. | सौ.राजश्री विश्वासराव | – | सभासद |
| ८. | सौ.निवेदिता देशमुख | – | सभासद |
| ९. | श्री.प्रशांत खानविलकर | – | सभासद |

शाळेत ६१ विद्यार्थी आणि ५७ विद्यार्थीनी मिळून एकूण ११८ विद्यार्थी आहेत.

७ शिक्षक व ५ शिक्षकेतर कर्मचारी एकूण १२ कर्मचारी कार्यरत आहेत.

विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास हे उद्दिष्ट लक्षात घेऊन पारंपारिक आणि आधुनिक शिक्षणाचा वापर करण्यात येत आहे. ABL म्हणजे Activity Based Learning (कृतीयुक्त अध्ययन पध्दती) ही पध्दती एक प्रभावी व परिणामकारक पध्दती आहे. पारंपारिक अध्ययन पध्दतीपेक्षा ही पध्दत वेगळी आहे. या पध्दतीत विद्यार्थी हा केंद्रबिंदू असतो. तो प्रत्यक्ष कृतीतून शिकतो. त्युाळे केलेले अध्यापन हे प्रभावी व चिरकाल टिकणारे असते. या पध्दतीत शिक्षकाची भूमिका ही मार्गदर्शकाची असते. या पध्दतीत विद्यार्थ्यांना स्वत: कृती करुन शिकावे लागते. तसेच विद्यार्थ्यांचा वयोगटाचा विचार करुन, त्यांच्या गरजा लक्षात घेऊन विविध उपक्रम राबविले जातात.

**ठळक वैशिष्टये :-**

- विद्यार्थ्यांना विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त होते.
- शिक्षण संशोधनाद्वारे अभ्यास करुन अभ्यासक्रम सोपा करुन शिकविला जातो.
- दररोज लेखनाची सवय व्हावी म्हणून वर्कशीटस् दिल्या जातात.
- विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी संभाषण व लिखाण याविषयी आत्मविश्वास निर्माण होतो.
- प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते.
- हरीत दिवस डे(ग्रीन डे) – या दिवशी विद्यार्थ्यांना त्यांनी घरुन आणलेल्या छोट्या छोट्या रोपांचे वृक्षारोपण करण्यास मार्गदर्शन करण्यात आले.
- मैत्री दिन(फ्रेंडशिप डे) – या दिवशी मैत्रीतून मिळणाऱ्या आनंददायी सहवासचे महत्व वेगवेगळी उदाहरणे देऊन पटविण्यात आले.
- सर्प जागरुकता कार्यक्रम – सर्प मित्र श्री.वायगणकर यांनी विविध जातीच्या सर्पांची उत्तमप्रकारे माहिती देऊन सापांबद्दलचे गैरसमज व भिती दूर केली.
- स्वातंत्र्य दिन(इंडीपेन्डस् डे) – स्वातंत्र्य दिनी विविध राष्ट्रभक्तीपर गीते, भाषणे व श्री.सुभाष सावंत, अध्यक्ष, जिल्हा माजी सैनिक संघटना व माजी सैनिक अधिकारी यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले.
- शिक्षक दिन(टिचर्स डे) – या दिवशी प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी मुलांना शिकविण्याचा आनंद मिळविला व त्यानंतर शिक्षकांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम सादर केले. शिक्षकांच्या कामाची दखल घेत त्यांना विविध भेटवस्तु देण्यात आल्या.
- बाल दिन(चिल्ड्रन्स डे) – या दिवशी समस्त प्राथमिक आणि पूर्व प्राथमिक विभागातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर वर्गातील एक दिवस ही नाटकुली सादर केली. आपल्या आवडत्या शिक्षकांना लहान मुलांच्या रूपात बागडताना आणि बोलताना बघून मुले पोटभर हसली आणि या नाटिकेचा त्यानी मनमुराद आनंद लुटला. सर्व मुलांना खाऊ वाटण्यात आला.

- जागतिक दूरदर्शन दिवस(वर्ल्ड टेलिव्हिजन डे) – विद्यार्थ्यांना विविध दूरदर्शन संच दाखविण्यात आले.
- संगणक दिन(कॉम्प्युटर डे) – विद्यार्थ्यांना संगणकाविषयी माहिती देण्यात आली व संगणकाचे विविध भाग दाखविण्यात आले.

**शाळेने केलेले उल्लेखनिय कार्य :-**

- दि.२० फेब्रुवारी २०२० रोजी विज्ञान दिन साजरा करण्यात आला.
- दि.७ मार्च २०२० रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.
- सर्जनशिलता दिवस (क्रिएटीव्हीटी डे) – विद्यार्थ्यांनी खूप कल्पक व वैविध्यपूर्ण पेहराव परीधान केले व खूपच रंजक व सामाजिक संदेश देणारे फलक आणि पोशाख परिधान केले होते.
- पृथ्वी दिवस(अर्थ डे) – पृथ्वी वाचवा, तिचे संवर्धन कराव असे संदेश देणारे अनेक कटआऊट परिधान करुन विद्यार्थ्यांनी उत्साहाने घोषणा दिली व हा दिवस उत्साहात पार पडला.
- जागतिक पर्यावरण दिन (वर्ल्ड एन्व्हायरमेंट डे)– विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्व सांगत शाळेभोवताली परिसरात फेरफटका मारुन आणण्यात आले.
- पितृ दिन(फादर्स डे) – पितृ दिनाचा सोहळा अतिशय अविस्मरणीय ठरला. समस्त वडील मंडळीनी उत्साहाने विविध स्पर्धांमधून सहभाग घेत आनंद लुटला.
- जागतिक योगा दिवस – जागतिक पातळीवर मान्यता मिळालेल्या योगा दिवसाचे शाळेने नियोजन केले होते. सहशिक्षिका श्रीमती प्रिया बांदरकर यांनी मार्गदर्शन केले.
- चिकित्सक दिन(डॉक्टर डे) – रत्नागिरी सिव्हील हॉस्पिटल येथील पेडॅट्रिशियनच्या संघाने शालेय विद्यार्थ्यांचे जनरल चेकअप केले.
- वर्षा दिन(रेनी डे) – विद्यार्थ्यांनी भिजायचा आनंद लुटला व साठलेल्या पाण्यात कागदी होड्या सोडल्या.
- हॅन्डवॉश डे – जेवणाअगोदर आणि नंतर हात स्वच्छ धुवण्याचे महत्व विद्यार्थ्यांना समजावण्यात आले.
- आहार दिन/सप्ताह(फुड डे/विक) – विद्यार्थ्यांना आठवडाभर पौष्टिक व सकस पदार्थ डब्यात आणण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार विद्यार्थ्यांनी डब्यात तसे पदार्थ आणले होते. विद्यार्थ्यांना निरोगी शरीर व उत्तम वाढीसाठी हे पदार्थ कसे आवश्यक आहेत. त्यातून शरीराला कशी पोषक तत्त्वे मिळतात त्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.
- हास्य दिन(लाफ्टर डे) – जागतिक हास्य दिनानिमित्त हास्य दिनाचे आयोजन करण्यात आले होते.
- फलाहार दिन(फ्रुट डे) – या दिवशी विद्यार्थ्यांना विविध फळांचे पोशाख व कटआऊटस् परिधान करुन येण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच जेवणातही विद्यार्थ्यांनी फळाचा समावेश केला होता. यानिमित्ताने विद्यार्थ्यांना विविध फळे व त्यांचे आपल्या जीवनात आरोग्याच्यादृष्टीने किती महत्व आहे त्याची माहिती देण्यात आली.
- गणतंत्र दिवस(रिपब्लिक डे) – दि.२६ जानेवारी २०२० रोजी गणतंत्र दिवस ध्वजवंदन करुन साजरा करण्यात आला. या दिवसाच्यानिमित्ताने विविध राष्ट्रभक्तीपर गीते, नृत्य, भाषणे व विविध शालेय स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष व माजी आर्मी ऑफीसर यांच्या हस्ते ध्वजवंदन संपन्न झाले.
- विज्ञान दिन – शाळेने आयोजित केलेला विज्ञान दिन खऱ्या अर्थाने अद्वितीय आणि विलक्षण ठरला. कारण इतर कोणत्याही शाळांनी त्यांच्या पूर्व प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी अशातऱ्हेचा विज्ञान दिन खास आयोजित केला नव्हता. या दिनानिमित्ताने पालकांनी अनेक मुलांच्या वयाला साजसे असे लक्षणीय प्रयोग मुलांना शिकविले व तेच प्रयोग मुलांनी यशस्वीरित्या करुन दाखविले.
- वृक्ष दिंडी – दि.३० सप्टेंबर २०१९ रोजी विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी वृक्षदिंडी काढून वृक्षारोपण केले व झाडे लावा व पर्यावरण वाचवा असा संदेश दिला.

- दि.३ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०१९ या कालावधीत क्रीडा सप्ताह पार पडला.
- लोकमान्य टिळक यांचे जन्मस्थान – पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी मा.लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जन्मस्थानी भेट दिली. या निमित्ताने विद्यार्थ्यांना टिळकांचे तत्वज्ञान, त्यांचे बालपणीचे दिवस व विचारांची माहिती देण्यात आली.
- प्राचीन कोकण – ज्यु.के.जी. आणि अप्पर के.जी.च्या विद्यार्थ्यांची प्राचीन कोकणाची सहल खूपच अविस्मरणीय ठरली. प्राचीन इतिहासाची खूप महत्वाची व उत्तम ज्ञानवर्धक माहिती मिळाली.
- पोलीस स्टेशन – जनतेच्या संरक्षणाची जबाबदारी किती तत्परतेने व खबरदारी कशी पोलीस दल कसे बाळगतात याची प्रत्यक्ष माहिती विद्यार्थ्यांना व्हावी याकरिता पोलीस स्टेशनला भेट देण्यात आली.
- लिमये उद्यान – नर्सरीच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या सवंगड्यांसमवेत खूप मज्जा केली. विविध खेळ साहित्यांचा मनमुराद आस्वाद घेत सहलीचा आनंद लुटला.
- मत्स्यालय भेट– पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांना विविधरंगी व विविध आकाराच्या, वेगवेळ्या जातीच्या माशांनी भुरळ घातली. यावेळी विविध माशांची व मनोहरी व सुंदर शंख शिंपल्यांची माहिती विद्यार्थ्यांना करुन देण्यात आली.
- रिलायन्स मार्ट – ज्यु.के.जी. व अप्पर के.जी.च्या विद्यार्थ्यांनी रिलायन्स मार्ट येथे भेट देऊन तेथील अनेक विभागातील गृहोपयोगी वस्तू, पदार्थ व इतर वस्तुंची माहिती मिळाली.
- रंगभरण स्पर्धा – दि.२५ जून २०१९ रोजी विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या या स्पर्धेला पालकांकडून व विद्यार्थ्यांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला.
- रंगोत्सव स्पर्धा – मागील वर्षाप्रमाणेच या वर्षीही दि.३० सप्टेंबर २०१९ रोजी ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेला विद्यार्थ्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. कला अकादमीतर्फे ही स्पर्धा कार्टुन मेकींग, हॅन्डरायटिंग व कलरींग अशा तीन प्रकारात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन करीत सुवर्ण व रौप्य पदके पटकाविली.
- कलर कार्निवल – दि.३० सप्टेंबर २०१९ रोजी प्रथमच या वर्षी म.मं.वंडर किडझ् व म.मं.ग्लोबल स्कूल या दोन्हीं शाळांनी मिळून कलर कार्निवल हा उपक्रम राबविला होता. हा उपकम खूपच यशस्वी झाला.
- सर्वोत्तम राधाकृष्ण स्पर्धा – दि.२३ ऑगस्ट २०१९ रोजी म.मं.वडंर किडझ्ने आयोजित केलेल्या या स्पर्धेला लहान मुले व मुली सुंदर आकर्षक अशा राधा आणि कृष्णाच्या वेशभूषेत नटून सजून आली होती. प्रत्येक राधा आणि कृष्ण वेषात आलेल्या विद्यार्थ्यांनी आपला परिचय देऊन श्रीकृष्णाचे बालपण, रासलीला इत्यादी संबंधी अत्यंत सुंदर रोचक माहितीपर सादरीकरण केले.
- कविता वाचन/गायन स्पर्धा – दि.३० सप्टेंबर २०१९ रोजी पूर्व प्राथमिक विद्यार्थ्यांचे पाठांतर कौशल्य विकसित करण्यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेशी संयुक्तिक पहेराव व वस्तुंसहित विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.
- फॅन्सी ड्रेस स्पर्धा – दि.२२ नोव्हेंबर २०२० रोजी झालेल्या स्पर्धेत विद्यार्थी उत्साहाने सहभाग घेत आपल्या विविधरंगी, नाविन्यपूर्ण पोशाखांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.
- दिपावली उत्सव – दिवाळी सणानिमित्त म.मं.वडर किडझ्च्या विद्यार्थ्यांनी माहेर संस्थेला भेट देऊन तेथील वृध्दांना व अनाथ मुलांना फराळाचे वाटप केले आणि वृध्दांचे आशीर्वाद घेऊन लहानग्यांच्या चेहऱ्यावर आनंद देऊन गेला.

**शाळेच्या विकासासाठी केलेल कार्य –**

- लहान मुलांसाठी नवीन शैक्षणिक खेळ
- प्रत्येक वर्गासाठी मदतनीस
- भव्य क्रीडांगण

- फिल्टरची सुविधा

**पुढील वर्षासाठी आखलेल्या योजना**

- शालेय व सहशालेय स्पर्धेचे आयोजन.
- उपचारात्मक अध्यापन
- विद्यार्थी पालक शिक्षक शाळा यामध्ये समन्वय.
- नवनवीन क्षेत्रभेटींचे आयोजन
- फोटोगॅलरी
- विविध सेमिनारचे आयोजन

αα

## मराठा मंदिर ग्लोबल स्कूल, रत्नागिरी (२०१६)

### कार्यकारी मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.प्रदीप विचारे | – | अध्यक्ष |
| २. | श्री.शंकर द.पालदेसाई | – | उपाध्यक्ष |
| ३. | श्री.योगेश श.पवार | – | चिटणीस |
| ४. | श्री.मनोज प्र.देशमुख | – | सभासद |
| ५. | श्री.प्रभाकर जाधव | – | सभासद |
| ६. | सौ.ममता सं.नलावडे | – | सभासद |
| ७. | सौ.राजश्री विश्वासराव | – | सभासद |
| ८. | सौ.निवेदिता देशमुख | – | सभासद |
| ९. | श्री.प्रशांत खानविलकर | – | सभासद |

शाळेमध्ये ३७ विद्यार्थी आणि २७ विद्यार्थीनी मिळून एकूण ६४ विद्यार्थी अहवालसाली शिकत होते.

०६ शिक्षक व ०६ शिक्षकेतर कर्मचारी मिळून एकूण १२ कर्मचारी या शाळेत कार्यरत आहेत.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हे उद्दिष्ट लक्षात घेऊन ग्लोबल स्कूलमध्ये पारंपारिक तसेच आधुनिक शिक्षणाचा वापर करण्यात येत आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना सहज आकलन होईल असा अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांचा वयोगटाचा विचार करुन, त्यांच्या गरजा लक्षात घेऊन विविध उपक्रम राबविले जातात.

- विद्यार्थ्यांना विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त होते.
- शिक्षण संशोधनाद्वारे अभ्यास करुन अभ्यासक्रम सोपा करुन शिकविला जातो.
- अभ्यासाचा सराव व्हावा म्हणून वर्कशीटस् दिल्या जातात.
- विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी संभाषणामुळे आत्मविश्वास निर्माण होतो.
- प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते.
- कराटे, स्केटिंग, स्विमींग, कथक व कॅसिओ यासारख्या सहशालेय उपक्रमांचा समावेश केला आहे.
- जालीयनवाला बाग हत्याकंड दिवस – जालियनवाला बाग येथे १३ एप्रिल १९१९ रोजी झालेल्या हत्याकांडविषयी माहिती देण्यासाठी विद्यार्थ्यांना चित्रफित दाखविण्यात आली.
- क्रिएटिव्हीटी डे – विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी या दिवसाचे आयोजन करण्यात आले.
- इंग्रजी भाषा दिवस – वाढते जागतिकीकरण लक्षात घेऊन इंग्रजी भाषेची व्यापकता विद्यार्थ्यांना समजावून देण्यात आली.
- जागतिक हास्यदिन – या दिवसाचे औचित्य साधून परिपाठामध्ये हसण्याच्या विविध प्रकारचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांकडून करुन घेण्यात आले.

- मराठी राज्य भाषा दिन – मराठी भाषेचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यासाठी मराठी राज्य भाषा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांना मराठी गाणी, कथा, एकपात्री प्रयोग व पोवाडे सादर करण्यात आले.

- विज्ञान दिन – विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची रुची आणि आवड लहान वयातच निर्माण व्हावी यासाठी विज्ञान दिनाचे औचित्य साधून विज्ञानातील विविध प्रयोग आणि प्रतीकृती विद्यार्थ्यांनी सादर केले व त्याविषयी माहिती उपस्थितांसमोर सादर केली.

- डॉक्टर्स डे – भारतीय प्राचीन आयुर्वेद संस्कृतीपासून आजच्या काळातील डॉक्टर्सची माहिती शिक्षकांमार्फत विद्यार्थ्यांना देण्यात आली. विद्यार्थ्यांनी या माहितीवर आधारित निबंध लिहिले. तसेच निरोगी जीवनाचे फायदे विद्यार्थ्यांना समजावेत व निरोगी कसे रहावे यासाठी जिल्हा रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

- रेनी डे – पावसात मनमुराद भिजण्याचा आनंद विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी या दिवसाचे आयोजन करण्यात आले होते.

- टायगर्स डे – वाघ हा आपला राष्ट्रीय प्राणी आहे. वाघाची घटती संख्या लक्षात घेऊन वाघ व इतर वन्यजीवाच्या संवर्धनासाठी आपण कसे प्रयत्नशील राहिले पाहिजे या विषयावर विद्यार्थ्यांसोबत चर्चा करण्यात आली.

- मैत्री दिन – मैत्रीसारखे निरागस नाते विद्यार्थ्यांच्या जीवनात फुलावे व ती भावना चिरंतन रहावी यासाठी या दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. या दिवशी विद्यार्थ्यांनी आपल्या मित्रमैत्रींणीबद्दल भरभरुन भावना व्यक्त केल्या.

- शिक्षक दिन – 'गुरुंनी दिला ज्ञानरूपी वसा, आम्ही चालवू हा पुढे वारसा' या काव्यपंक्ती सार्थ ठरवत विद्यार्थ्यानी शिक्षक बनून वेगवेगळ्या इयत्तांमध्ये अध्यापनाचे कार्य केले.

- हिंदी दिन – विद्यार्थ्यांना आपली राष्ट्रभाषा हिंदीचे महत्व पटवून देण्यासाठी या दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. या दिवशी विद्यार्थ्यांनी हिंदी गीत, कथा, कबीराचे दोहे सादर केले.

- जागतिक पर्यावरण दिन – पर्यावरण संवर्धनासाठी विद्यार्थ्यांच्या मनात जागरुकता निर्माण व्हावी विद्यार्थ्यांना निसर्गफेरीसाठी नेण्यात आले. तेथे विद्यार्थ्यांना विविध झाडे व इतर नैसर्गिक घटकांबद्दल माहिती देण्यात आली.

- फादर्स डे – आईची महती आपणा सर्वांनाच आहे. वडिलांचे देखील आयुष्यात तिकेच महत्वाचे स्थान आहे. हे विद्यार्थ्यांना समजावून देण्यासाठी या दिनाचे आयोजन करण्यात आले.

- आंतरराष्ट्रीय योगा दिन – शालेय अभ्यासक्रमात अंतर्भूत असलेल्या योगाची जागतिक व्याप्ती व विद्यार्थ्यांना योगा व व्यायामाचे महत्व कळावे म्हणून या दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. या दिवशी योग प्रशिक्षका सौ.श्वेतांबरी यांनी विद्यार्थ्यांना योगांबद्दल विशेष माहिती दिली. तसेच प्रात्यक्षिकही करुन घेतले.

- वाचन प्रेरणा दिवस – डॉ.ए.पी.जी.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिवसानिमित्त वाचन प्रेरणा दिन सर्व स्तरावर साजरा केला जातो. हा दिवस शालेय पातळीवरही साजरा करण्यात आला. अशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची वाचनाची आवड वृध्दींगत होते.

- जागतिक अन्न दिवस – जागतिक अन्न दिवसाचे औचित्य साधून आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी गरीब विद्यार्थ्यांना फळांचे वाटप केले.

- बालदिन – पं.जवाहरलाल नेहरु यांना फुलांची व मुलांची प्रचंड आवड होती. त्यांच्या जन्मदिनानिमित्त विद्यार्थ्यांना आनंद मिळेल असे खेळ व उपक्रम राबविण्यात आले.

- टि.व्ही डे – सध्या मिडीयाचे प्रभावी साधन असलेल्या टि.व्ही.चे विविध प्रकार विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. तसेच टि.व्ही.चे फायदे व तोटेही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

- गणपती कार्यशाळा – गणपती उत्सवाचे औचित्य साधून मातीपासून गणपती बनविण्याचे प्रात्यक्षिक कला शिक्षक श्री.कांबळे यांच्यामार्फत दाखविण्यात आले.

- गुड टच बॅड टच – विद्यार्थ्यांना चांगला स्पर्श व वाईट स्पर्श यामधील फरक समजावून सांगण्यासाठी केवळ शाब्दिकच नव्हे तर व्यावहारिक ज्ञान देखील देणे गरजेचे आहे. ही गरज ओळखून गुड टच बॅड टचया कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. समुदपदेशक सौ.प्राची भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- पतंग महोत्सव – मकरसंक्रांतीचे औचित्य साधून म.मं.ग्लोबल स्कूलमध्ये पतंग महोत्सव आयोजित करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांनी शिक्षकांसमवेत पतंग उडविण्याचा आनंद लुटला.

- गिर्यारोहण – विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या निर्भिड वृत्तीला वाव देण्यासाठी गिर्यारोहण प्रशिक्षणाचे आयोजन म.मं.ग्लोबल स्कूल व जिद्दी माउंटनिअरींग यामार्फत आयोजित करण्यात आले.

- क्रीडासप्ताह – सहशालेय उपक्रमांसाठी महत्वपूर्ण अशा क्रीडा सप्ताहाचे दि.२ डिसेंबर ते ६ डिसेंबर २०१९ या कालावधीत आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, खिलाडूवृत्ती, नेत्तृत्वगुण, नि:पक्षपातीपणा इत्यादी गुण विकसित करण्यासाठी सांघिक तसेच वैयक्तिक खेळांचे आयोजन करण्यात आले. विजेत्यांना प्रशस्तीपत्रके व चषक देऊन गौरविण्यात आले.

- विविध सण आणि उत्सवाचे औचित्य साधून बालनाटिका, वृक्ष दिंडी, सर्प जागरुकता कार्यक्रम, रिमांडहोम क्षेत्रभेट, गरबानृत्य, गणपती कार्यशाळा भेट, दिवासजावट, नाताळनिमित्त सँताक्लॉजकडून भेट इत्यादी उपक्रम राबविण्यात आले.

- पर्यावरणसंबंधी तक्ता बनविणे, दहीहंडी स्पर्धा, राष्ट्रभक्तीपर गायन, कांगारु चित्रकला, पाढे पाठांतर, वक्तृत्व, हस्ताक्षर व राखी तयार करणे इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या.

**शाळेने केलेले उल्लेखनिय कार्य –**

- बीओएस व ऑलिंम्पियाड यासारख्या शिष्यवृत्ती स्पर्धेत भाग घेऊन विद्यार्थ्यांनी सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक मिळवित घवघवीत यश संपादन केले.

- म.मं.ग्लोबल स्कूल व रत्नागिरी येथील इतर शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी ‘कलर कार्निवल’ या चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा आंतरशालेय पातळीवर घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये रत्नागिरीतील विविध शाळांमधील विद्यार्थी बहुसंख्येने सहभागी झाले.

- रंगोत्सव स्पर्धा – ‘रंगोत्सव कला अकादमी’ ने रंगोत्सव स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये आपल्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विद्यार्थ्यांनी सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके मिळवित घवघवीत यश संपादन केले.

- कृत्रिम बुध्दीमत्ता विकास कार्यशाळा – विद्यार्थ्यांमधील अंगीभूत बुध्दीमत्तेचा विकास करण्यासाठी कृत्रिम बुध्दीमत्ता विकास कार्यशाळा भरविण्यात आली. या कार्यशाळेत रोबोट बनविण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी मुंबईतून तज्ज्ञांना निमंत्रित करण्यात आले होते.

**शाळेच्या विकासासाठी केलेल कार्य –**

- लहान मुलांसाठी नवीन शैक्षणिक खेळ
- प्रत्येक वर्गासाठी मदतनीस
- अद्ययावत प्रयोगशाळा
- भव्य क्रीडांगण
- फिल्टरची सुविधा
- अद्ययावत संगणक कक्ष
- वाचनालय
- वाळूशिल्पाचे आयोजन

**पुढील वर्षासाठी आखलेल्या योजना**

- शालेय व सहशालेय स्पर्धांचे आयोजन
- उपचारात्मक अध्यापन
- विद्यार्थी पालक शिक्षक शाळा यामध्ये समन्वय
- नवनवीन क्षेत्रभेटींचे आयोजन
- आंतरशालेय चित्रकला स्पर्धा
- स्टुडंट कॅम्पचे आयोजन
- फोटोगॅलरी
- विविध सेमिनारचे आयोजन

αα

## मराठा मंदिर वनिता विश्व (१९५५)

मराठा मंदिर-वनिता विश्व, मराठा मंदिर, मराठा मंदिर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८.

### कार्यकारी मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सौ.शिल्पा रेळे | - | कार्याध्यक्षा |
| २. | सौ.निवेदिता देशमुख | - | उपकार्याध्यक्षा |
| ३. | श्रीमती प्रियांका विचारे | - | चिटणीस |
| ४. | सौ.ज्योती इंदप | - | सभासद |
| ५. | सौ.रंजना नार्वेकर | - | सभासद |

मराठा मंदिर 'वनिता विश्व'चा सन २०१९-२० चा अहवाल सादर करताना विशेष आनंद व्यक्त होत आहे. कारण मराठा मंदिरचे हे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे.

मराठा मंदिरच्या नावलौकिकास भूषणावह ठरावी अशी मुंबई सेंट्रल येथे ही वास्तू दिमाखात उभी आहे. मराठा मंदिरच्या वनिता विश्व या शाखेतर्फे महिलांसाठी विविध सांस्कृतिक, सामाजिक, बौध्दिक कार्यक्रम नेहमीच आयोजित केले जातात.

या वर्षी अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने बहुरंगी, बहुढंगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

- दि.१२/०६/२०१९ - श्रीमती छाया खरे यांनी महिलांच्या व सर्वांच्या आरोग्याच्यादृष्टीने फायदेशीर असे विविध योग प्रकारांचे प्रात्यक्षिक करुन दाखविले व या योगाचे आपल्या जीवनात किती महत्वाचे स्थान आहे ते सांगितले. या अनुषंगाने त्यांनी दैनंदिन जीवन शैली, आहार विहार व डायट विषयी माहिती दिली. महिलंनी प्रश्न विचाररून त्यांच्या शंकांचे निरसन करुन घेतले. हा कार्यक्रम महिलांना विशेष आवडला.

- दि.२६/०६/२०१९ - डॉ.श्रीमती अपर्णा मयेकर यांचा 'याला जीवन ऐसे नाव' हा आध्यात्मक विषयक कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमातून डॉ. अपर्णा मयेकर यांनी व्याख्यानाद्वारे जीवनामध्ये येणाऱ्या अडचणी, संघर्ष यावर मात करुन कसे पुढे जायचे याबाबत त्यांना आलेले अनुभव सादर केले. डॉ.अपर्णा मयेकर स्वत: गायिका असल्यामुळे त्यांनी काही गाणीही थोडक्यात गायली.

- दि.१०/०७/२०१९ - आषाढी एकादशीनिमित्त महिलांनी 'दिंडी' हा विशेष कार्यक्रम सादर केला. गळ्यात तुळशीमाळ घालून, डोक्यावर तुळशीची कुंडी व टाळ मृदुंगाच्या गजरात दिंडी सादर केली. यामध्ये बहुसंख्येने महिला सहभागी झाल्या. अविस्मरणीय असा कार्यक्रम सर्वांच्याच लक्षात राहिल.

- दि.२४/०७/२०१९ - श्री.गजानन भास्कर जोशी यांच्या काव्य वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यांनी वेगवेगळ्या कवींच्या कविता व त्यातील बारकावे उलगडून, आशय समावून सांगितला. पावसाच्या कविता, कोकणच्या निसर्गावरील कवितांमधून हुबेहुब कोकणचे नयनरम्य देखावे दृष्टीसमोर उभे केले. विशेष म्हणजे या कार्यक्रमाच्या दिवशी जोरदार पाऊस पडत होता आणि असे असूनही महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

वातावरण नयनरम्य होते. अशा वातावरणाचा आस्वाद अधिक वाढावा याकरिता कांदाभजी व चहाचा उपस्थितांना देण्यात आला. कार्यक्रम खूपच रंगला.

- दि.०७/०८/२०१९ – सर्वांचा आवडता व प्रिय श्रावण महिना. या श्रावण महिन्याचे स्वागत वनिता विश्वच्या भगिनींनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमाचे लेखन श्रीमती मीना सुर्वे यांनी केले होते.

  श्रीमती मीना सुर्वे यांनी श्रावणावर आधारित गाणी लिहिली होती. प्रत्येक दिवसाचे व श्रावणातील सणांचे महत्व सांगून त्यावर नृत्ये सादर करण्यात आली. निवेदिका अनिता संत आणि अलका मोघे यांनी सुंदरतेने व उत्तमरित्या केले. संगीत संयोजन पुष्पक नार्वेकर यांचे होते. पारंपारिक साड्या, आभूषणे, दहीहंडी, कोळीनृत्य, मंगळागौर असे श्रावण महिन्यातील कार्यक्रम महिलांनी सादर केले. हसरा नाचरा श्रावण यथोचित सादर केला. अप्रतिम कार्यक्रम झाला.

- दि.२१/०८/२०१९ – मंगळागौरी कार्यक्रम साजरा करण्यात आला. वनिता विश्वाच्या सर्व सख्यांनी हा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमासाठी बाहेरुन निमंत्रण येते. ही महत्वाची बाब.

- दि.२५/०९/२०१९ – श्रीमती धनलक्ष्मी गांधी यांनी टाय ॲन्ड डाय बांधणी या विषयावर महिलांना प्रात्यक्षिक व माहिती दिली. रुमाल, ओढणी, कपडा त्यावरील रंगसंगती, त्याच्या विशिष्ट प्रकारच्या गाठी बांधून डिझाईन कशी तयार होते व त्यातील बारकावे उलगडून दाखविले. या कार्यक्रमाला महिलांकडून उत्सफूर्त प्रतिसाद मिळाला.

- दि.०३/१०/२०१९ – नवरात्रीच्या निमित्ताने हळदीकुंकू व देवीची स्थापना करण्यात आली. गरबा व दांडीयारास नृत्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सभासद भगिनींनी या नृत्यात उत्साहाने भाग घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.
- दि.१६/१०/२०१९ – 'आनंद बाजार' भरवून महिलांसाठी महिलांनी स्वत: बनविलेल्या वस्तू, खाद्यपदार्थ यांची विक्रीकरिता स्टॉल लावण्यात आले होते. त्यामध्ये इमिटेशन ज्वेलरी, आयुर्वेदिक औषधे, पणत्या, दिवाळीसाठी रांगोळ्या, तोरणे, लोकरीचे विणकाम इत्यादींचे स्टॉल लावण्यात आले होते. विक्री चांगली झाली.
- दि.०६/११/२०१९ – श्रीमती अलका मोघे यांनी पाककौशल्यावरील टिप्स दिल्या. यामध्ये भडंग, मुखवास, सांबार मसाला, मेतकूट व त्याचे प्रमाण व बनविण्याची पध्दत इत्यादी बाबींबद्दल सविस्तर माहिती दिली.

- दि.२०/११/२०१९ – श्री.शंकर पालदेसाई, सन्मा.खजिनदार मराठा मंदिर यांचे 'माता न तु वैरिणी' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. व्याख्यानाच्या निमित्ताने मुलांवरील संस्कार व त्यांची मानसिकता यावर अतिशय सुंदर पध्दतीने श्री.पालदेसाई यांनी व्याख्यान दिले. उपस्थित महिलांना हा कार्यक्रम खूपच आवडला.

- दि.०४/१२/२०१९ – श्रीमती अमिता शहा यांनी वेगवेगळ्या चटण्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. चटण्या बनविताना किती प्रमाण घ्यावे व वेवेगळ्या पध्दतीने चटण्या कशा बनवायच्या याबाबत माहिती दिली.

- दि.२७/१२/२०१९ – गेलेल्या वर्षाचे आभार मानण्यासाठी व येणाऱ्या वर्षाचे उत्साहाने स्वागत करण्यासाठी सर्व महिला सभासदांकरिता स्नेहसंमेलन(पार्टी) आयोजित करण्यात आले होते. ख्रिसमस लाल पांढरा असा ड्रेसकोड देण्यात आला होता. यानिमित्ताने महिलांचे गुणविशेषांचे दर्शन घडविले. एकूणच महिलांनी नेहमीच्या व्यापातून स्वत:च्या आनंदासाठी मुक्तपणे धमाल केली.

- नवीन वर्षाची सुरूवात दणक्यातच झाली. दि.०८/०१/२०२० – डॉ.ज्योती सातपुते व डॉ.राजू सातपुते यांनी 'सांग दर्पणा–सौंदर्यविषयक कार्यशाळा' च्या माध्यमातून सौंदर्य व आरोग्य यामध्ये आयुर्वेदाचे किती महत्व आहे याबाबत माहिती दिली. डॉ.ज्योती सातपुते यांनी महिलांना सौंदर्यविषयक टिप्स दिल्या. घरच्या घरी सौंदर्य साबण कसा तयार करायचा त्याचे प्रात्यक्षिक दाखविले. तसेच त्यांची उत्पादने हर्बल सोप, शाम्पू, क्रीम, वॅसलीन यांची विक्री करण्यास ठेवले होते.

- काही कारणास्तव डिसेंबर २०१९ मध्ये आयोजित करण्यात आलेली सहल लांबणीवर पडली व ती दि.१८ व १९ जानेवारी २०२० रोजी आसनगांव येथील माऊली फार्मवर नेण्यात आली. निसर्ग सानिध्यात वेळ घालविल्यामुळे दैनंदिनी धकाधकीमधून थोडा बदल झाल्यामुळे सर्वांना खूप प्रसन्न व ताजेतवाने वाटले.

- दि.२२/०१/२०२० – मकर संक्रांतीनिमित्त महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ संपन्न झाला. त्यावेळी मराठी व हिंदी गाण्यांची मैफल आयोजित केली होती. श्री.पुष्पक नार्वेकर व त्यांच्या सहकाऱ्यांच्या 'तालपुष्प' या वाद्यवृंदाने मराठी व हिंदी सुमधुर गीतांनी कार्यक्रम सादर केला.

- दि.०५/०२/२०२० – खाद्यपदार्थ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. हिरवा वाटाण्यापासून एक तिखट व एक गोड पदार्थ तयार करुन सजावट करुन मांडण्यात आले होते. या स्पर्धेत २५ स्पर्धकांनी भाग घेतला. निर्मला निकेतनमधून पाक कौशल्येत प्राविण्य मिळविलेल्या श्रीमती गिरीबाला राऊत यांनी पदार्थांचे परीक्षण केले. आठ स्पर्धकांना बक्षिसे मिळाली.

  हुतात्मा वीर कोतवाल तरूण व तडफदार स्वातंत्र्यसेनानी यांच्या शौर्यगाथेवर आधारित पोवाडा व महितीविषयक कथाकथनाचा कार्यक्रम श्री.चंद्रशेखर पाटील यांनी सादर केला. श्री.अमित खोत व पुष्पक नार्वेकर यांनी अनुक्रमे डफ व तबल्याची साथ दिली.

- दि.११/०३/२०२० – महिला दिनाचे औचित्य साधून दि.११/०३/२०२० रोजी 'आनंदीबाई पेशवे – एक व्यथा' हा एकपात्री कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमातून आनंदीबाई पेशव्यांची इतिहासातील खलनायकी बाजू न दाखविता दुसरी बाजू दाखवून आनंदीबाईच्या मनातील व्यथा सादर करण्यात आली. दूरदर्शनवरील अभिनेत्री श्रीमती आरती मुनीश्वर यांनी हा कार्यक्रम सादर केला. पेशवेकालीन दागिने, साजशृंगार करुन सुमारे दीड तास अस्खलित मराठीत उत्तम सादरीकरण करण्यात आले.

म.मं.वनिता विश्वाने एप्रिल २०२० पर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. परंतु जगभरात पसरलेल्या कोवीड-१९ च्या साथीने सर्व जनजीवन ठप्प झाल्यामुळे पुढील कार्यक्रम घेता आले नाहीत. ही साथ संपल्यानंतर पुन्हा नव्या उमेदीने व उत्साहाने म.मं.वनिता विश्वाचे कार्यक्रम सादर केले जातील असा विश्वास आहे.

αα

## मराठा मंदिर कला केंद्र (१९५९)

मराठा मंदिर कलाकेंद्र, मराठा मंदिर, मराठा मंदिर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई.

### कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. श्री. दिलीप चव्हाण | – | कार्याध्यक्ष |
| २. श्री. प्रमोद साटम | – | उपकार्याध्यक्ष |
| ३. सौ. वैशाली भेंडे | – | चिटणीस |
| ४. श्री. राजेंद्र घाग | – | सभासद |
| ५. श्री. मधुसूदन सावंत | – | सभासद |
| ६. श्रीमती प्रियांका विचारे | – | सभासद |
| ७. श्रीमती मैत्रेयी आरस | – | सभासद |
| ८. सौ.माधवी नानल | – | सभासद |

**या वर्षातील विशेष उल्लेखनीय कार्य :-**

**एकपात्री/द्विपात्री नाटयअभिनय स्पर्धा –** मराठा मंदिरच्या धोरणानुसार नाट्यक्षेत्रात व कलाक्षेत्रात आपले करिअर करणाऱ्या हौशी नाट्यप्रेमींना स्वत:चे व्यासपीठ मिळावे व त्यांना त्यांची कला दाखविण्याची संधी मिळावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून कलाकेंद्राच्यावतीने दि.१९ जानेवारी २०२० रोजी एकपात्री आणि द्विपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. शालेय(इयत्ता ५वी ते १०वी) तसेच खुल्या गटासाठी (यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचाही समावेश होता.) अशा दोन गटांमध्ये ही स्पर्धा घेण्यात आली. मुंबई, ठाणे, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यापुरती ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला. सुमारे ४८ नामांकने स्पर्धेसाठी प्राप्त झाली.

या स्पर्धेसाठी अखिल भारतीय नाट्य परिषद, बोरीवली व 'अवतरण अकादमी'नाट्य संस्थेने बहुमोल सहकार्य केले. अवतरण अकादमीचे संस्थापक व अध्यक्ष श्री.संभाजी सावंत यांचे आयोजनासाठी अमोल मार्गदर्शन मिळाले. परिक्षक म्हणून नाट्य प्रशिक्षण क्षेत्रातील नामवंत दिग्गज सर्वश्री हेमंत लब्धे, निलेश नाईक, विजय लाड व श्री.संभांजी सावंत यांनी काम पाहिले.

मुंबई, ठाणे, गोवंडी, रत्नागिरी, कल्याण, नवी मुंबई, नालासोपारा, भाईंदर, बदलापूर आणि डहाणू येथून स्पर्धक आले होते. दोन्हीं गटात प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात परिक्षकांनी तसेच श्री.संभाजी सावंत यांनी स्पर्धकांनी सादर केलेल्या अभिनयाबाबत त्यांनी केलेल्या परिक्षणाच्या आधारे मार्गदर्शन केले.

या स्पर्धेमधील पारितोषिक विजेते स्पर्धक खालीलप्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| एकपात्री शालेय :- विद्यार्थ्यांकरिता | प्रथम क्रमांक | - राहूल पुजारे |
| | उत्तेजनार्थ | - तन्मय देशपांडे |
| | उत्तेजनार्थ | - आर्यन जोगळेकर |
| एकपात्री खुला गट :- | प्रथम क्रमांक | - सखी गुंडये |
| | द्वितीय क्रमांक | - सुयश देशपांडे |
| | तृतीय क्रमांक | - अनिरुध्द पेडणेकर |
| | उत्तेजनार्थ | - सोनल गवाणकर |
| | उत्तेजनार्थ | - कृपा शेटकर |
| द्विपात्री खुला गट :- | प्रथम क्रमांक | - किशोर राऊळ/श्रेयस लोहार |
| | द्वितीय क्रमांक | - हर्षदा बालगुडे/दिनेश पिटले |
| | तृतीय | - गणेश कदम/अजय कुलकर्णी |
| | उत्तेजनार्थ | - कौस्तुभ तावणी/सायली जोशी |

**कथक नृत्य स्पर्धा** - मराठा मंदिरच्या विश्वस्त व कलाकेंद्राच्या माजी कार्याध्यक्षा स्व.सौ.सीता टिपणीस यांच्या स्मृतीप्रित्यर्थ या पूर्वीही कथक नृत्य स्पर्धेचे आयोजन केले जात होते. परंतु दरम्यानच्या काळात खंड पडल्यानंतर मराठा मंदिरच्या अमृत महोत्सवाच्यानिमित्त हा उपक्रम पुनर्जिवित करावा या उद्देशाने या वर्षी रविवार दि.०९ फेब्रुवारी २०२० रोजी कथक नृत्य स्पर्धेचे मराठा मंदिरच्या श्रीमंत जिवाजीराव महाराज शिंदे सभागृह, मुंबई सेंट्रल, मुंबई येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला केवळ मुंबईच नव्हे तर वसई, डोंबिवली, ठाणे, व पुणे अशा विविध ठिकाणाहून स्पर्धक स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. उत्तम व उत्कृष्ट नृत्यकौशल्य असलेले स्पर्धक या स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. पहिला गट ८ते ११ वर्षे, दुसरा गट १२ ते १६ वर्षे, तिसरा गट १७ ते २३ वर्षे व चौथा गट २४ ते ३० वर्षे. अशा चार गटातून ही स्पर्धा आयोजित करण्यात आली.

पहिल्या गटामध्ये १३, दुसऱ्या गटामध्ये १५, तिसऱ्या गटामध्ये ११ आणि चौथ्या गटामध्ये २ अशा एकूण ४१ स्पर्धकांनी नाव नोंदणी केली होती. या स्पर्धकांनी त्यांच्या विहित नमुन्यातील अर्जासोबत त्यांच्या नृत्य अदाकारीची सीडी पाठविली होती. प्राप्त झालेल्या सीडीद्वारे स्पर्धकांचे नृत्याचे अवलोकन करुन अंतिम फेरीसाठी नृत्य सादरीकरण करण्याकरिता पहिल्या गटामध्ये १२, दुसऱ्या गटामध्ये १३, तिसऱ्या गटामध्ये ११ आणि चौथ्या गटामध्ये १ अशा एकूण ३७ स्पर्धकांची निवड करण्यात आली. स्पर्धेसाठी रोख पारितोषिके व प्रशस्तीपत्रके खालीलप्रमाणे विजयी स्पर्धकांना देण्यात आलीत.

| गट क्र. | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
|---|---|---|---|
| ए (८ ते ११ वर्षे) | रु.१००१/- | रु.७५१/- | रु.५०१/- |
| बी (१२ ते १६ वर्षे) | रु.१५०१/- | रु.१००१/- | रु.७५१/- |
| सी (१७ ते २३ वर्षे) | रु.२००१/- | रु.१५०१/- | रु.१००१/- |
| डी(२४ ते ३० वर्षे) | रु.२५०१/- | रु.२००१/- | रु.१५०१/- |

डी गटामध्ये केवळ एकाच स्पर्धकाची निवड करण्यात आल्यामुळे त्या गटामध्ये स्पर्धा न घेण्याचे ठरले. त्यानुसार ए, बी आणि सी या तीन गटामध्ये स्पर्धा घेण्यात आली. त्यातील पारितोषिक विजेते स्पर्धक पुढीलप्रमाणे :-

| | | | |
|---|---|---|---|
| ए गट (८ ते ११ वर्षे) | प्रथम क्रमांक | - | दिक्षा पात्रो |
| | द्वितीय क्रमांक | - | आर्या कवळेकर |
| | तृतीय क्रमांक | - | सायली पेडणेकर |
| बी गट (१२ ते १६ वर्षे) | प्रथम क्रमांक | - | आर्या म्हात्रे |
| | द्वितीय क्रमांक | - | श्रीनी सुवारे |

| | | | |
|---|---|---|---|
| | तृतीय क्रमांक | - | अवनी पटवर्धन |
| सी गट (१७ ते २३ वर्षे) | प्रथम क्रमांक | - | हर्षिता हाटे |
| | द्वितीय क्रमांक | - | निमिषा वालावलकर |
| | तृतीय क्रमांक | - | समृध्दी चव्हाण |

ए गटात सहभागी झालेली स्पर्धक कु.सारा मोरे हिला अप्रतिम नृत्य सादरीकरणासाठी विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला.

याव्यतिरिक्त स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकांना 'कलादीप' प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेचे परिक्षक म्हणून श्रीमती लता बाकाळकर आणि डॉ.वरदा पंडित यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.मधुरा भिवंडकर यांनी उत्कृष्टपणे केले.

या स्पर्धेला मराठा मंदिरचे पदाधिकारी, विश्वस्त व निमंत्रित चाहते उपस्थित होते. या स्पर्धेसाठी सौ.वैशाली भेंडे सन्मा.चिटणीस म.मं.कलाकेंद्र यांचे मौल्यवान मार्गदर्शन लाभले.

αα

## मराठा मंदिर-प्रागतिक संघ (१९७०)

मराठा मंदिर-प्रागतिक संघ, मराठा मंदिर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८.

### कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. श्री. दिलीप अ.चव्हाण | - | कार्याध्यक्ष |
| २. श्री. विनायक रा.घाग | - | उपकार्याध्यक्ष |
| ३. श्री. मधुकर गो. इंदूलकर | - | चिटणीस |
| ४. श्री. प्रमोद ब.साटम | - | सभासद |
| ५. श्री. प्रभाकर पवार | - | सभासद |
| ६. श्री. मधुसूदन सावंत | - | सभासद |
| ७. श्री. उदय सकपाळ | - | सभासद |
| ८. श्री. संदीप सावळ | - | सभासद |

**पुस्तक प्रत्यर्पण पेढी :-**

महाविद्यालयीन सर्व शाखांच्या गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी पुस्तक प्रत्यर्पण पेढी म.मं.प्रागतिक संघाच्यावतीने १९७१ पासून चालविली जात आहे. या योजनेअंतर्गत कला, वाणिज्य, शास्त्र, अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स इत्यादी विविध शाखांच्या पुस्तकांच्या किंमतीच्या एक चतुर्थांश एवढी अनामत रक्कम घेऊन विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी पुस्तके देण्यात येतात आणि वर्षअखेर त्यांच्या परीक्षा पूर्ण होताच पुस्तके परत घेऊन अनामत रक्कम विद्यार्थ्यांना परत करण्यात येते. अहवालसाली अत्यंत गरजु पाच विद्यार्थ्यांनी या पुस्तक प्रत्यर्पण पेढीचा लाभ घेतला.

**संस्कृत पाठांतर स्पर्धा :-**

अहवालसाली आंतरशालेय संस्कृत पाठांतर स्पर्धा बुधवार दि.१९ फेब्रुवारी २०२० रोजी आयोजित करण्यात आली होती. मुंबई, ठाणे, डोंबिवली येथून विविध शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या ११९ विद्यार्थ्यांनी स्पर्धेसाठी नावे नोंदविली होती. त्यातील ७२ विद्यार्थी सहभागी झाले. ही स्पर्धा शालेय इयत्तेनुसार दोन गटात भरविण्यात आली. या स्पर्धेमध्ये दिलेले विषय पुढीलप्रमाणे होते.

गट १ला इयत्ता ५वी ते ७वी कथाकथन

दुसरा गट - ८वी ते १०वी - भगवद्गीता अध्याय १५वा

पुढील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत बक्षिसे मिळविली.

**गट १ला :-**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | तनिष्क गिरीश जोशी | - | सरस्वती सेकंडरी स्कूल, ठाणे, जि.ठाणे. |
| द्वितीय क्रमांक | प्रथमेश संतोष धालावलकर | - | बालमोहन विद्यामंदिर, दादर, मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| तृतीय क्रमांक | वैष्णवती भरत लहाने | - | सरस्वती विद्यामंदिर, घाटकोपर, मुंबई. |
| उत्तेजनार्थ | १) सई दिपक घोगले | - | बालमोहन विद्यामंदिर, दादर, मुंबई. |
| (विभागून) | २) हार्दिकी सुनिल पाटील | - | एस.एम.शेट्टी हायस्कूल, दादर, मुंबई. |

**गट २रा :-**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | पृथा सुप्रिया मोघे | - | चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूल, गिरगांव, मुंबई. |
| द्वितीय क्रमांक | हर्षिक वाढे | - | कुमुद विद्यामंदिर हायस्कूल, देवनार, मुंबई. |
| तृतीय क्रमांक | अद्वैत पिंपळीकर | - | सरस्वती सेकंडरी स्कूल, टाणे, जि.ठाणे. |
| उत्तेजनार्थ | १) वैष्णवी दुदुसकर | - | सरस्वती विद्यामंदिर, घाटकोपर, मुंबई. |
| (विभागून) | २) सिद्धेश राऊत | - | माधवराव भागवत हायस्कूल, विलेपार्ले, मुंबई. |
| | ३) कार्तिकी नाईक | - | पांडुरंग विद्यालय, भांडुप, मुंबई. |

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री.प्रसाद कोचरेकर (एम.कॉम, एम.ए. हिंदी व संस्कृत) सहशिक्षक, श्री माधवराव भागवत हायस्कूल(मराठी माध्यम), विलेपार्ले, श्री.राहूल सातघर,एम.ए., बी.एड्.(संस्कृत) साठ्ये कॉलेज, विलेपार्ले, मुंबई येथे संस्कृत अध्यापक, श्रीमती तेजस्वीनी कोटियन, संस्कृत अध्यापिका, संस्कृत भाषा संस्था, दहिसर शाखा, मुंबई व श्री.साईशंकर ऐवाळे, एम.ए., बी.एड्.(संस्कृत) सहशिक्षक विद्यावर्धिनी संस्था संचालित विद्यामंदिर, गोरेगांव, मुंबई असे संस्कृत विषयात प्राविण्य संपादन केलेले परिक्षक लाभले होते. त्यांनी स्पर्धेशेवटी विवेचन करताना विद्यार्थी स्पर्धकांनी पाठांतर कसे करावे, संस्कृत भाषा कशी सुधारावी, संस्कृतची गोडी कशी टिकवावी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विजेत्या स्पर्धकांना आकर्षक पारितोषिके देण्यात आली. शिवाय सर्व स्पर्धकांना पेन सेट भेट देण्यात आला.

**शिवजयंती :-**

प्रतिवर्षी शिवजयंती उत्सव फाल्गुन वद्य तृतीयेस मराठा मंदिर दिमाखाने साजरा करते. उत्सवाचे हे ५६ वे वर्ष होते. हा सोहळा मराठा मंदिर मातृसंस्थेच्यावतीने म.मं.प्रागतिक संघाकडून आयोजित केला जातो. अहवालसाली फाल्गुन वद्य तृतीया ही तिथी दि.१२ मार्च २०२० रोजी होती. त्या वेळी श्री.विनोद अनंत मिस्त्री यांचे 'शिवकालीन इतिहासातून इतिहास घडवा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. डिजिटल माध्यमाच्याद्वारे मा.श्री.मिस्त्री यांनी शिवकालीन इतिहास उपस्थितांसमोर उभा केला. शिवकालीन इतिहासाची श्री.मेस्त्री यांनी अनेक उदाहरणे देऊन आजच्या तरुणांनी आणि समाजाने शिवकालीन इतिहासातून काय शिकले पाहिजे हे आपल्या भाषणातून सांगण्याचा प्रयत्न केला व शिवकालीन इतिहासच उभा केला होता. याप्रसंगी बाल शाहीर कु.ऋतुजा घुगे हिने छत्रपती शिवाजी महाराजांच्या रोमांचकारी लढाया व त्यानी मिळविलेला विजय सांगताना आपल्या आवेशपूर्ण भाषणाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या उत्सवाला मराठा मंदिरचे पदाधिकारी व शिवप्रेमिक बहुसंख्येने उपस्थित होते.

**कवी संमेलन :-**

मराठा मंदिर प्रागतिक संघाच्या विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदासुध्दा रविवार दि.१५ मार्च २०२० रोजी कवी संमेलन मराठा मंदिरच्या श्रीमंत जिवाजीराव महाराज शिंदे सभागृहात आयोजित करण्यात आले होते. परंतु जगभर पसरलेल्या कोरोना व्हायरसच्या प्रादुर्भावामुळे आयोजनाबाबत सरकारी बंधने घातली गेल्यामुळे मराठा मंदिच्या पदाधिकाऱ्यांकडून कार्यक्रम रद्द करावा अशा सूचना आल्यामुळे कवी समंलेनचा कार्यक्रम रद्द करावा लागला.

αα

## मराठा मंदिर महाराष्ट्र ज्ञानपीठ (१९८२)

मुख्य कार्यालय : मराठा मंदिर, २रा मजला, बाबासाहेब गावडे चौक, मराठा मंदिर मार्ग,
मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८.
कोकण विभागीय कार्यालय : महाराष्ट्र ज्ञानपीठ द्वारा, म.मं.अ.के.देसाई हायस्कूल, शिवाजीनगर,
जि.रत्नागिरी-४१५ ६१२. दूरध्वनी - ०२३५२२२१६५७ ई-मेल - maha.Dnyanpeeth@gmail.com

### कार्यकारी मंडळ

१) श्री. दिलीप चव्हाण - कार्याध्यक्ष
२) श्री. विनायक घाग - उपकार्याध्यक्ष

३) सौ.सुरक्षा घोसाळकर – चिटणीस
४) श्री.मनोज देशमुख – सभासद
५) श्री.मधुकर इंदुलकर – सभासद
६) श्री. नारायण आंगणे – सभासद

**कार्याची थोडक्यात माहिती :–**

महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराती आणि उर्दू भाषेतील सर्व परीक्षार्थींना अल्प परीक्षा शुल्कात ज्ञानाचा भरपूर लाभ व्हावा या उद्देशाने आदरणीय बाबासाहेब गावडे यांनी मराठा मंदिरमध्ये महाराष्ट्र ज्ञानपीठाची दिनांक १ डिसेंबर १९८२ रोजी स्थापना केली. त्यास ३८ वर्षाचा कालावधी पूर्ण होत आहे. विद्यार्थ्यांच्या बुध्दीच्या विकासासाठी पूरक असणाऱ्या गणित, इंग्रजी, संस्कृत, मराठी, सामान्यज्ञान, चित्रकला व शिष्यवृत्ती सराव या विषयांच्या स्वतंत्र परीक्षा इयत्ता १ली ते १०वी पर्यंतच्या त्यांच्याच क्रमिक पुस्तकांवर आधारीत अभ्यासक्रमांवर आयोजित केल्या जातात.

महाराष्ट्र ज्ञानपीठाच्याविद्यमाने घेतल्या जाणाऱ्या परीक्षा या शालेय स्तरावर असल्यामुळे महाराष्ट्रातील अनेक शाळांतील विद्यार्थी या परीक्षेला बसत असतात. त्यांच्या शाळेतून घेतल्या जाणाऱ्या परीक्षा प्रक्रियेसोबत बाहेरील संस्थाकडून त्यांच्या पाठ्यक्रमातील अभ्यासक्रम त्यानी किती आत्मसात केला आहे याचे मूल्यमापन विद्यार्थी व संबंधित शाळांना करता यावे व विद्यार्थ्यांकडून जास्तीत जास्त सराव करुन घेऊन जास्तीत जास्त गुण मिळविण्यासाठी उद्युक्त करावे असा प्रयत्न महाराष्ट्र ज्ञानपीठ आजवर करीत आला आहे व हाच उद्देश महाराष्ट्र ज्ञानपीठाच्या स्थापनेतील आहे.

संस्थेच्या ह्या उपक्रमाद्वारे महाराष्ट्रातील विविध माध्यमांच्या शाळांतून प्रतिवर्षी विविध विषयांच्या शालेय अभ्यासक्रमांशी निगडीत असलेल्या परीक्षा घेण्याचा फायदा विद्यार्थ्यांना पुढील जीवनात होत असतो असे पालक सांगत असतात. शाळांनी घेतलेली परीक्षा आणि म.मं.महाराष्ट्र ज्ञानपीठाने घेतलेल्या परीक्षा यामध्ये विद्यार्थ्यांना फरक जाणवतो व त्याचा उपयोग पुढील स्पर्धात्मक परीक्षेच्या वेळी होतो.

मराठा मंदिरचे महाराष्ट्र ज्ञानपीठ मराठी भाषेव्यतिरिक्त इंग्रजी, हिंदी, गुजराती व उर्दू या भाषांतूनही परीक्षा घेत असते. त्यामुळे बहुभाषिक विद्यार्थ्यांना या संधीचा फायदा देण्याचा महाराष्ट्र ज्ञानपीठाचा हा उपक्रम सर्वदूर कौतुकास पात्र ठरीत आहे.

महाराष्ट्रातील शाळांतील शैक्षणिक दर्जा उंचवावा, आणि विद्यार्थ्यांमधील अभ्यासाची गोडी वर्धित व्हावी, हा उदात्त दृष्टिकोन मराठा मंदिराच्या महाराष्ट्र ज्ञानपीठाने जपलेला आहे.

अहवालसाली विविध विषयांच्या परीक्षा घेण्यात आल्या, त्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| **विषय** | **अहवालसाली सहभागी केंद्रांची संख्या** | **अहवालसाली सहभागी परीक्षार्थी संख्या** |
|---|---|---|
| सामान्यज्ञान | २७ | ४१६६ |
| चित्रकला | ४८ | ४५२८ |
| मराठी | ४८ | ५३३८ |
| शिष्यवृत्ती सराव परीक्षा | १ | १०० |
| संस्कृत | १४ | १३१५ |
| गणित | १५७ | १९२१६ |
| इंग्रजी | १३२ | १६४२३ |
| **एकूण** | **४२७** | **५१०८६** |

सहभागी केंद्रांची अर्थातच परीक्षार्थींची संख्या या वर्षी विशेष वाढली नाही. त्याचे सर्वसाधारण कारण असे आहे की, मराठी माध्यमांच्या शाळांची होत असलेली परवड. तरीसुध्दा महाराष्ट्रातील ग्रामीण भागात मराठी माध्यमाच्या शाळा अजूनही टिकून आहेत. या शाळांपर्यंत पोहचण्याचा मराठा मंदिर महाराष्ट्र ज्ञानपीठ अधिक प्रयत्न करीत असते.

मराठा मंदिर महाराष्ट्र ज्ञानपीठाने सन १९१६-१७ पासून इयत्ता १ली व २रीच्या विद्यार्थ्यांसाठी सुध्दा परीक्षांचे आयोजन केले आहे.

मराठा मंदिर महाराष्ट्र ज्ञानपीठात गुणवत्ता यादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक देवून गौरविण्यात येते.

मराठा मंदिर महाराष्ट्र ज्ञानपीठातर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला, सामान्य ज्ञान परीक्षा व मराठी इयत्ता १०वी या परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासून निकाल शाळांना पाठविण्यात आले आहेत. परंतु इतर विषयांचे निकाल जाहिर करता आलेले नाहीत. कारण भारतात कोवीड-१९ या विषाणुच्या प्रादुर्भावामुळे जनजीवन व सर्व व्यवहार दि.१८ मार्च २०२० पासून बंद करण्यात आले. तेव्हापासून लोकल रेल्वे व बस सेवा खंडित करण्यात आली. त्यामुळे ज्ञानपीठाच्यावतीने घेण्यात आलेल्या परीक्षांच्या बाहेरगावच्या शाळांकडून पाठविण्यात आलेल्या उत्तरपत्रिका एस.टी.बस डेपो, शाळांमध्येच अडकून पडलेल्या आहेत. काही शाळांच्या प्रशासकीय अडचणींमुळे त्यांनी परीक्षा उशीरा घेतल्या. म्हणून उत्तरपत्रिका ज्ञानपीठाकडे शाळांकडून प्राप्त झालेल्या नाहीत. कोविड-१९ महामारीच्या परिस्थितीमधून जनजीवन पूर्वस्थितीत येईल त्यानंतर घेण्यात आलेल्या परीक्षेबाबत महाराष्ट्र ज्ञानपीठ निर्णय घेईल.

αα

## मराठा मंदिर मोफत कायदेविषयक सल्ला केंद्र (१९८३)

मराठा मंदिर मोफत कायदेविषयक सल्ला केंद्र, ३रा मजला, मराठा मंदिर इमारत,
मुंबई सेंट्रल, मुंबई.

### कार्यकारी मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| १. ॲड. प्रदीप बा.विचारे | कार्याध्यक्ष | ५) ॲड.जितेंद्र पाटील | सभासद |
| २. ॲड.नाथा जाधव | उपकार्याध्यक्ष | ६) ॲड.नीता कानन | सभासद |
| ३. ॲड.ए.एन.मुल्ला | चिटणीस | ७) ॲड.वर्षा देशमुख | सभासद |
| ४. ॲड.मेहराज मुतवल्ली | सभासद | | |

मराठा मंदिरच्या सामाजिक बांधिलकीच्या ध्येय-धोरणानुसार गेली ३५ वर्षे या शाखेच्यावतीने गरजू, घटस्फोटित व पीडित स्त्रिया तसेच गरीब, निराधार, एकाकी पडलेल्या व्यक्तींना मोफत कायदेशीर सल्ला देऊन त्यांची समाजामध्ये फसवणूक होवू नये याकरिता योग्य दिशा दाखविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या शाखेमध्ये मुंबईच नव्हे तर नवी मुंबई, पनवेल, ठाणे, कल्याण, भाईंदर, विरार या व इतर ठिकाणाहून गरजू आणि आर्थिक बाजू कमकुवत असलेल्या व्यक्ती सल्ला घेण्यासाठी येत असतात.

या शाखेमध्ये सल्ला मागण्यासाठी येणाऱ्या व्यक्तीकडून विहित नमुन्यातील अर्ज भरुन घेतला जातो. त्यांच्या समस्येचे स्वरुप जाणून घेऊन त्याना योग्यतो कायदेशीर सल्ला देण्यात येतो. काही प्रकरणी अर्जदारांच्या तक्रारी जाणून घेऊन दोन्हीं व्यक्तींना मराठा मंदिर येथील कार्यालयात बोलावून त्यांच्यामध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. काही बाबतीत आवश्यकतेनुसार कोर्टात दावा दाखल करण्याबाबतही त्याना मार्गदर्शन केले जाते. याव्यतिरिक्त घर, जमीनजुमला, कामगार इत्यादी प्रकरणांमध्येही योग्यतो कायदेशीर सल्ला मोफत दिला जातो.

मराठा मंदिरचे अमृत महोत्सवी वर्ष. त्यानिमित्ताने म.मं.मोफत कायदेविषयक सल्ला केंद्राच्यावतीने बुधवार दि.४ मार्च २०२० रोजी मा.श्री.एम.एम.राजाध्यक्ष, निवृत्त प्राचार्य, न्यू लॉ कॉलेज, माटुंगा, मुंबई आणि माजी अध्यक्ष कन्झ्युमर गाईडन्स सोसायटी, मुंबई यांचे **"स्त्रीची प्रतिष्ठा आणि त्यांचे वैवाहिक हक्क आणि कर्तव्ये"** (Dignity of Woman and their matrimonial rights obligations) या विषयावर मराठीत व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्री.एम.एम.राजाध्यक्ष यांनी स्त्रियांसंदर्भात असलेल्या विविध कायद्यांबाबत मार्गदर्शन केले व उपस्थित स्त्रियांच्या शंकांचे निरसन केले. या कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, विश्वस्त व इतर मान्यवर उपस्थित होते.

या केंद्राचे काम शुक्रवार तसेच शनिवार (दुसरा व चौथा सोडून) दु.३.३० ते ५.३० दरम्यान ॲडव्होकेट श्री.प्रदीप बा.विचारे कार्याध्यक्ष, ॲड.नाथा जाधव, उपकार्याध्यक्ष ॲड.ए.एन.मुल्ला, सन्मा.चिटणीस, हे व ह्यांच्या मार्गदशनाखाली ॲड.मेहराज मुतवल्ली, ॲड.जितेंद्र पाटील व इतर हजर असलेल्या संस्थेच्या वकीलांमार्फत होत असते.

जगभरात पसरलेल्या कोवीड-१९ या साथीच्या प्रदुर्भावामुळे सर्व दि.१८ मार्च २०२० पासून व्यवहार ठप्प झाले. मराठा मंदिर संस्थाही दि.१८ मार्च २०२० पासून बंद ठेवण्यात आली. अहवालसाली ४५ गरजु व्यक्तींनी या केंद्राचा लाभ घेतला. सर्व व्यवहार सुरुळीत झाल्यानंतर म.मं.मोफत कायदेविषयक सल्ला केंद्राचे कार्य पुन्हा जोमाने सुरू होईल.

αα

## मराठा मंदिर बाबासाहेब गावडे चॅरिटेबल हॉस्पिटल, विलेपार्ले(पूर्व), मुंबई (२००४)

मराठा मंदिर बाबासाहेब गावडे चॅरिटेबल हॉस्पिटल(बाबुराव परांजपे मेमोरियल ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने)
प्लॉट नं.७७, मोघीबाई मार्केट, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले(पूर्व), मुंबई ४०० ०५७.
दूरध्वनी क्र. २६१०२२७७/२६१०२२८०/७२०८०१२२७७ ई-मेल आयडी mmbgmc@gmail.com

### कार्यकारी मंडळ

१. श्री.राजेंद्र प्र.गावडे – कार्याध्यक्ष
२. श्री.श्रीकृष्ण अ.विचारे – उपकार्याध्यक्ष
३. श्री.चंद्रकांत मु.खोपडे – चिटणीस
३. डॉ.नितीन श्री.विचारे – सभासद
५. श्री.मनोहर साळवी – सभासद
६. श्री.विजय ठाकरे – सभासद
७. डॉ.सुवर्णा पवार – सभासद
८. सौ. बिना गोहोकर – सभासद

**उपभोक्ता संख्या :-**

अहवालसाली हॉस्पिटलमध्ये खालीलप्रमाणे रूग्णांनी लाभ घेतला त्यांची संख्या.

| विभाग | रुग्णांची संख्या दि.१ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९ | रुग्णांची संख्या दि.१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० |
|---|---|---|
| बाह्य रुग्ण विभाग | १९७१४ | २०५७३ |
| आंतर रुग्ण विभाग | १९६७ | १९७१ |
| शास्त्रक्रिया | ८९० | ९६१ |

**कार्याची माहिती :-**

**बाह्यरुग्ण विभाग –**

निदान चिकित्सा सुविधा – २४ तास पॅथोलॉजी, २४ तास डिजिटल एक्सरे, सोनोग्राफी, मेमोग्राफी, ई.सी.जी., कार्डिओलॉजी, डायालिसिस, एन.एस.टी.

वैद्यकीय सुविधा – डायबेटोलॉजी, डरमटोलॉजी, डेंटीस्ट्री, ई.एन.टी., जनरल मेडिसीन, जनरल सर्जरी, गायनकॉलॉजी, नेफ्रोलॉजी, ऑफ्थल्मोलॉजी, पिडियाट्रीक्स, फिजिओथेरेपी, प्लास्टिक सर्जरी, सायकॅट्री, युरोलॉजी, ऑर्थोपेडिक, पल्मोनोलॉजी.

**आंतररुग्ण विभाग –**

आय.सी.यू :- पुढील अद्ययावत सुविधांनी सज्ज असा ६ खाटांचा अतिदक्षता विभाग.

- मल्टीपॅरा मॉनिटर्स सेंट्रल मॉनिटरींग सिस्टम.
- सर्व्हो एस/आय- मॅक्वेट व्हेंन्टिलेटर.

- सेंट्रलाईज्ड ऑक्सिजन सप्लाय.
- डायलिसिस विभाग.

एन.आय.सी.यू. :- पुढील अद्ययावत सुविधांनी सज्ज असा ७ खाटांचा नवजात शिशू अतिदक्षता विभाग.

- सर्व्हो एस- मॅक्वेट व्हेंन्टिलेटर.
- सर्व्हो कंट्रोल रेडियंट हिट वॉर्मर.
- डबल फोटोथेरपी युनिट .
- मल्टीपॅरा मॉनिटर्स इत्यादी.

शल्यचिकित्सा गृह :-

- सी आर्म असलेले १ मेजर ऑपरेशन थिएटर.
- १ मायनर ऑपरेशन थिएटर.
- डोळे, कान-नाक-घसा यांच्या शस्त्रक्रियेसाठी अद्ययावत ऑपरेशन थिएटर.

वॉर्डस् :- जनरल वॉर्ड, नॉन ए.सी.ट्वीन शेअरिंग, ए.सी.ट्वीन शेअरिंग, डिलक्स रुम्स.

सर्व मिळून ३५ रुग्णांची सोय.

**विशेष उल्लेखनीय कार्य :-**

- म.मं.बाबासाहेब गावडे चॅरिटेबल हॉस्पिटलला 'भारतीय गुणवत्ता मंडळाचे' घटक मंडळ असलेल्या 'एन.ए.बी.एच.' चे मान्यतापत्र दि.९ जून २०१९ ते दि.०८ जून २०२१ या कालावधीसाठी प्राप्त झाले.
- मराठा मंदिर संस्थेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त रुग्णालयामध्ये दि.१७ व १८ जानेवारी २०२० रोजी ७५% सवलतीच्या दरात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यर्चीं आले होते. त्यामध्ये विविध रक्तचाचण्या, इ.सी.जी., छातीचा एक्स-रे, रक्तदाब तपासणी इत्यादी तपासण्यांचा समावेश होता.या शिबीराचा १२८ रुग्णांनी लाभ घेतला.
- दि.०८ मार्च २०२० रोजी महिला दिनानिमित्त महिलांसाठी ७०% सवलतीच्या दरात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विविध स्त्री रोग विषयक तपासणी, स्तन तपासणी, रक्तचाचण्या, इ.सी.जी., पॅप स्मिअर, सोनोग्राफी मेमोग्राफी इत्यादिचा समावेश होता. त्याचा ६० महिलांनी लाभ घेतला. 'आजच्या जगात महिलांच्या आरोग्याचे महत्त्व' या विषयावर रुग्णालयाच्यावतीने डॉ.रुपाली धारवाडकर यांनी 'पार्ले टिळक विद्यालय-आय.सी.एस.इ.' या शाळेच्या कर्मचाऱ्यांना व त्याच विषयावर डॉ.फाल्गुनी संजानवाला यांनी रुग्णालयर्चीं ५० महिलांच्या समुहाला मोफत मार्गदर्शन केले.

**संस्थेला मिळालेल्या देणग्या**

पटेल ईश्वरभाई जोईतराम पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट आणि बाबासाहेब गावडे चॅरिटेबल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने जुलै २०१४ पासून डायलिसीस व सोनोग्राफी विभागात येणाऱ्या आर्थिक गरजु रुग्णांच्या उपचारांवर/ तपासणीवर ५०% सवलत दिली जात आहे. त्याअंतर्गत अहवालसाली रुग्णांना खालीलप्रमाणे लाभ झाला.

| विभाग | रुग्णांची संख्या | सवलतीची रक्कम (रू.) |
|---|---|---|
| डायालिसिस | ४१९ | १५९६२०/- |
| सोनोग्राफी | १८६ | ९००९१/- |

**विकासासाठी केलेले कार्य :**

बाबासाहेब गावडे चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये 'रोटरी क्लब ऑफ मुंबई नॉर्थ एन्ड' या संस्थेच्या मदतीने निम्नलिखित ३ मशीन्स घेण्यात आल्या. त्यामध्ये रोटरी क्लब ऑफ मुंबई नॉर्थ एन्ड' या संस्थेचा वाटा रु.५६,५०,०००/- इतका व 'मराठा मंदिर'चा वाटा रुपये ११,५०,०००/- इतका आहे.

- लॅप्रोस्कोपी मशीन – स्ट्रायकर १५८८
- सोनोग्राफी मशीन – विप्रो जी.इ.वॉल्युसान एस.८
- इम्युनोअसाय ॲनालायझर – बायोमुरेक्स मिनी विडास.

αα

# मराठा मंदिर बाबासाहेब गावडे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज् (१९९८)

**(M.M. B.G.I.M. Studies)**

बाबासाहेब गावडे चौक, मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८, दूरध्वनी क्र.६६०४४१००
ई मेल director@mmbgims.com

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| ०१. श्री. राजेंद्र प्र.गावडे | - | चेअरमन |
| ०२. डॉ. शिवाजी भोसले | - | व्हाईस चेअरमन |
| ०३. सौ. सोनम निशाणदार | - | सन्मा.चिटणीस |
| ०४. सौ. स्मिता राणे | - | सभासद |
| ०५. श्री. संतोष घाग | - | सभासद |
| ०६. श्री. प्रभाकर जाधव | - | सभासद |
| ०७. श्रीमती सायली राणे | - | निमंत्रित |

''मराठा मंदिर बाबासाहेब गावडे इन्स्टिट्यूट ऑफ स्टडिज'' ही संस्था सन १९९८ साली अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली(केंद्र सरकार) यांच्या व तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेने सुरु करण्यात आली आहे. ही संस्था मुंबई विद्यापीठाशी सलंग्नीत आहे.

अहवाल वर्षात गव्हर्निंग बॉडीच्या ५ सभा आयोजित करण्यात आल्या व सभासदांनी यशस्वी वाटचालीसाठी संस्थेला मार्गदर्शन केले.

मराठा मंदिर बाबासाहेब गावडे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज् या संस्थेमध्ये मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडिज हा पूर्णवेळ दोन वर्षाचा अभ्यासक्रम चालविला जातो. शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये प्रथम वर्षाला ८१ व दुसऱ्या वर्षाला ६८ विद्यार्थी शिकत आहेत.

प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे वर्ग सुरु होण्याअगोदर **"Orientation Programme"** चे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विविध व्याख्यात्यांनी मार्गदर्शन केले. तसेच इन्स्टिट्यूटच्या वातावरणाविषयी माहिती, नियम, अभ्यासक्रमाची ओळख करुन देण्यात आली. विद्यार्थ्यांना नोकरी कशी निवडावी व सध्या कोणत्या क्षेत्रात वाव आहे याबद्दलही मार्गदर्शन करण्यात आले.

उन्नत भारत अभियान हे भारत सरकारच्या ग्रामीण विकास विभागअंतर्गत डिपार्टमेंट ऑफ हायर एज्युकेशन, नवी दिल्ली यांच्या माध्यमाने हे अभियान चालविण्यात येते. या अभियानाअंतर्गत प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना उन्नत भारत अभियानाचे गावांचा सर्व्हे करण्यासाठी पालघर जिल्ह्यातील सरावली, उमरोली आणि चिंचणी या ठिकाणी गेली होती. त्यांच्या सोबत संचालिका डॉ.चित्रा गौंडर, श्री.विनय तिवारी आणि श्री.संतोष दातखिळे हे मार्गदर्शन करण्यासाठी गेले होते. दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना या अभियानाअंतर्गत सर्व्हे करण्यासाठी अलिबाग जिल्ह्यातील तिनवीरा आणि पळी या गावांचा सर्व्हे करण्यासाठी नेण्यात आले होते. त्यांच्या सोबत डॉ.गोविंद शिंदे आणि श्रीमती राजश्री सोनावणे ह्या मार्गदर्शन करण्यासाठी गेल्या होत्या.

## तज्ज्ञांची व्याख्याने

संस्थेने यंदा खालील विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

| Sr. No. | Topic |
|---|---|
| 1 | National Level Awareness Program ( NLAP) |

## मॅग्मा

या वर्षी दि.११/०३/२०२० ते १३/०३/२०२० या कालावधीमध्ये 'MAGMA' चे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये अंताक्षरी, रिंक फुटबॉल, बॉक्स क्रिकेट व रस्सीखेच अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. दि.१३/०३/२०२० रोजी मराठा मंदिर श्री जिवाजीराव महाराज शिंदे सभागृहामध्ये सांस्कृतिक सोहळ्यात डान्स,

फॅशन शो अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून श्रीमती वैशाली भेंडे व श्रीमती पुजा जांबोटकर उपस्थित होत्या.

**ग्रंथालय सुविधा**

इन्स्टिट्यूटमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मराठा मंदिरच्या इमारतीत ग्रंथालय आहे. त्यामध्ये तळ मजल्यावर पुस्तक विभाग व पहिल्या मजल्यावर वाचन कक्ष असे २६०० चौ.फूटाचे अद्ययावत ग्रंथालय असून त्यामध्ये सध्या ११००० हून अधिक पुस्तके, २४ नियतकालिके आणि ०२हून अधिक आंतरराष्ट्रीय नियतकालीकाचा समावेश आहे. त्यामध्ये "All India Management Association, Association of Indian Management Schools, Bombay Chamber of Commerce & Industry, Bombay Management Association, Indian Marchants Chamber, Indian Society for Training and Development आणि National Institute of Personel Management" या संस्थांचा समावेश होतो. अशाप्रकारे ग्रंथालय पूरक व सुसज्ज बनविण्यात आलेले आहे. तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी Reference room, Seminar Room, Digital Library, Internet Facility यांचीही सुविधा आहे. संस्थेतील विद्यार्थ्यांना मुलाखत तंत्र अवगत होण्यासाठी डॉ.गोविंद शिंदे आणि डॉ.विद्या हत्तंगडी यांनी सप्टेंबर २०१९ मध्ये चार दिवस शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांचे Mok Interview घेतले. तसेच इतर प्राध्यापकांनी देखील यात आपला सहभाग नोंदविला.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये मुंबई विद्यापीठाच्या एम.एम.एस.सत्र-३ परीक्षेचा निकाल ९४% लागला तसेच प्रथम वर्ष एम.एम.एस.सत्र-१ चा देखील निकाल १००% लागला.

αα

## मराठा मंदिर बाबासाहेब गावडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (१९९७)

**(B.G.I.T.)**

मराठा मंदिर ॲनेक्स, बाबासाहेब गावडे चौक, मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८,
दूरध्वनी क्र.६६०४४१००
ई मेल principal@marathamandir.com

**कार्यकारी मंडळ**

१. श्री. राजेंद्र प्र.गावडे - चेअरमन
२. श्री. संजय राणे - व्हाईस चेअरमन
३. सौ. सोमन निशाणदार - सन्मा.चिटणीस
४. श्री.मनोज देशमुख - सभासद
५. श्री.विजय ठाकरे - सभासद
६. डॉ.नितीन विचारे - सभासद
७. सौ.स्मिता राणे - सभासद
८. श्री.अभिजित देशमुख - सभासद

" म.मं.बाबासाहेब गावडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी" ही संस्था सन १९९७ साली अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली(केंद्र सरकार) यांच्या व तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेने सुरु करण्यात आली आहे. ही संस्था महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याशी संलग्नीत आहे.

संस्थेत खालील पूर्णवेळ पदविका अभ्यासक्रम राबविले जातात.

१) कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी २) कॉम्प्युटर इंजिनिअरींग ३) इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन

**शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील एकूण विद्यार्थ्यांची संख्या**

| अभ्यासक्रमाचे वर्ष | कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन | एकूण |
|---|---|---|---|---|
| द्वितीय वर्ष | ३३ | ३८ | ०१ | ७२ |
| तृतीय वर्ष | ३८ | २७ | २० | ८५ |
| एकूण विद्यार्थी | ७१ | ६५ | २१ | १५७ |

शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संस्थेने अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्याकडे म.मं.बाबासाहेब गावडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पूर्णवेळ पदविका अभ्यासक्रम बंद करण्यासाठी अर्ज केला आहे.

αα

## मराठा मंदिर बाबासाहेब गावडे स्कूल ऑफ क्रिएटिव्ह आर्टस् (२०२०)

मराठा मंदिर ७५ वा वर्धापन दिन (अमृत महोत्सव) साजरा करीत आहे. बदलत्या काळाबरोबर चालत राहणे आणि सर्जनशील कलांमध्ये उपलब्ध असलेल्या अफाट संभाव्यतेचा टप्प्याटप्प्याने प्रगतीसाठी चरण-दर-चरण मराठा मंदिर संस्था कायम प्रगतीशील राहिली आहे. मराठा मंदिरने बाबासाहेब गावडे स्कूल ऑफ क्रिएटिव्ह आर्टस्ची स्थापना केली. ही स्थापना शारीरिक, बौध्दिक आणि एकीकरणासंबंधित कारणांसाठी केली गेली आहे.

म.मं.बाबासाहेब गावडे स्कूल ऑफ क्रिएटिव्ह आर्टस्चा हेतु शिक्षण, संस्कृती आणि कला यांच्यातील अधिक गतीशील आणि फलदायी संबंधित विद्या शाखा सक्षम करण्यासाठी आहे. मल्टी-आवॉर्ड जिंकणाऱ्या लंडन कॉलेज ऑफ आर्टस्च्या संयुक्त विद्यमाने मराठा मंदिरच्या बाबासाहेब गावडे स्कूल ऑफ क्रिएटिव्ह आर्टस् अंतर्गत एलांक मेकअप अभ्यासक्रमाचे उद्घाटन दि.०७ फेब्रुवारी २०२० रोजी कु.प्रियंका करुणाकरण ह्यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

सहा आठवड्यांचा डिप्लोमा इन मेकअप आर्टिस्ट्री किंवा सर्टिफिकेट कोर्स राबविण्यात येत आहेत. डिप्लोमा अंतर्गत पाच घटक शिकविण्यात येणार आहेत. ते पाच घटक म्हणजे बेसिक मेकअप, ब्रायडल, पार्टी क्रिएटिव्ह व स्पेशल इफेक्टस् मेकअप. एलांक आणि लंडन कॉलेज ऑफ आर्टस्ने इच्छुक विद्यार्थ्यांना डिप्लोमाऐवजी सर्टिफिकेट कोर्स करण्याची सुविधा सुध्दा उपलब्ध करुन दिली आहे. प्रत्येक घटकाचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर एक चाचणी परीक्षा घेण्यात येईल.

एलांकच्या उद्घाटनानंतर खालील कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

- कु.नम्रता परुळेकर यांनी 'मास्टरक्लास इन बेसिक पर्सनल ग्रुमिंग' कार्यशाळा घेतली.
- आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त कु.मल्लिका पिरानी ह्यांचा 'सेल्फ ग्रुमिंग एन्ड हेअरस्टाईलिंग कोर्स' हा खास महिलांसाठी अभ्यासक्रम घेण्यात आला.

αα

## मराठा मंदिर नाविक सैनिक शाळा (१९९९)

### कार्यकारी मंडळ

श्री.विकास बा.सावंतभोसले - कार्याध्यक्ष

मराठा मंदिराला नाविक सैनिक शाळेचा प्रकल्प राबविण्यासाठी भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या आवास येथील गट क्र.७०८ मधील २७.५० एकर दिलेल्या जमीनीवर मराठा मंदिरने नाविक सैनिक शाळेचा प्रकल्प राबवू न शकल्यामुळे शासनाच्या अटी व शर्तींचा भंग केल्यामुळे जमीन शासनाकडे परत करावी असे मा.रायगड जिल्हाधिकारी यांनी कळविल्यामुळे मराठा मंदिरच्यावतीने निवेदन सादर करण्यात आले आहे.

संस्थेच्या या निवेदनावर शासनाने दि.२९/०७/२०१७ च्या पत्रान्वये संस्थेला नाविक सैनिक शाळेच्या प्रकल्पासाठी देण्यात आलेली जमीन शासन जमा करण्याचा आदेश दिला. या आदेशास त्वरीत स्थगिती देण्याबाबत व संबंधित जमिनीवर वन खात्याने घेतलेला हक्क सोडून ती जमीन मराठा मंदिर, मुंबई या संस्थेला वर्ग करण्याबाबत मा.ना.श्री.चंद्रकांत पाटील, महसूल व सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य याना निवेदन सादर करण्यात आले आहे.

परंतु शासनाकडून या आदेशास स्थगिती न देण्यात आल्यामुळे डिव्हीजनल कमिशनर, कोकण विभाग यांच्याकडे संस्थेच्यावतीने याचिका दाखल करण्यात आली आहे.

αα

# मराठा मंदिर साहित्य शाखा (१९९५)

## कार्यकारी मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. दिलीप चव्हाण | – | कार्याध्यक्ष |
| २. | श्री. यशवंत कदम | – | उपकार्याध्यक्ष |
| ३. | श्री. मधुकर इंदुलकर | – | चिटणीस |
| ४. | सौ.सुवर्णा पवार | – | सभासद |
| ५. | डॉ.प्रकाश साटम | – | सभासद |

### शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी काव्य व कथा लेखन स्पर्धा

मराठा मंदिरने ७५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. हे वर्ष अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्याचे संस्थेने ठरविले व त्यानुसार समाजसेवेचे विविध उपक्रम संस्थेच्या वेगवेगळ्या शाखांनी हाती घेऊन समाजसेवेचे व्रत असेच पुढे चालू ठेवावयाचा संस्थेने मनोदय व्यक्त केला.

मराठा मंदिरची साहित्य शाखा हे वर्ष साहित्य उत्सव-२०१९ म्हणून साजरे करीत असताना या वर्षातील पहिला कार्यक्रम शनिवार दि.३० नोव्हेंबर २०१९ रोजी संपन्न झाला.

महाराष्ट्र राज्यातून विविध शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता काव्य, कथा व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शालेय विद्यार्थ्यांसाठी काव्य लेखन स्पर्धेकरिता इयत्ता ५वी ते ७ वीकरिता ‘मैत्री/आठवण’ आणि इयत्ता ८वी ते १०करिता ‘जीवन/स्वप्न’ असे विषय देण्यात आले होते.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ‘मला आवडलेले’ पुस्तक या विषयावर निबंध मागविण्यात आला. तसेच स्वरचित कथा मागविण्यात आल्या. या उपक्रमास विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. काव्य लेखन स्पर्धेसाठी इयत्ता ५वी ते ७वी १३४ व ८वी ते १०वी १८२ विद्यार्थ्यांनी कविता पाठविल्या होत्या. कथा लेखन स्पर्धेसाठी २४ विद्यार्थ्यांकडून कथा प्राप्त झाल्या. तसेच ३८ विद्यार्थ्यांकडून निबंध सादर करण्यात आले. प्राप्त झालेल्या या साहित्याचे मराठी साहित्य विश्वातील नावाजलेल्या परीक्षकांनी यथोचित परीक्षण केले. या स्पर्धांचा निकाल पुढीलप्रमाणे :-

**काव्य लेखन स्पर्धा :-**

गट पहिला (इयत्ता ५वी ते ७वी)

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | ओंकार महेश जोशी | उत्कर्ष मंदिर, मालाड(पू.), मुंबई. |
| द्वितीय क्रमांक | निसर्ग महान चव्हाण | वाडीबंदर मुंबई पब्लिक स्कूल, माझगांव, मुंबई. |
| तृतीय क्रमांक | प्रांजल महेश तांबे | अनुयोग विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खार, मुंबई. |
| उत्तेजनार्थ | सुखदा शिवाजी गावंकर | म.मं.अ.के.देसाई हायस्कूल, रत्नागिरी. |
| | कुणाल सतिश शितप | म.मं.अ.के.देसाई हायस्कूल, रत्नागिरी. |

गट दुसरा (इयत्ता ८वी ते १०वी)

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | साहिल उत्तम खानविलकर | म.मं.न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पाली, जि.रत्नागिरी. |
| द्वितीय क्रमांक | संस्कृती भगवान जाधव | सरस्वती मंदिर हायस्कूल, माहिम, मुंबई. |
| तृतीय क्रमांक | तनुजा दिपक आरगडे | लक्ष्मणराव शिवडावकर माध्य.स्कूल, दहिसर, मुंबई. |
| उत्तेजनार्थ | सानिका शामराव वाघमोडे | म.मं.श्री रामराव विद्यामंदिर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, जत, जि.सांगली. |
| | अश्विनी निंबाजी त्रेनावणे | भैरव विद्यालय, घाटकोपर, मुंबई. |

**कथा लेखन स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | तन्वी दीपक गुंड्ये | डी.जी.रुपारेल महाविद्यालय, माटुंगा, मुंबई |
| द्वितीय क्रमांक | साक्षी सुरेश कोकरे | म.मं.न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पाली, जि.रत्नागिरी. |
